(अ) डॉ.भटकर (ब) डॉ.कस्तुरीरंगन
(क) डॉ.रंगनाथन (ड) डॉ.ब्राऊन

(३) भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय .... येथे आहे.
(अ) मुंबई (ब) दिल्ली
(क) कोलकाता (ड) चेन्नई

(४) .... यांनी ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री सांगितली.
(अ) विश्वनाथन (ब) रंगनाथन
(क) केशवन (ड) क्रिशनकुमार

(५) ही ग्रंथालये दृष्टिदोष असणाऱ्यांना .... लिपीत वाचन साहित्य उपलब्ध करून देतात.
(अ) अरब (ब) मोडी
(क) रोमन (ड) ब्रेल

(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.
(१) माहिती संप्रेषणाचे प्रमुख साधन - ग्रंथालय
(२) सुरुवातीच्या काळातील ग्रंथालय - अभिलेखागार व वस्तुसंग्रहालये
(३) ग्रीकमधील पहिले ग्रंथालय - एस.आर.रंगनाथन
(४) मध्ययुगातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र - बगदाद

(क) खालील विधाने व योग्य कारणे यांची सांगड घालून दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायांची निवड करा.

(१) विधान (अ) : ग्रंथालये म्हणजे अभ्यास, संशोधन, संदर्भ आणि मनोरंजन याकरिता केलेला ग्रंथसंग्रह आहे.
कारण (ब) : ग्रंथालये उपयोगाकरिता आहेत.
पर्याय: (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(२) विधान (अ) : जे.एच.शेरा यांच्या मते, वाचन साहित्य व वाचक यांचा एकत्रित समन्वय म्हणजे ग्रंथालय होय.
कारण (ब) : ग्रंथालयात वाचनसंग्रह केवळ संग्रहाकरता असतो.
पर्याय: (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(ड) नावे लिहा.
(१) ग्रंथालय शास्त्राचा पाचवा सिद्धान्त .....
(२) पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठीचे ग्रंथालय या ग्रंथालय प्रकारात मोडते .....

२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.
(१) ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था नाही.
(२) ग्रंथपाल हा वाचक व ग्रंथ साहित्य यांच्यामधील दुवा असतो.
(३) वाचक, वाचन साहित्य आणि ग्रंथपाल हे ग्रंथालय त्रिमितीचे आधारभूत घटक आहेत.

३. टीपा लिहा.
(१) ग्रंथालय : इतिहास व विकास
(२) शैक्षणिक ग्रंथालय
(३) डिजिटल ग्रंथालय

४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा
(१) शैक्षणिक ग्रंथालयांचे विविध प्रकार व कार्ये स्पष्ट करा.
(२) ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री व त्यांचा ग्रंथालयावरील प्रभाव स्पष्ट करा.
(३) डिजिटल व व्हर्च्युअल ग्रंथालयांमधील फरक स्पष्ट करून त्यांचे फायदे व तोटे लिहा.

उपक्रम
(१) सार्वजनिक ग्रंथालयाला भेट देऊन त्यावर अहवाल लिहा.
(२) विद्यापीठ ग्रंथालयाला भेट देऊन त्या ग्रंथालयातील सेवांचे वर्णन करा.

⌘⌘⌘

घटक २. ग्रंथालय व्यवस्थापन

प्रास्ताविक

ग्रंथालय व्यवस्थापन म्हणजे काय, हे समजून घेण्यापूर्वी व्यवस्थापन शास्त्र ही संकल्पना प्रथम लक्षात घेणे महत्वाचे आहे.

व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे, ज्यामध्ये बहुशाखीय विषयांचा अंतर्भाव होतो. यामध्ये प्रामुख्याने व्यवस्थापन शास्त्राशिवाय अर्थशास्त्र, उद्योग आणि अभियांत्रिकी इत्यादींचा समावेश होतो. व्यवस्थापन शास्त्रामध्ये शास्त्रीय संशोधनावर आधारित मूलतत्वे, धोरणे आणि विश्लेषण पद्धतींचा वापर हा संस्थांची व्यवस्थापनविषयक क्षमता वाढवण्यासाठी करण्यात येतो. संस्थांची ध्येयधोरणे आणि निर्णयक्षमता यांच्यामध्ये अचूकता येण्यासाठी व्यवस्थापनाचा परिणामकारक वापर उपयुक्त ठरतो. उद्योग व्यवसायामध्ये ध्येय साध्य करण्यासाठी विविध शास्त्रीय पद्धतींचा उपयोग हा व्यवस्थापनशास्त्रांतर्गत केला जातो.

व्यवस्थापन शास्त्राकडे एक कला म्हणूनही पाहिले जाते. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे व्यवस्थापन करताना लागणारे व्यावहारिक ज्ञान, अपेक्षित असलेली सर्जनशीलता, वैयक्तिक कौशल्ये आणि अनुभव याचा होणारा वापर होय.

'व्यवस्थापन' ही संज्ञा सर्वव्यापी आहे. उदा., शिक्षण, संशोधन, संरक्षण, करमणूक, दळणवळण, वाहतूक, विमा, बँकिंग, जाहिरात, सहकार, व्यापार, उद्योग, वाणिज्य, कारखानदारी इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये व्यवस्थापन तंत्रांचा वापर केला जातो. ग्रंथालय ही संस्था इतर औद्योगिक संस्थांप्रमाणे वस्तू उत्पादित करून नफा कमावत नाही. ती वाचन सेवा आणि माहिती सेवांची निर्मिती करते. तसेच या सेवांचे आदान-प्रदान वाचकांना करते. ग्रंथालयातील विविध सेवांचे उपयोजन प्रत्यक्ष कार्यात केल्यामुळे समाजातील व्यक्तींची बौद्धिक क्षमता वाढते. त्यांच्या मनाची प्रगल्भता वाढते आणि एकूणच समाज सुसंस्कृत व सुदृढ होण्यास मदत होते. यावरून असे सिद्ध होते की, ग्रंथालये ना नफा ना तोटा या तत्वावर कार्य करणारी संस्था आहे. तरीसुद्धा तिला उत्पादन संस्थेची सर्व व्यवस्थापकीय लक्षणे लागू होतात. ज्याप्रमाणे कोणत्याही संस्थेच्या व्यवस्थापनात व्यवस्थापन कार्ये व कौशल्ये अनिवार्य आहेत. त्याचप्रमाणे ग्रंथालयास देखील दैनंदिन कार्ये सुलभ व सुरळीतपणे पार पाडण्याकरिता व्यवस्थापन तंत्रांचा अवलंब करावा लागतो.

२.१ व्यवस्थापन म्हणजे काय ?

पीटर ड्रकर यांच्या मते, "व्यवस्थापन हे असे एक बहुउद्देशीय कार्य आहे की ज्याद्वारे व्यवसाय, व्यवस्थापक, कामकाज आणि कर्मचारी इत्यादींचे नियोजन केले जाते."

हेन्री फेयॉल यांच्या मते, "अनुमान काढणे, नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय साधणे आणि नियंत्रण करणे म्हणजे व्यवस्थापन होय."



ग्रंथालय व्यवस्थापन

व्यवस्थापनाची कार्ये : कोणत्याही व्यवस्थापकास व्यवस्थापन करताना पुढील कार्ये करावी लागतात.

(अ) कार्याचे नियोजन करणे;

(आ) कार्याचे संघटन करणे;

(इ) कार्यात समन्वय व सुसूत्रता आणणे; आणि

(ई) कार्यावर नियंत्रण ठेवणे.

ग्रंथालयाचे व्यवस्थापन म्हणजे काय ?

"ग्रंथालयाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक साहित्य सामग्री (माहिती साधने), यंत्रसामग्री, मनुष्यबळ आणि आर्थिक संसाधने यांचे प्रभावी आणि परिणामकारक नियोजन व व्यवस्थापन म्हणजे ग्रंथालय व्यवस्थापन होय."

ग्रंथालय व्यवस्थापनाची मूलभूत कार्ये : कोणत्याही संस्थेतील प्रमुख व्यवस्थापकाच्या कार्यांमध्ये प्रामुख्याने नियोजन, संघटन, मनुष्यबळ व्यवस्थापन, निर्देशन, समन्वय, अहवाल सादर करणे आणि अंदाजपत्रक तयार करणे यांचा अंतर्भाव होतो. ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन करताना ग्रंथपालांना ही कार्ये करावी लागतात.



आकृती क्र. २-अ : ग्रंथालय व्यवस्थापनाची मूलभूत कार्ये

POSDCORB (**P**lanning, **O**rganising, **S**taffing, **D**irecting, **Co**ordinating, **R**eporting, **B**udgeting)

स्मरणात राहण्याच्या दृष्टीने ही कार्ये **पोस्डकॉर्ब** या लघुरूपानेही ओळखली जातात.

(१) नियोजन (Planning) : व्यवस्थापन करताना ग्रंथपालास करावे लागणारे पहिले कार्य म्हणजे ग्रंथालयीन कार्याचे नियोजन होय. यामध्ये ग्रंथालयीन कार्याचा आगामी वर्षांसाठी कृती आराखडा तयार करणे अंतर्भूत आहे. ग्रंथालय नियोजनाच्या कार्यात प्रामुख्याने खालील कार्यांचा समावेश होतो.

(अ) ग्रंथालयाची उद्दिष्टे निश्चित करणे.

(आ) उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आवश्यक साधनांचा (तंत्रज्ञान, मनुष्यबळ व आर्थिक) आढावा व अंदाज घेणे. उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून या साधनांचा उपयोग कसा होईल हे पाहणे.

(इ) कार्याच्या वाटचालीचा मसुदा तयार करणे. म्हणजे त्या कार्याची प्रत्यक्ष कृतियोजना, धोरणे, प्रक्रिया व पद्धती यांचा आराखडा तयार करणे.

(ई) कार्याच्या जबाबदारीचे वाटप करणे.

(उ) कार्यांचा अनुक्रम व त्यांच्या पूर्ततेसाठी लागणारा वेळ ठरवणे.

(२) संघटन (Organising) : "एखाद्या संस्थेत अनेक व्यक्तींच्या समूहाने एकत्र येऊन सहकार्याच्या भावनेने निश्चित केलेली कार्ये पार पाडण्याच्या दृष्टीने निर्माण केलेली अंतर्गत संरचना म्हणजे संघटन होय." संघटनाचा आरखडा तयार करताना वेगवेगळे स्तर आणि त्या स्तरांची व्याप्ती यांचा विचार केला जातो. ग्रंथालयाची कार्ये सुरळीत चालण्याकरिता ग्रंथालयात विविध कार्यांनुसार निरनिराळे विभाग निर्माण करणे आवश्यक असते. ग्रंथालय संघटनाचे कार्य खालील प्रमाणे विविध स्तरांवरील जबाबदाऱ्या निश्चित करून केले जाते.

ग्रंथालयातील कार्याचे विविध स्तर	विविध स्तरांवर कार्य करणारे कर्मचारी	कर्मचाऱ्यांच्या कार्याचे स्वरूप
उच्च स्तर	ग्रंथपाल व उपग्रंथपाल	ग्रंथालयाची उद्दिष्टे ठरवणे, ग्रंथालयाचे अंदाजपत्रक तयार करणे व वार्षिक अहवाल तयार करणे इत्यादी.
मध्यम स्तर	सहायक ग्रंथपाल आणि ग्रंथालयातील विविध विभागांचे प्रमुख	उद्दिष्टपूर्तीसाठी प्रत्यक्ष कार्याची कार्यवाही करणे.
कनिष्ठ स्तर	कनिष्ठ ग्रंथालय सहायक आणि तांत्रिक सहायक	कनिष्ठ स्तरावरिल ग्रंथालयातील दैनंदिन व तांत्रिक कार्ये पार पाडणे.

(३) मनुष्यबळ व्यवस्थापन (Staffing) : ग्रंथालयात मनुष्यबळ व्यवस्थापनाच्या कार्यामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव केला जातो.

(अ) ग्रंथालयात किती कर्मचारी हवे याची संख्या ठरवणे. ग्रंथालयास कोणती पदे, किती पदे, त्यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व तांत्रिक कौशल्ये काय असावी, प्रत्येक पदाचे योग्य वेतन व दर्जा, कालानुसार त्यामध्ये सुधारणा, पदोन्नती व पदावनती, आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा, इत्यादी निश्चित करणे.

(आ) ग्रंथालयाच्या प्रत्येक विभागातील संभाव्य कार्याची निश्चिती, कर्मचारी वर्गाची नियुक्ती, त्यांचे प्रशिक्षण, नियुक्त कर्मचाऱ्यांमध्ये ग्रंथालय विभागांचे व त्या विभागातील कार्यांचे वाटप करणे.

(इ) ग्रंथालय शास्त्रात विकसित होत असलेल्या नवनवीन कौशल्यांची आणि तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी कौशल्य संपादनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे.



माहीत आहे का तुम्हांला?

मनुष्यबळ व्यवस्थापनाचे सूत्र : 'योग्य पदासाठी योग्य माणूस नेमणे.'

(४) निर्देशन (Directing) : निर्देशनामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष करायच्या कार्यासंबंधित मार्गदर्शक तत्वे, आज्ञावली आणि सूचना जारी केल्या जातात. कर्मचाऱ्यांना कार्यान्वित करण्यासाठी त्यांना प्रेरणा देण्याचे व कार्यपूर्तीसाठी मार्गदर्शन करण्याचे कार्य देखील यामध्ये समाविष्ट केले जाते.

(५) समन्वय (Coordinating) : संस्थेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केल्या जाणाऱ्या विविध कार्यांमध्ये एकसूत्रता, सुसंगतपणा व ताळमेळ प्रस्थापित करणे म्हणजे समन्वय होय. ही एक अदृश्य कृती असून ती व्यवस्थापनाच्या इतर सर्व कार्यांमध्ये सुसूत्रता आणते. ग्रंथालयातील विविध विभागांमध्ये व तेथील कर्मचारी समूहामध्ये ऐक्य निर्माण करून उपलब्ध साधनांचा प्रभावी वापर करून योजलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठीची मदत या व्यवस्थापकीय कार्यात मिळते.

(६) अहवाल सादर करणे (Reporting) : अहवाल तयार करणे म्हणजे स्वयंमूल्यांकन करून संस्थेच्या वार्षिक वाटचालीचा आढावा घेणे. ग्रंथालयातील विशिष्ट कार्यातील कामगिरी, यश, प्राप्ती, आणि कमतरता यासंदर्भातील वर्षभराचा आढावा अहवालामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना दिला जातो. या अहवालामधील तपशील शक्यतो सांख्यिकीय स्वरूपात मांडलेला असतो.

ग्रंथालयामध्ये होणाऱ्या कार्यक्रमांविषयी अथवा घटनांबाबत माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी तोंडी अथवा लेखी स्वरूपात देणे.

(७) अंदाजपत्रक (Budgeting) : अंदाजपत्रक म्हणजे वर्षभरातील अपेक्षित जमा आणि खर्चाचे लिखित विवरण. याला संस्थेचा वार्षिक अर्थसंकल्प असे देखील म्हणतात. अंदाजपत्रक हा ग्रंथालयाच्या आर्थिक व्यवस्थापनामधील प्रमुख घटक आहे. ग्रंथालय अंदाजपत्रकामध्ये ग्रंथालयातील विविध उपक्रम आणि त्यांच्या पूर्तीसाठी लागणारा नियोजित निधी व तो निधी ज्या कारणांसाठी खर्च करावयाचा आहे याची पूर्वनिश्चिती केलेली असते. वार्षिक अंदाजपत्रकाचा कालावधी हा साधारणतः एप्रिल ते मार्च असा असतो.

ग्रंथालय व्यवस्थापनाची इतर कार्ये

ग्रंथालय व्यवस्थापनाच्या वरील उल्लेख केलेल्या कार्यांव्यतिरिक्त इतरही कार्यांची आवश्यकता असते. जसे नेतृत्व, प्रोत्साहन, नियंत्रण करणे इत्यादी.

(१) नेतृत्व (Leadership) : व्यवस्थापकात नेतृत्व गुण असणे महत्त्वाचे आहे. नेतृत्व म्हणजे संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता. ग्रंथपाल, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल आणि ग्रंथालयाच्या विविध विभागांचे प्रमुख यांच्यामध्ये उत्तम नेतृत्व गुण असले पाहिजेत. अर्थात, यातील मोठा वाटा ग्रंथपालांकडे जातो. त्यांनी आपला आदर्श अशाप्रकारे निर्माण करावा की ज्याद्वारे ग्रंथालयातील कार्यात कार्यक्षमता येईल. कार्याची गुणवत्तेशी सांगड घालून सुधारणा होईल. तसेच कर्मचाऱ्यांमधील सर्व पातळींवरील सुसंवाद सुलभ होईल.

नेतृत्वाच्या कार्यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश होतो.

(अ) कर्मचाऱ्यास काम करण्यास प्रोत्साहित करणे;

(आ) उत्तम प्रकारची संपर्क व्यवस्था निर्माण करणे;

(इ) विश्वास निर्माण होईल अशी निर्णयप्रणाली प्रस्थापित करणे; आणि

(ई) कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करणे.

(२) प्रेरणा (Motivation): उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने संस्थेतील कर्मचाऱ्यांना क्रियाशील ठेवण्यासाठी कार्यप्रवण करणारी प्रक्रिया म्हणजे प्रेरणा होय. प्रेरणा म्हणजे कर्मचाऱ्यांच्या कार्याची वैयक्तिक दखल घेणे आणि त्यांना त्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल शाबासकी व बक्षीस देणे. ज्या कर्मचाऱ्यांना कार्य करण्यास पुरेशी प्रेरणा मिळते ते अधिक कार्यक्षम, अधिक व्यस्त आणि त्यांच्या कार्यामध्ये अधिक समरस होतात. जेव्हा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळते तेव्हा ते संस्था अधिक यशस्वी व्हावी यासाठी मदत करतात.

(३) नियंत्रण (Controlling) : व्यवस्थापनाच्या संदर्भात 'नियंत्रण' म्हणजे कार्यांची मानके (गुणवत्तेची पातळी) ठरवणे. त्यांचा वापर करून प्रत्यक्ष कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि आवश्यकतेनुसार सुधारणात्मक कार्यवाही करणे. कार्यात सुसूत्रता राखणे, वर्षभरातील कार्यांचा सांख्यिकी आढावा घेणे. उपलब्ध असलेला निधी त्या त्या कार्यानुसार खर्च केला जाईल व तो कालबद्ध असेल याची काळजी नियंत्रणाच्या कार्यात घेतली जाते.


ग्रंथालय व्यवस्थापनाचे महत्त्व

१. ग्रंथालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि कुशलता वाढवण्यास मदत होते;

२. ग्रंथालय सेवांची उत्पादकता वाढवण्यास मदत होते;

३. ग्रंथालयाच्या सेवकांची वेतन मानके ठरवण्यास मदत होते;

४. ग्रंथालयातील नियोजन, नियंत्रण, संघटन आणि कर्मचारी नियोजन यासाठी उपयुक्त ठरते.



ग्रंथालयातील विविध विभाग

२.२ ग्रंथालयाचे विविध विभाग व त्यांची कार्ये

ग्रंथालयात विविध कार्ये करण्यासाठी विविध विभाग पाडले जातात. ते प्रामुख्याने खालीलप्रमाणे –

(अ) सामान्य प्रशासन विभाग

१. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, प्रशिक्षण देणे, पदोन्नती देऊन प्रोत्साहन देणे.

२. ग्रंथालयाच्या इतर विभागांवर नियंत्रण ठेवणे.

३. अंदाजपत्रक तयार करणे, आर्थिक निधीचा सुयोग्य विनियोग करणे.

४. ग्रंथालयीन सांख्यिकीय आकडेवारी जमा करणे.

५. वार्षिक अहवाल तयार करणे.

(आ) ग्रंथोपार्जन विभाग

१. ग्रंथ निवड करणे.

२. ग्रंथ विक्रेत्याची निवड करणे व ग्रंथ खरेदीच्या अटी ठरवणे.

३. ग्रंथ विक्रेत्याला ग्रंथ खरेदीचा आदेश देणे.

४. ग्रंथ आल्यानंतर देयक तपासणे.

५. ग्रंथेतर साहित्याची निवड करून खरेदी करणे.

६. ई-बुक्स व ई-जर्नल्स तसेच इतर डेटाबेसचे उपार्जन करणे.

(इ) ग्रंथोपस्कार किंवा तांत्रिक प्रक्रिया विभाग

१. ग्रंथांवर शिक्के मारणे.
२. दाखल नोंदवहीत ग्रंथांची नोंद करणे.
३. ग्रंथावर दाखलनोंद क्रमांक नोंदवणे.
४. बोधांक चिट्ठी तयार करून ग्रंथांवर चिकटवणे.
५. ग्रंथ व ग्रंथेतर साहित्याचे वर्गीकरण व तालिकीकरण करणे.
६. ग्रंथ पाकीट चिकटवून त्यात ग्रंथपत्र तयार करून ठेवणे.

(ई) देवघेव विभाग

१. वाचकांची सभासद म्हणून नोंदणी करून घेणे.
२. सभासदांच्या सभासदत्वाचे नूतनीकरण करणे.
३. ओळखपत्र व सभासदपत्र तयार करणे.
४. ग्रंथ देवघेवीच्या नोंदी करणे व देव-घेव करणे.
५. ग्रंथ वाचकांकरिता आरक्षित करणे.
६. वाचकांना स्मरणपत्र पाठवणे.
७. वाचकांनी गहाळ केलेल्या ग्रंथांची किंमत वसूल करणे.
८. विभागाशी संबंधित सर्व दस्तऐवज सांभाळणे.

(उ) नियतकालिक विभाग

१. नियतकालिकांची निवड करणे.
२. नियतकालिकांची वर्गणी भरणे व आदेश पाठवणे.
३. नियतकालिकांची नोंद करणे व ते नियतकालिकांच्या रॅकवर (Display) ठेवणे.
४. प्रकाशक/वितरक अथवा ग्रंथविक्रेत्याकडून न आलेल्या अंकांसाठी स्मरणपत्र पाठवणे.
५. वर्षाअखेरीस सर्व अंकांना बांधणीसाठी पाठवणे.
६. बांधीव खंडांचे (Bound Volumes) तालिकीकरण व दाखल नोंदवहीत नोंद करून वाचकांना उपलब्ध करून देणे.
७. नियतकालिकांची अद्ययावत यादी व संग्रहण यादी तयार करणे.

(ऊ) संदर्भ विभाग

१. वाचकांच्या प्रश्नांची उत्तरे संदर्भ ग्रंथांमधून शोधून देणे.
२. विषयवार वाङ्मयसूची तयार करणे.
३. वाचकांना प्रलेखन, सारस्वरूप सेवा, प्रचलित माहिती सेवा, निवडक माहितीची प्रसारण सेवा देणे.

(ए) माहिती तंत्रज्ञान विभाग

१. ग्रंथालयातील सर्व विभागांचे ग्रंथालय आज्ञावलीच्या साहाय्याने संगणकीकरण करणे.
२. इंटरनेटद्वारे माहिती सेवा देणे.
३. ग्रंथालयातील सर्व तंत्रज्ञान साधनांची देखभाल करणे.
४. डिजिटल डेटाबेसेसचे व्यवस्थापन करणे.

२.२.१ ग्रंथोपार्जन विभाग : या विभागामध्ये ग्रंथ व ग्रंथेतर साहित्याचे उपार्जन केले जाते. वाचन साहित्याच्या प्रकारानुसार उपार्जन धोरण ठरवावे लागते.


ग्रंथालयीन वाचन साहित्याचे विविध प्रकार आकृतीत दिल्याप्रमाणे (आकृती क्र. २-आ) असतात.

माहीत आहे का तुम्हांला?

बुक कॅफे (Book Cafe) : हौशी वाचकांना हवी असलेली पुस्तके शोधण्यासाठी, ती चाळण्यासाठी/वाचून पुस्तकाचा मजकूर माहीत करून घेण्यासाठी तसेच ती खरेदी करण्याच्या सेवेबरोबरच माफक पदार्थ व पेये पुरवून विरंगुळा देणारे ठिकाण म्हणजे बुक कॅफे होय.



ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहात दरवर्षी वाढ होत जाते. कारण, ग्रंथालयात दरवर्षी नवीन ग्रंथांची खरेदी केली जाते. दरवर्षी बाजारात नवनवीन ग्रंथ येत असतात. ते सर्व ग्रंथ खरेदी करणेही शक्य नसते. अशा वेळी इतर स्रोतांद्वारे हे ग्रंथ उपलब्ध करून देण्याचे काम हा विभाग करतो. ग्रंथालयासाठी ग्रंथ खरेदी करताना उपलब्ध निधी व वाचकांच्या गरजा यांचा मेळ घालणे गरजेचे असते. यासाठी ग्रंथ निवड समिती नेमली जाते. समितीने ठरवलेल्या धोरणांना अनुसरून ग्रंथ खरेदी केली जाते.



आकृती क्र. २-आ : ग्रंथालयीन वाचन साहित्याचे विविध प्रकार

ग्रंथोपार्जनाच्या विविध पद्धती :

१. खरेदीद्वारे (By purchasing) – ग्रंथ उपार्जनाचा हा सर्वांत महत्त्वाचा मार्ग आहे. खरेदी पद्धतीने उपार्जनातील पहिले कार्य म्हणजे ग्रंथ विक्रेत्याची निवड. ही निवड करताना पुढील मुद्द्यांचा विचार केला जातो.

- ग्रंथ विक्रेत्याकडून ग्रंथावर सूट (discount) देऊन तो योग्य किमतीत दिला जातो काय?
- ग्रंथाचा पुरवठा वेळेवर आणि अटी व शर्तींनुसार करतो काय?

२. देणगी स्वरूपात (By Donation) – विविध क्षेत्रांतील अभ्यासक व संशोधक यांच्याकडील ग्रंथसंग्रह ग्रंथालयासाठी देणगीच्या रूपाने मिळवता येतात.

३. अदलाबदलीच्या स्वरूपात (Exchange Basis) – आपल्या संस्थेच्या अथवा ग्रंथालयाच्या प्रकाशनांच्या बदल्यात दुसऱ्या संस्थेची अथवा ग्रंथालयांची काही प्रकाशने अदलाबदलीच्या स्वरूपात करार करून वाचकांकरिता उपलब्ध करून देता येतात.

४. संस्थेचे सभासदत्व (Through Membership) – एखादी संशोधन संस्था, अभ्यास संस्था जी ग्रंथ प्रकाशित करते अशा संस्थेचे सभासद होऊन त्यांची प्रकाशने प्राप्त करता येतात.

ग्रंथ निवड आणि ग्रंथ निवडीची साधने :

ग्रंथ निवड हे ग्रंथोपार्जन विभागाचे मूलभूत कार्य होय. वाचकांच्या माहितीविषयक गरजा व उपलब्ध आर्थिक साधने यांचा मेळ घालून सुयोग्य ग्रंथ ग्रंथालयात खरेदी केले जातात. नवीन ग्रंथांची खरेदी ही ग्रंथालयाचे मूल्य वाढवत असते. ग्रंथनिवडीसाठी पुढील ग्रंथ साधनांचा वापर केला जातो.

(अ) प्रकाशकांची सूची (Publisher's Catalogue) – अनेक प्रकाशक त्यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथांची ठरावीक कालावधीनंतर सूची अथवा कॅटलॉग, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक इत्यादी स्वरूपात प्रकाशित करीत असतात. त्याच्या मदतीने ग्रंथांची निवड केली जाते. उदा., मेहता ग्रंथ जगत, प्रिय रसिक, साकेत, रुची, ललित, साहित्यसूची इत्यादी.

तसेच शासनातर्फे प्रकाशित होणाऱ्या वेगवेगळ्या ग्रंथसूचींचा अभ्यास करून ग्रंथनिवड करता येते. जसे, राष्ट्रीय ग्रंथसूची, सरकारी प्रकाशनांची सूची इत्यादी.

काही संस्था/संघटना मासिके प्रकाशित करतात. त्यात नव्याने प्रकाशित झालेल्या ग्रंथांची माहिती दिली जाते. अशी माहिती ग्रंथनिवडीकरता उपयुक्त ठरते.

(ब) पसंतीसाठी ग्रंथ मागवून घेणे (On Approval Basis) – ग्रंथ प्रत्यक्षात वितरकाकडून मागवून ते चाळून त्यातील माहितीचा आढावा घेऊन ती ग्रंथालयाच्या वाचकांना उपयुक्त आहेत किंवा नाही हे ठरवले जाते व त्यातून ग्रंथ निवड केली जाते. यामध्ये अभ्यासकांच्या शिफारशी स्वीकारल्या जातात.

(क) वाचकांच्या शिफारशी (Suggestions from Readers) – वाचकांना हव्या असणाऱ्या ग्रंथांची शिफारस करण्यासाठी एक नोंदवही ठेवली जाते, त्यात वाचक नोंदणी करतात. त्यांपैकी आवश्यक ते ग्रंथ विषयतज्ज्ञांच्या शिफारशीनंतर व्यवस्थापनाच्या मंजुरीने खरेदी केले जातात.

(ड) ग्रंथ परिक्षण (Book Reviews) – काही नियतकालिकांमध्ये व वर्तमानपत्राच्या पुरवण्यांमध्ये ग्रंथांची परीक्षणे प्रकाशित केलेली असतात. त्या परीक्षणांच्या आधारेही ग्रंथांचे स्वरूप समजून घेऊन ग्रंथ निवड करता येते.

ग्रंथ निवडीचे निकष :

१. उपलब्ध आर्थिक स्रोत
२. विद्यार्थी, संशोधक व सामान्य नागरिक यांच्या अभ्यास, संशोधन, माहिती व मनोरंजनविषयक गरजा लक्षात घेऊन ग्रंथ निवड करावी.
३. ग्रंथातील आशयाचे स्वरूप व उपयुक्तता याच्या साहाय्याने ग्रंथ निवड करावी.
४. प्रकाशन संस्थेचा व लेखकाचा नाव-लौकिक लक्षात घ्यावा.

ग्रंथ खरेदी आदेश देणे (Ordering of Books) – ग्रंथ खरेदीच्या प्रक्रियेत ग्रंथ निवडीनंतर केले जाणारे कार्य म्हणजे ग्रंथ खरेदीचा आदेश वितरकास देणे. आदेशात दिनांक, अनुक्रमांक, ग्रंथनाम, लेखकाचे नाव, खंड, प्रतींची संख्या, किंमत, अटी व नियमांचा समावेश केला जातो. ग्रंथ खरेदी आदेश दोन प्रतींत असावा. त्यांपैकी एक प्रत ग्रंथालयाकडे असावी.

२.२.१.१ आय.एस.बी.एन. (International Standard Book Number)

आय.एस.बी.एन. हा ग्रंथास दिला जाणारा दहा अंकी क्रमांक असून भारतामध्ये राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान या संस्थेमार्फत हा क्रमांक प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक ग्रंथास दिला जातो. त्याकरिता प्रकाशकाने या संस्थेकडे अर्ज करणे आवश्यक असते. १ जानेवारी २००७ पासून हा दहा अंकी क्रमांक तेरा अंकी करण्यात आला आहे. मुद्रित व डिजिटल स्वरूपात प्रकाशित होणाऱ्या ग्रंथास वेगवेगळे आय.एस.बी.एन. दिले जातात.

ग्रंथाचा आदेश देण्याकरिता इतर सूचीय तपशील न देता ISBN क्रमांक देऊनही ग्रंथ मागणी करता येतो.

आय.एस.बी.एन. या क्रमांकाचा नमुना व त्या क्रमांकाचे विविध घटक पुढीलप्रमाणे :

नमुना

978 81 7525 766 5

978 = European Article Number

81 = Group Identifier (Language sharing country group 0 किंवा 1 English Language)

7525 = Publisher Code (Unique code given to publisher)

766 = Title किंवा Item No.

5 = Check digit (Computerise checksum character)

वरील ISBN क्रमांकाचे मराठीत स्पष्टीकरण :

978 = EAN Code (म्हणजे वस्तूला दिलेला संकेतांक = कोणत्या स्वरूपाची वस्तू-येथे ग्रंथ)

81 = Group Identifier (भाषा संकेतांक)

7525 = Publisher Code (प्रकाशन संस्थेला दिलेला संकेतांक)

766 = Title/Item No. (ग्रंथांला दिलेला संकेतांक अथवा ग्रंथनामास अथवा ग्रंथ शीर्षकास दिलेला संकेतांक)

5 = Checksum digit (संगणकाचा तपासणी अंक)



माहीत आहे का तुम्हांला?

ISBN (International Standard Book Number) – आंतरराष्ट्रीय मानक पुस्तक क्रमांक हा तेरा अंकी असतो.

ISSN (International Standard Serial Number) – आंतरराष्ट्रीय मानक नियतकालिक क्रमांक हा आठ अंकी असतो.

२.२.१.२ आय. एस. एस. एन. (International Standard Serial Number) हा नियतकालिकास दिला जाणारा आठ अंकी क्रमांक असून भारतामध्ये हा नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कम्युनिकेशन अँड इन्फरमेशन रिसोर्सेस (NISCAIR), नवी दिल्ली या संस्थेमार्फत हा क्रमांक दिला जातो. आय.एस.एस.एन. हा क्रमांक मासिके, नियतकालिके, वार्तापत्र, वार्षिक अहवाल आणि निर्देशिका (Directory) या वाचन साहित्यास दिला जातो.

२.२.२ तांत्रिक प्रक्रिया विभाग

१. देयक तपासणी (Checking of Invoice) – ग्रंथ ग्रंथालयात आल्यानंतर विक्रेत्याने दिलेले देयक तपासले जाते. यात ग्रंथ खरेदी आदेश दिल्याप्रमाणे


आले आहेत का?; ठरल्यानुसार किंमत बरोबर आहे का?; चलन रूपांतर योग्य झाले आहे का? इत्यादी बाबी तपासल्या जातात. गुड ऑफिस कमिटीच्या (GOC) वारंवार प्रकाशित होणाऱ्या पत्रकाचा आधार घेऊन चलन रूपांतरण योग्य आहे किंवा नाही याची खातरजमा केली जाते.

२. **ग्रंथांची तपासणी** (Physical Check up of a Book) – देयक तपासणीनंतर ग्रंथ तपासला जातो. त्याची छपाई, जोडलेली पाने, बांधणी, पृष्ठांचा क्रम इत्यादींची तपासणी केली जाते. मागवलेलाच ग्रंथ वितरकाने दिला आहे किंवा नाही हे तपासले जाते.

३. **शिक्का मारणे** (Stamping) – ग्रंथ ग्रंथालयाच्या मालकीचा आहे हे दर्शवण्यासाठी त्यावर ग्रंथालयाचा शिक्का मारला जातो. शिक्का वेगवेगळ्या आकारांचा असतो. जसे गोल, चौकोनी इत्यादी. शिक्क्यांवरील तपशील ग्रंथालय ठरवते.

४. **बोध चिठ्ठ्या लावणे** (Pasting of Labels) – प्रत्येक ग्रंथावर ग्रंथालयाच्या उपयुक्ततेसाठी विविध प्रकारच्या चिठ्ठ्या चिकटवल्या जातात, त्या पुढीलप्रमाणे :

(अ) बोधांक चिठ्ठी (Call Number Label) – ग्रंथाच्या कण्यावर किंवा कमी पृष्ठाचे पुस्तक असल्यास मुखपृष्ठावर कण्याच्या बाजूला एक लेबल चिकटवले जाते. ज्यावर वर्गांक, ग्रंथांक व दाखल अंक लिहिले जातात. ज्यावरून ग्रंथाचा विषय, लेखक, दाखल अंकाचा बोध होतो. म्हणूनच त्याला बोधांक लेबल म्हणतात. बोधांक लेबल वेगवेगळ्या आकारांचे असतात. बोधांक लेबलमुळे ग्रंथालयात एकाच विषयावरील सर्व ग्रंथ एका ठिकाणी उपलब्ध होतात.



बोधांक लेबलचे नमुने

(आ) देय दिनांक स्लिप (Due Date Slip) – वाचण्यासाठी घरी नेलेला ग्रंथ ग्रंथालयास कधी परत करायचा आहे, हे समजण्यासाठी ग्रंथाच्या मुख्य मलपृष्ठाच्या मागे ही स्लिप चिकटवली जाते. पूर्ण स्लिप भरल्यावर ती बदलता यावी म्हणून या स्लिपची फक्त वरची बाजू चिकटवतात. या स्लिपवर देय दिनांकाचा शिक्का मारला जातो.

ग्रंथालयाचे नाव		
सदर ग्रंथ आपण खालील दिनांकास परत देय आहे. देय दिनांकास ग्रंथ परत न केल्यास विलंब शुल्क आकारण्यात येईल.		

देय दिनांक स्लिप

(इ) ग्रंथपत्र व ग्रंथ पाकीट (Book Card and Book Pocket) – ग्रंथ वाचकांना घरी वाचण्यासाठी दिल्यानंतर ग्रंथपत्र ग्रंथालयात ठेवून घेतले जाते. ग्रंथपत्रावर ग्रंथाचा दाखल अंक, वर्गांक, ग्रंथनाम, ग्रंथकारनाम लिहिलेले असते. ग्रंथपत्र ग्रंथात ठेवण्यासाठी एक पाकीट ग्रंथाच्या मलपृष्ठाच्या आतील बाजूस चिकटवलेले असते. त्यालाच ग्रंथपत्र पाकीट (Book Card Pocket) असे म्हणतात.

महाविद्यालयाचे नाव

Call No. .... Acc. No. ....

वर्गांक/बोधांक दाखल अंक

ग्रंथकार : ....

ग्रंथनाम : ....

....

सभासदाचे नाव	ग्रंथ दिल्याची तारीख	ग्रंथ परत करण्याची तारीख

ग्रंथपत्र




ग्रंथ पाकीट

(ई) **बारकोड (Barcode) स्टिकर किंवा आर.एफ.आय.डी. (RFID) टॅग चिकटवणे** – जेथे संगणकाधारित कार्ये केली जातात अशा ग्रंथालयांत ग्रंथ देवघेवीच्या कार्यासाठी ग्रंथांवर व ग्रंथांमध्ये बारकोड स्टिकर अथवा आर.एफ.आय.डी. टॅग लावले जातात.

5 012345 678900

बारकोड स्टिकर



आर.एफ.आय.डी. (RFID) टॅग

५. दाखल नोंद करणे (Accessioning in Accession Register) – ग्रंथालयात दाखल झालेल्या प्रत्येक ग्रंथाची नोंद एका विशिष्ट नोंदवहीत केली जाते. ज्यामुळे ग्रंथाला एक अनुक्रमांक दिला जातो. ज्या वहीत ही नोंद केली जाते तिला दाखल नोंदवही असे म्हणतात. ग्रंथाला मिळालेला दाखल नोंद क्रमांक ग्रंथाच्या विशिष्ट पृष्ठांवर नोंदवला जातो. दाखल अंकामुळे ग्रंथाची ओळख पटण्यास मदत होते. दाखलक्रमांक हा ग्रंथास दिला जाणारा एकमेव क्रमांक (Unique Number) असून, दाखल नोंदवहीतील शेवटचा क्रमांक संबंधित ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंख्या दर्शवतो.



माहीत आहे का तुम्हांला?

दाखल क्रमांक म्हणजे एखाद्या ग्रंथालयामधील विशिष्ट ग्रंथाचा एकमेव (Unique) नंबर.

६. वर्गीकरण करणे (Classification of Books) – खरेदी केलेल्या ग्रंथांचे ग्रंथालयात अवलंबलेल्या वर्गीकरणाच्या पद्धतीने वर्गीकरण करून त्यांची वर्गीकृत रचना ग्रंथालयातील कपाटांमध्ये केली जाते. प्रत्येक ग्रंथास विशिष्ट वर्गीकरण पद्धतीनुसार वर्गांक दिला जातो.

७. तालिकीकरण करणे (Cataloguing of Books) – ग्रंथालयात खरेदी केलेल्या व देणगीदाखल

मिळालेल्या प्रत्येक ग्रंथाचे तालिकीकरण केले जाते. तालिकीकरणाच्या विविध संहिता असून संबंधित ग्रंथालयाने स्वीकारलेल्या संहितेनुसार तालिकीकरण केले जाते.

२.२.३ देवघेव विभाग (Circulation Section) :

वाचकांना ग्रंथ देणे व तो परत घेण्याचे कार्य ज्या विभागात होते त्याला देवघेव विभाग म्हणतात.



देवघेव विभाग

देवघेव विभागात केली जाणारी कार्ये

(१) **वाचकाकडून सभासद अर्ज भरून घेणे** (Membership Registration) – वाचकाचे नाव, पत्ता, नोकरी, संपर्क क्रमांक व ई-मेल इत्यादी माहिती ग्रंथालयासाठी अर्जामध्ये भरून घेणे व ग्रंथपालांची मंजुरी घेणे.

(२) **अनामत रक्कम घेणे** (Acceptance of Deposit) – ग्रंथालयाच्या नियमानुसार जी अनामत रक्कम असेल ती सभासदाला ग्रंथालयास भरावी लागते व सभासदत्व संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाते.

(३) **सभासदाची नोंद करणे** (Recording of Membership) – सभासद अर्ज ग्रंथालयास प्राप्त झाल्यानंतर त्याची नोंद केली जाते.

(४) **ओळखपत्र देणे** (Issuing of Identity Card) – ग्रंथ देवाणघेवाण पद्धतीनुसार वाचकास ओळखपत्र, सभासदत्व पत्र व देवघेव पत्र दिले जाते. वाचकाकडून ओळखपत्र/सभासदत्व पत्र हरवल्यास खात्री करून नवीन ओळखपत्र/सभासदत्व पत्र दिले जाते.

(५) **स्मरण पत्र** (Reminder Letter) **पाठवणे** – वाचकास दिलेला ग्रंथ त्याने दिलेल्या मुदतीत परत न केल्यास ग्रंथ परत करण्याविषयी स्मरणपत्र पाठवले जाते.

(६) **विलंब शुल्क** (Late Fee) **आकारणे** – वाचकाने दिलेल्या मुदतीत ग्रंथ परत न केल्यास ग्रंथालय नियमानुसार विलंब शुल्क आकारले जाते.

(७) **मुदतवाढ देणे** (Renewal of Issued Book) – वाचकाच्या विनंतीवरून त्याने वाचनासाठी घेतलेल्या ग्रंथाची परत करण्याची मुदत वाढवून दिली जाते.

(८) **वाचकांकरिता ग्रंथ आरक्षित करणे** (Reservation of Book for Reader) – ज्या ग्रंथास जास्त मागणी आहे अथवा वाचकास हवा असलेला ग्रंथ दुसऱ्या वाचकाने नेलेला असल्यास असा ग्रंथ वाचक देवघेव विभागामार्फत आरक्षित करू शकतो.

२.२.४ संदर्भ विभाग (Reference Section):

ग्रंथालयामध्ये माहिती मिळवण्यासाठी येणाऱ्या वाचकांना वैयक्तिकरीत्या माहितीच्या प्राप्तीसाठी आवश्यक ते मार्गदर्शन संदर्भ विभागाकडून केले जाते. असे मार्गदर्शन ग्रंथालयातील उपलब्ध संदर्भ ग्रंथांच्या साहाय्याने केले जाते.

संदर्भ विभागात वाचकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याबरोबरच इतरही कार्ये केली जातात. ती पुढीलप्रमाणे :

वाचकांनी विचारलेली माहिती कमीत कमी वेळात वाचकांना दिली जाते. संदर्भ ग्रंथातील माहिती कशी शोधायची याचे मार्गदर्शन केले जाते. संदर्भ ग्रंथात न सापडलेली माहिती ही वृत्तपत्रे, नियतकालिके व इतर संदर्भ स्रोतांच्या मदतीने शोधून दिली जाते. ग्रंथालयातील संग्रहातून माहिती देता येत नसेल तर आंतरग्रंथालयीन देवघेवीच्या मार्गाने वाचकांना माहिती मिळवून दिली जाते. साधारणपणे संदर्भ सेवा संदर्भ ग्रंथांच्या मदतीने दिली जाते. उदा., शब्दकोश, ज्ञानकोश, इंटरनेटवरील

वाचन साहित्य इत्यादी. वृत्तपत्रात महत्वपूर्ण घडामोडींच्या संदर्भात लेख प्रकाशित होत असतात, त्यांची विषयवार कात्रणे काढून फाईल्स तयार केल्या जातात. वाचकांच्या मागणीनुसार त्यातून माहिती पुरवली जाते.

(१) **नवीन वाचकास ग्रंथालयाची माहिती देणे –** नवीन वाचक ग्रंथालयात आल्यानंतर त्याला ग्रंथालयाची सविस्तर माहिती दिली जाते. वर्गीकृत ग्रंथ रचनेविषयी माहिती देणे, तालिका वापरासाठी मार्गदर्शन करणे, ग्रंथालयाच्या विभागांची माहिती देणे, ग्रंथालयात होणाऱ्या देवघेव प्रक्रियेची माहिती देणे, ग्रंथ संग्रहाविषयी माहिती सांगणे ही सुद्‌धा कार्ये या विभागामार्फत केली जातात.

(२) **विचारलेल्या प्रश्नांची नोंद ठेवणे –** वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांची नोंद ठेवली जाते. वारंवार विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने अद्ययावत संदर्भ ग्रंथ खरेदी करता येतात.


(३) **ग्रंथालयातील इतर विभागांशी समन्वय राखणे –** वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संदर्भ ग्रंथातच मिळतील असे नाही. त्यामुळे नियतकालिक व इतर विभागाशी समन्वय राखला जातो. अद्ययावत संदर्भ ग्रंथांच्या खरेदीसाठी ग्रंथोपार्जन विभागाशी संवाद ठेवावा लागतो. वाचकांच्या हाताळण्याने संदर्भ ग्रंथांची बांधणी सैल झाल्यास पुनर्बांधणी करावी लागते. अशा व इतर ग्रंथांच्या संवर्धन आणि रक्षणासाठी परिरक्षण (Preservation) विभागाशीही संवाद साधला जातो. संदर्भ विभागामार्फत वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भात ग्रंथोपार्जन विभागास शिफारस करता येते.

२.२.५ नियतकालिक विभाग (Periodical Section) :

ठरावीक कालावधीनंतर प्रकाशित होणारी नियमित प्रकाशने म्हणजे नियतकालिक. प्रकाशन कालावधीनुसार नियतकालिकांचे पुढील प्रकार आढळतात (आकृती २-इ).

नियतकालिकांची निवड (Selection of Periodicals)

- ग्रंथालय समिती, शैक्षणिक विभाग प्रमुख तसेच वाचकांची शिफारस या सर्वांचा विचार करून नियतकालिकांची निवड केली जाते.
- ग्रंथालयाच्या आणि वाचकांच्या गरजांचा व प्रकारांचा विचार करून नियतकालिक निवडावे लागते. जसे ग्रामीण भागातील ग्रंथालयासाठी शेतीकरिता उपयुक्त नियतकालिकांची निवड करावी लागते.



आकृती क्र. २-इ



नियतकालिक विभाग

नियतकालिकांचे उपार्जन (Subscription of Periodicals) – उपार्जनासाठी नियतकालिकांची वर्गणी दोन प्रकारे भरता येते. वर्गणी आगाऊ भरली जाते व नंतर अंक प्राप्त होतात. वर्गणी भरण्याचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे :

(१) प्रकाशककाकडे वर्गणी भरून मागणी (Directly Through Publisher) – प्रकाशकाकडे एका विशिष्ट काळाची आगाऊ वर्गणी (advance subscription) भरून उपार्जन करणे.

(२) वितरकाद्वारे वर्गणी भरून (Through Distributor or Agent) – वितरकाद्वारे नियतकालिकाची वर्गणी भरून नियतकालिकांचे उपार्जन करता येते.

नियतकालिक विभागाची कार्ये

१. नियतकालिकांची निवड करणे.

२. देणगीद्वारे व अदलाबदलीने (By way of exchange) नियतकालिके ग्रंथालयात मिळवण्याची व्यवस्था करणे.

३. नियतकालिकांची वर्गणी भरणे व त्यांच्या नोंदी ठेवणे.

४. न आलेल्या नियतकालिकांच्या अंकांची स्मरणपत्रे वितरकास किंवा प्रकाशकास पाठवणे.

५. नियतकालिकांच्या वर्गणीचे नूतनीकरण करणे.

६. वर्षाअखेर नियतकालिकांच्या अंकांची बांधणी करणे व तालिकीकरण करणे.

७. नियतकालिकांच्या बांधणी केलेल्या खंडांची दाखल नोंदवहीत नोंद करणे.

२.३ डिजिटल वाचन साहित्य उपार्जन

जे वाचन साहित्य डिजिटल स्वरूपात प्रकाशित होते व त्याची उपलब्धता संगणक व माहिती तंत्रज्ञानाची साधने व नेटवर्कद्वारे होते. अशा साहित्याचे उपार्जन, संकलन, संग्रहण, वितरण व प्रतिप्राप्ती डिजिटल स्वरूपातच केली जाते त्यास 'डिजिटल वाचन साहित्य' असे म्हणतात. या वाचन साहित्याची उपार्जन पद्धत परंपरागत वाचन साहित्यापेक्षा वेगळी असते.

- असे वाचन साहित्य डिजिटल स्वरूपातच उपलब्ध असते. यांचा वापर करण्यासाठी संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो.
- या स्वरूपातील वाचन साहित्य ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने वापरता येतात.
- हे वाचन साहित्य मिळवण्यास स्थळ व काळाची मर्यादा नसते. ती ग्रंथालयाबाहेरही पोर्टलद्वारे प्राप्त करता येतात.

डिजिटल वाचन साहित्याच्या उपार्जना संदर्भात खालील बाबींचा विचार करावा लागतो.

(अ) वाचक – वाचक अशा वाचन साहित्याच्या वापरासाठी तयार आहेत का? आणि ते त्यांची मागणी करतात का?

(आ) संसाधने – हे वाचन साहित्य वापरण्यासाठी लागणारे इतर तंत्रज्ञान ग्रंथालयात उपलब्ध आहे का? जसे संगणक, प्रोजेक्टर, सी.डी. प्लेयर, इंटरनेट इत्यादीकरिता आर्थिक तरतूद केली आहे का?

(इ) आधुनिक काळात सर्व प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये अशा स्वरूपातील वाचन साहित्याची खरेदी केली जाऊ शकते.

२.४ ग्रंथालयातील दस्तऐवज व्यवस्थापन (Record Management in Library)

२.४.१ दाखल नोंदवही (Accession Register)

ग्रंथालयात दाखल होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाची नोंद ही ग्रंथालयाच्या ज्या नोंदवहीत केली जाते त्याला 'दाखल नोंदवही' असे म्हणतात. दाखल नोंदवही ही ग्रंथालयाची एक महत्त्वाची नोंदवही समजली जाते. दाखल नोंदवहीतील शेवटचा दाखल अंक हा त्या

बालभारती ग्रंथालय, पुणे दाखल नोंदवही (नमुना)												
दिनांक	दाखल अंक	ग्रंथकार	ग्रंथनाम	आवृत्ती/ प्रकाशन वर्ष	प्रकाशक	प्रकाशन स्थळ	पृष्ठे	किंमत	ग्रंथ विक्रेता	देयक क्रमांक व दिनांक	वर्गांक	शेरा

आकृती क्र. २-ई : दाखल नोंदवहीतील रकाने

ग्रंथालयाचा एकूण ग्रंथसंग्रह दर्शवतो. दाखल नोंदवही हा ग्रंथालयाचा अधिकृत व कायमस्वरूपी दस्तऐवज समजला जातो. ग्रंथालयांमध्ये ग्रंथांशिवाय विविध वाचन साहित्य असते, जसे हस्तलिखिते, प्रबंध, दृक्-श्राव्य माध्यमे (CDs आणि DVDs) इत्यादी. या प्रत्येक प्रकारच्या वाचन साहित्याची स्वतंत्ररीत्या दाखलनोंद केली जाते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे भिन्न स्वरूप आणि त्यानुसार त्यांचे तपशीलवार वर्णन असल्यामुळे त्याची स्वतंत्र दाखल नोंदवही ठेवली जाते (आकृती क्र. २-ई).

दाखल नोंदवहीतील रकाने व त्यांचे महत्त्व

दिनांक : ग्रंथ ज्या तारखेस ग्रंथालयात दाखल झाला ती तारीख येथे लिहितात. त्यामुळे ठरावीक काळात व आर्थिक वर्षात किती ग्रंथ दाखल झाले ते समजते.

दाखल अंक : प्रत्येक ग्रंथास (खंड, आवृत्ती) स्वतंत्र दाखल अंक दिला जातो. यामुळे ग्रंथालयातील एकूण ग्रंथ संख्या समजते. ग्रंथाचा अचूक शोध घेता येतो.

ग्रंथकार : ग्रंथाच्या लेखकाचे नाव, आधी आडनाव, नंतर नाव व शेवटी पित्याचे/पतीचे नाव येथे लिहिले जाते.

ग्रंथनाम : ग्रंथाचे शीर्षक, समांतर शीर्षक (असल्यास) व उपशीर्षक येथे नोंदवतात.

आवृत्ती/प्रकाशन वर्ष : ग्रंथाची आवृत्ती व प्रकाशनाचे वर्ष येथे लिहिले जाते.

प्रकाशक : ग्रंथ प्रकाशकाचे पूर्ण नाव व पत्ता या रकान्यात लिहिला जातो. ग्रंथाची अधिकची प्रत हवी असल्यास या रकान्यातील माहिती उपयुक्त ठरते.

प्रकाशन स्थळ : ग्रंथ जेथून प्रकाशित झाला ते स्थळ येथे लिहिले जाते.

पृष्ठे : ग्रंथाच्या एकूण पृष्ठांची संख्या येथे नोंदवतात. प्राथमिक पृष्ठे व मुख्य मजकुराची पृष्ठे यांची नोंद घेतात.

किंमत : ह्यात ग्रंथाच्या मूळ किंमतीचा तपशील देतात. परकीय चलन नोंदीसाठी परकीय चलनाची मूळ किंमत व त्याचा त्या वेळचा रुपयातील रूपांतराचा दरही दर्शवून भारतीय मूल्यात रूपांतर केले जाते. ग्रंथ वाचकाने हरवल्यास किंमत वसुलीकरिता, इतर सांख्यिकीय माहितीकरिता या रकान्यातील माहितीचा उपयोग होतो.

ग्रंथविक्रेता : ग्रंथ ज्या वितरकाकडून खरेदी केला त्याचे नाव व पत्ता या रकान्यात लिहिला जातो. ग्रंथाच्या अतिरिक्त प्रती हव्या असल्यास त्यापूर्वी कोणाकडून खरेदी केल्या होत्या याची माहिती मिळते व त्याला संबंधित ग्रंथाचा आदेश देता येतो.

देयक क्रमांक व दिनांक : ग्रंथासोबत वितरकाकडून प्राप्त झालेल्या देयकाचा क्रमांक व दिनांक या रकान्यात लिहिला जातो.

वर्गांक : ग्रंथ ज्या विषयाचा आहे त्याचा वर्गांक येथे नोंदवतात.

शेरा : ग्रंथ रद्दबातल करण्याचे कारण येथे लिहिले जाते किंवा इतर नोंदी ज्या इतर रकान्यात दर्शवता येत नाहीत अशा बाबींच्या नोंदी या रकान्यात लिहितात.

२.४.२ देयक नोंदवही (Bill Register)

ग्रंथालयात खरेदी केलेले सर्व ग्रंथ आणि इतर वाचन साहित्यांची देयके या नोंदवहीत नोंदवली जातात. त्याचप्रमाणे ग्रंथालयासाठी खरेदी केल्या जाणाऱ्या लेखन सामग्रीची (stationary) नोंद स्वतंत्र देयक नोंदवहीत

बालभारती ग्रंथालय, पुणे देयक नोंदवही (नमुना)							
दिनांक	वितरक तपशील	वितरित वस्तूंचे विवरण	देयक क्रमांक व दिनांक	रक्कम	आर्थिक स्रोत (Budget Head)	धनादेश दिल्याचा तपशील व दिनांक	शेरा

आकृती क्र. २-उ : देयक नोंदवहीतील रकाने

केली जाते. तसेच ग्रंथालयासाठी खरेदी केल्या जाणाऱ्या फर्निचर आणि इतर यंत्रसामग्रीची देयके स्वतंत्ररीत्या देयक नोंदवहीत नोंदवली जातात व देयकाच्या दिलेल्या रकमेच्या धनादेशाचा तपशीलही नोंदवतात. (आकृती क्र. २-उ)

देयक नोंदवहीचे महत्त्व

- देयक नोंदवहीतील नोंदीवरून ग्रंथालयास देयक नेमके कोणत्या तारखेस प्राप्त झाले व त्यावर नेमकी काय कार्यवाही झाली हे लक्षात येते.
- ग्रंथविक्रेता किंवा साहित्य पुरवठा करणाऱ्यांची कोणती देयके अद्याप द्यायची आहेत ते समजते.
- आर्थिक वर्षात किती रक्कम खर्ची झाली ते लक्षात येते.
- एखाद्या ग्रंथविक्रेत्यास धनादेश मिळाला की नाही हे लक्षात येते.

२.४.३ वितरक नोंदवही (Distributor's Register)

विविध संभाव्य वितरकांकडून निर्धारित नमुन्यात त्यांच्याविषयीची माहिती मागवली जाते. त्यांच्याकडून आलेली माहिती या वहीत नोंदवली जाते. या माहितीच्या आधारे वितरकाची निवड केली जाते. वितरक निवडताना साधारणपणे खालील बाबी लक्षात घेतल्या जातात.

- वितरक कोणत्या प्रकारचे वाचन साहित्य पुरवठा करतात?
- वितरकाचे नाव, त्याच्या संपर्काचा पत्ता, ई-मेल, फोन इत्यादी.
- आदेशावर दिलेल्या मुदतीत साहित्य पुरवण्याची हमी देतात का?
- भारतीय व परदेशी प्रकाशनांवर योग्य ती सूट देतात का?
- टपाल व वाहतूक खर्च स्वतः करतात का?
- त्यांचा ग्रंथ वितरणाचा किती वर्षांचा अनुभव आहे?
- जीएसटी कायद्यानुसार जीएसटी क्रमांक घेतला आहे काय ?

निवडलेल्या वितरकांचा तपशील वितरक नोंदवहीत नोंदवला जातो (आकृती क्र. २-ऊ).

सर्व रकाने दाखल नोंदवहीप्रमाणेच भरून वितरकाचे नाव आणि पत्ता या वितरक नोंदवहीत नमूद करावा.

बालभारती ग्रंथालय, पुणे वितरक नोंदवही (नमुना)						
अ.क्र.	वितरक	संपूर्ण पत्ता	संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी	पुरवठा तपशील	सूट	शेरा

आकृती क्र. २-ऊ : वितरक नोंदवहीतील रकाने

बालभारती ग्रंथालय, पुणे देणगी नोंदवही (नमुना)												
अ. क्र.	दिनांक	दाखल अंक	ग्रंथकार	ग्रंथनाम	आवृत्ती / वर्ष	प्रकाशक	प्रकाशन स्थळ	पृष्ठे	किंमत	देणगीदार नाव व पत्ता	वर्गांक	शेरा

आकृती क्र. २-ए : देणगी नोंदवहीतील रकाने

२.४.४ देणगी नोंदवही (Donation Register)

ग्रंथालयामध्ये विविध ठिकाणांहून देणगीस्वरूपात ग्रंथ येत असतात. हे देणगीदाखल मिळालेले ग्रंथ प्रामुख्याने व्यक्ती आणि विविध संस्थांमार्फत येत असतात. या सर्व देणगीस्वरूपातील ग्रंथांची नोंद देणगी नोंदवहीमध्ये केली जाते. देणगी नोंदवहीचे सर्व रकाने दाखल नोंदवहीप्रमाणेच असतात. फक्त या नोंदवहीत एक वाढीव रकाना असतो ज्यात देणगीदाराचे नाव, पत्ता व इतर बाबी नोंदवतात (आकृती क्र. २-ए).

ग्रंथालयास मिळालेल्या देणगीचा उल्लेख वार्षिक अहवालात करावा. तसेच देणगीदारास आभारपत्र पाठवावे.

२.४.५ ग्रंथ रद्दबातल नोंदवही (Book Withdrawal Register)

ग्रंथालयातील दस्तऐवजांपैकी हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. ग्रंथालयातील ग्रंथ विविध कारणांमुळे रद्दबातल केल्याची नोंद ज्या वहीत केली जाते त्या नोंदवहीस ग्रंथ रद्दबातल नोंदवही असे म्हणतात. या नोंदवहीमुळे ग्रंथसंग्रहाची माहिती अद्ययावत राहते.

ग्रंथालयातील ग्रंथ रद्दबातल करण्याची कारणे :

- ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहातून ग्रंथ गहाळ होणे.
- वाचकाकडून ग्रंथ गहाळ झाल्यानंतर व त्याची किंमत वसूल केली असल्यास.
- वाळवी, कीटक यांच्यामुळे ग्रंथ निरुपयोगी होणे.
- नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रंथ निरुपयोगी होणे.
- अभ्यासक्रम बदलल्यामुळे ग्रंथ निरुपयोगी होणे.
- ग्रंथ वारंवार हाताळल्यामुळे तो खराब झाल्यास किंवा त्याची दुरूस्ती शक्य नसल्यास.

अशा सर्व ग्रंथांची नोंद वेळोवेळी रद्दबातल नोंदवहीत करावी लागते. ग्रंथ रद्दबातल करण्याचा ठराव व ग्रंथांची यादी सक्षम अधिकाऱ्यांच्या बैठकीत सादर करून हा ठराव अधिकृतरीत्या मंजूर करून घ्यावा लागतो. त्यांच्या मंजुरीने ग्रंथ रद्दबातल करता येतात. ग्रंथ रद्दबातल नोंदवहीत सर्वसाधारणपणे खालील रकाने असतात (आकृती क्र. २-ऐ).

अनुक्रमांक : रद्द केलेल्या एकूण ग्रंथांची संख्या यावरून समजते.

दाखल अंक : रद्द केलेल्या ग्रंथाचा दाखल अंक येथे नोंदवला जातो.

ग्रंथकार : रद्द केलेल्या ग्रंथाच्या लेखकाचे नाव येथे लिहितात.

ग्रंथनाम : रद्द केलेल्या ग्रंथाचे शीर्षक येथे लिहितात.

ग्रंथ रद्द करण्याचे कारण : ग्रंथ रद्द करण्याचे कारण येथे लिहितात. उदा., वाळवी, जीर्ण, कालबाह्य इत्यादी.

ठराव क्रमांक व दिनांक : ग्रंथालयाच्या मातृसंस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा ठराव क्रमांक व दिनांक या रकान्यात नोंदवावा.

बालभारती ग्रंथालय, पुणे
ग्रंथ रद्दबातल नोंदवही (नमुना)

अ. क्र.	दाखल अंक	ग्रंथकार	ग्रंथनाम	प्रकाशक	ग्रंथाची किंमत	ग्रंथ रद्द करण्याचे कारण	ठराव क्रमांक व दिनांक	शेरा

आकृती क्र. २-ऐ : ग्रंथ रद्दबातल नोंदवहीतील रकाने

बालभारती ग्रंथालय, पुणे
ग्रंथबांधणी नोंदवही (नमुना)

अ. क्र.	दाखल अंक	ग्रंथकार	ग्रंथनाम	प्रकाशक	वर्गांक	बांधणी प्रकार	बांधणीकार नाव व पत्ता	बांधणी दर	ग्रंथ बांधणीस दिल्याची तारीख	ग्रंथ बांधणीहून परत आल्याची तारीख	देयक क्रमांक व दिनांक	देय रक्कम	शेरा

आकृती क्र. २-ओ : ग्रंथबांधणी नोंदवहीतील रकाने

रद्दबातल नोंदवहीवरून रद्द केलेल्या साहित्याची एकत्रित नोंद, किंमत, कारणे व रद्द होण्याचे ग्रंथांचे प्रमाण या बाबी लक्षात येतात. त्यानुसार आवश्यक ते प्रतिबंधात्मक उपाय योजता येतात. ग्रंथ रद्दबातल प्रक्रिया ही सर्वसाधारणपणे मोठ्या ग्रंथालयांमधून दरवर्षी केली जाते.

२.४.६ ग्रंथबांधणी नोंदवही (Book Binding Register)

काही ग्रंथालयांमध्ये ग्रंथबांधणी नोंदवही ठेवण्यात येते. ग्रंथालयांमधील ग्रंथ हे अनेक वाचक हाताळत असल्यामुळे ग्रंथांची मूळ बांधणी सैल होते. त्यांतील उपयोगी ग्रंथांची पुनर्बांधणी करण्यात येते. जेणेकरून ते अधिक काळ वापरता येतील. बांधणीसाठी देण्यात येणारे ग्रंथ, त्यांची किंमत, बांधणीचा प्रकार, बांधणीकाराचे नाव व पत्ता व बांधणीचा दर याची नोंद स्वतंत्र वहीत करतात. या वहीलाच ग्रंथबांधणी नोंदवही म्हणतात. साधारणपणे यात पुढील रकाने असतात (आकृती क्र. २-ओ).

दाखल अंक : बांधणीसाठी द्यायच्या ग्रंथाचा दाखल अंक येथे लिहितात.

ग्रंथकार : बांधणीसाठी देण्यात येणाऱ्या ग्रंथाच्या लेखकाचे नाव येथे नोंदवतात.

ग्रंथनाम : बांधणीसाठी देण्यात येणाऱ्या ग्रंथाचे शीर्षक येथे नोंदवतात.

बांधणी प्रकार : ग्रंथाची कागदी, कापडी, चामडी व रेग्झिन यांपैकी कोणती बांधणी करायची आहे तो प्रकार येथे लिहितात.

बांधणीकार : बांधणीकाराचा कामाचा अनुभव व दर्जा यावरून त्याची निवड केली जाते. निवड केलेल्या व बांधणीचे कार्य सोपवलेल्या बांधणीकाराचे नाव व पत्ता या रकान्यात लिहितात.

बांधणीचा दर : बांधणी प्रकारानुसार बांधणीकारास ठरवलेला प्रतिग्रंथ बांधणीचा दर येथे लिहितात.

ग्रंथ बांधणीस दिल्याची तारीख : ज्या तारखेला ग्रंथ बांधणीसाठी दिले आहेत ती तारीख येथे नोंदवतात.

ग्रंथ परत आल्याची तारीख : ग्रंथ बांधणी करून ग्रंथालयात परत आल्याची तारीख येथे नोंदवतात.

देयक क्रमांक व दिनांक : बांधणीकाराकडून आलेल्या देयकाचा क्रमांक व दिनांक या रकान्यात नोंदवतात.

देयक रक्कम : देयकावरील एकूण देय रक्कम येथे नोंदवतात.

शेरा : बांधणी केलेल्या ग्रंथाची विशेष माहिती येथे नोंदवतात.

२.५ ग्रंथालय नियम (Library Rules)

ग्रंथालयाचा मुख्य हेतू हा वाचकांना उपलब्ध माहिती स्रोतांचा वापर करून त्यांच्या माहितीविषयक गरजा पुरवणे हा आहे. त्याकरिता ग्रंथालये अनेकविध सेवा वाचकांना देत असतात. वाचक आणि सेवा यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य ग्रंथालय व्यवस्थापन करत असते. ग्रंथालय व्यवस्थापनामधील एक महत्त्वाचा भाग म्हणजे ग्रंथालय नियम होय.

ग्रंथालयामध्ये प्रतिवर्षी वाचन साहित्यामध्ये वाढ होत असते. या वाचन साहित्याच्या सुयोग्य वापराकरिता ग्रंथालय नियमांची गरज असते. उपलब्ध वाचन साहित्याचा सर्व वाचकांना उपयोग करता यावा यासाठी ग्रंथालयाचे नियम महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रंथालय नियम हे संस्थेच्या व्यवस्थापनाने/ग्रंथालय समितीने मंजूर केलेले असावेत.

सर्वसामान्यपणे ग्रंथालय नियम हे ग्रंथपालाकडून तयार केले जातात आणि ग्रंथालय समिती सदर नियमांना मंजुरी देण्याचे कार्य करते. ग्रंथालय नियम वाचक आणि ग्रंथालय सेवकांकारिता मार्गदर्शक म्हणून कार्य करतात.

वाचकांनी ग्रंथालयात हे टाळावे.



ग्रंथालयात घ्यायची दक्षता

ग्रंथालयीन सेवा आणि ग्रंथालयाचे वाचक या

संदर्भात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे हा ग्रंथालयीन नियमांचा प्रमुख हेतू आहे. नियमांमुळे ग्रंथालयाचे व्यवस्थापन सुलभ होण्यास मदत होते.

जाणून घ्या.

आपल्या विद्यालयातील / महाविद्यालयातील ग्रंथालयाची नियमावली माहीत करून घ्या.

ग्रंथालय नियमांचा हेतू

(१) ग्रंथालयाच्या दैनंदिन कारभारात सुसूत्रता आणणे.

(२) वाचकांना त्यांच्या हक्कांची व कर्तव्याची/ जबाबदारीची जाणीव करून देणे.

(३) ग्रंथालयीन सेवकांना आवश्यक ते अधिकार प्रदान करणे.

(४) ग्रंथालय योग्य पद्धतीने वापरण्यासाठी वाचकांना शिस्त लावणे.

ग्रंथालयासाठी नियम तयार करत असताना घ्यायची दक्षता व काळजी

(१) ग्रंथालयासाठीचे नियम हे सुटसुटीत, सुस्पष्ट आणि सर्वांना एकसमान असावेत.

(२) नियम तयार करत असताना त्यामध्ये पुरेशी लवचीकता असावी.

(३) नियमांद्वारे ग्रंथालय, वाचक आणि ग्रंथालयीन सेवक यांच्या हिताचे रक्षण व्हावे.

ग्रंथालयासाठी नियम तयार करत असताना पुढील गोष्टींचा समावेश असावा.

(१) संस्थेचे बोधचिन्ह, ग्रंथालयाचे नाव, पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, इ-मेल इत्यादी संपर्कासाठी आवश्यक ती माहिती लिहावी.

(२) ग्रंथालयाची माहिती व उद्दिष्टे लिहावीत.

(३) ग्रंथालयाची वेळ, उदा., ग्रंथालय सोमवार ते शनिवार सकाळी ८.०० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उघडे राहील. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी ग्रंथालय बंद राहील.

नमुना ग्रंथालय नियमावली

(१) हे ग्रंथालय अधिकृत सभासदांनाच वापरता येईल.

(२) ग्रंथालयात प्रवेश करताना वाचक नोंदवहीत आपली नोंद करावी.

(३) वाचकाने आपल्या मालकीचे साहित्य मालमत्ता काउंटरवर जमा करावे.

(४) ग्रंथालयात कोणतेही खाद्यपदार्थ आणण्यास सक्त मनाई आहे.

(५) ग्रंथालय परिसरात शांतता व स्वच्छता राखावी.

(६) ग्रंथालयात मोबाइल फोनचा वापर करण्यास मनाई आहे.

(७) वाचन कक्षात शांतता राखावी.

(८) तात्पुरत्या वाचनासाठी घेतलेले ग्रंथ त्याच दिवशी निर्धारित वेळेत परत करावेत.

(९) ग्रंथालयाच्या ग्रंथांवर, टेबल अथवा भिंतींवर काहीही लिहू नये.

(१०) वाचन कक्षात कचरा टाकू नये. त्यासाठी ठेवलेल्या कचरापेटीचाच वापर करावा.

(११) ग्रंथालयातील मालमत्तेचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई घेतली जाईल.

(१२) ग्रंथालय सेवकांशी वाद घालू नये. आपल्या काही अडचणी असतील तर ग्रंथपालांशी संपर्क साधावा.

(१३) आपले सदस्यत्व रद्द करायचे असल्यास पूर्वसूचना देवून आपल्या नावावर असलेले ग्रंथ ग्रंथालयात जमा करावेत. तसेच विलंब शुल्क जमा करावे.

(१४) अनामत रक्कम परत मिळण्यासाठी स्वतंत्र अर्ज भरून द्यावा लागेल.

(१५) गैरवर्तन करणाऱ्या सभासदाचे सदस्यत्व निलंबित अथवा रद्द करण्याचा ग्रंथपालास अधिकार आहे.

ग्रंथ देव-घेव विभागाचे नियम

(१) ग्रंथ वाचण्यास घरी नेण्यासाठी ग्रंथालयाचे सदस्यत्व घ्यावे लागेल.

वापर करता येईल.

(४) सदस्यपत्र हरवल्यास त्वरित ग्रंथालयास कळवावे. नवीन सदस्यपत्रासाठी ...... रुपये आकार पडेल.

(५) आपले सदस्यपत्र दुसऱ्या व्यक्तीस वापरास देऊ नये. तसे आढळल्यास आपले सदस्यत्व रद्द केले जाईल याची नोंद घ्यावी.

(६) वर्तमानपत्रे आणि मासिके वाचन कक्षातच वाचनासाठी मिळतील.

(७) ग्रंथालय अधिकार मंडळाने ठरवलेल्या संख्येच्या मर्यादेतच ग्रंथ दिले जातील.

(८) घरी नेलेला ग्रंथ दिलेल्या मुदतीतच परत करावा.

(९) मागणी नसलेल्या ग्रंथाचीच मुदत वाढवली जाईल. एका ग्रंथासाठी जास्तीत जास्त तीन वेळेला मुदतवाढ मिळेल.

(१०) ग्रंथ वेळेत परत न दिल्यास प्रतिदिन .... रुपये याप्रमाणे विलंब शुल्क आकारणी करण्यात येईल.

(११) ग्रंथ काळजीपूर्वक हाताळावा. ग्रंथातील पानांवर कुठल्याही नोंदी व खुणा करू नयेत.

(१२) वाचताना पाने फाडू अथवा दुमडू नयेत. आठवणीसाठी खूण चिठ्ठीचा वापर करावा.

(१३) संदर्भ ग्रंथ तसेच दुर्मीळ ग्रंथ फक्त ग्रंथालयातच वाचनासाठी उपलब्ध करून दिले जातील.

(१४) ग्रंथ खराब अथवा गहाळ झाल्यास त्याची नवीन प्रत आणून द्यावी लागेल. ग्रंथ बाजारात उपलब्ध नसल्यास ग्रंथाची मूळ रक्कम आणि दंड भरावा लागेल. ही रक्कम नियमानुसार ग्रंथपाल ठरवतील.

(१५) ग्रंथ खंडातील एखादा खंड गहाळ झाल्यास संपूर्ण नवीन संच आणून द्यावा लागेल.

(१६) आवश्यकता भासल्यास एखादे पुस्तक वेळेआधी परत मागवण्याचा ग्रंथपालास अधिकार आहे.

(१७) ग्रंथालयात प्रतिरूप मुद्रणाची (Reprographic) सुविधा उपलब्ध आहे. त्यासाठी प्रत्येक पानास .... रुपये आकारण्यात येतील.

(१८) घरी नेलेल्या ग्रंथांचे प्रतिरूप मुद्रण करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाईस वाचक जबाबदार राहील.

सर्वसाधारणपणे ई-ग्रंथालयासाठीचे नियम थोडे वेगळे असतात.

ई-ग्रंथालय वापरण्यासाठीचे नियम

सद्यस्थितीत ग्रंथालये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करत असून छापील माहिती स्रोतांबरोबरच इलेक्ट्रॉनिक माहिती साधनेसुद्धा वाचकांना ई-ग्रंथालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जातात. छापील वाचन संग्रहाप्रमाणेच या कक्षाच्या सुयोग्य वापरासाठी काही नियम करावे लागतात ते पुढीलप्रमाणे

(१) ई-ग्रंथालयातील संगणकाचा वापर काळजीपूर्वक करावा.

(२) उपलब्धतेनुसार संगणक वापरासाठी दिला जाईल. ठरावीक जागेसाठी अथवा संगणकासाठी आग्रह करू नये.

(३) संगणकावर दिलेल्या युजर नेम आणि पासवर्ड द्वारेच लॉग-इन करावे.

(४) वैयक्तिक कामासाठी संगणकाचा वापर करता येणार नाही.

(५) कोणत्याही परिस्थितीत बाहेरील पेन ड्राईव्ह (Pen Drive) अथवा सीडी (CD) वापरू नयेत.

(६) प्रिंट साठी एका पृष्ठास ... रुपये आकारण्यात येतील.

(७) संगणक लॅबमध्ये प्रवेश करताना उपलब्ध असलेल्या नोंदवहीत प्रत्येक विद्यार्थ्याने नोंद करावी.

ग्रंथालय सेवकांसाठी नियम

ग्रंथालयात जसे वाचकांसाठी नियम केले जातात त्याचप्रमाणे ते ग्रंथालय सेवकांसाठी सुद्धा केले जातात. जेणेकरून ग्रंथालय सेवक वाचकांना योग्यरीत्या सेवा

उपलब्ध करून देतील.

(१) सेवकांनी आपल्या निर्धारित वेळेपूर्वी किमान १० मिनिटे अगोदर उपस्थित राहावे.

(२) आपले ओळखपत्र दर्शनी भागावर दिसेल असे लावावे.

(३) वाचकांशी सौजन्याने वागावे.

(४) कामाव्यतिरिक्त आपली निर्धारित जागा सोडून जाऊ नये.

(५) काही अडचणी असतील तर ग्रंथपालांशी संपर्क साधावा.

सूचना पेटी

ग्रंथालय हे सतत सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्नशील असते. त्याकरिता वाचकांनी दिलेल्या सूचनांचा विचार हा ग्रंथालयीन संग्रह वाढवण्यासाठी तसेच ग्रंथसंग्रहाची गुणवत्ता सुधारण्याकरिता केला जातो. सूचना नोंदी ह्या सूचना वहीत नोंद करून त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद करावी.



ग्रंथालयात वाचकांच्या सूचनांसाठी सूचना पेटी सर्वांच्या दृष्टिक्षेपात येईल अशी ठेवली जाते आणि त्याजवळ खालीलप्रमाणे मजकूर सूचना फलकावर लावण्यात येतो.

> **टीप :** आपल्या सूचना ग्रंथालयाच्या प्रवेशद्‌वाराजवळ असलेल्या सूचना पेटीतच टाकाव्यात. योग्य त्या सूचनांची निश्चितच दखल घेतली जाईल. वरील नियम आपल्या हितासाठीच आहेत त्यांचे पालन करून ग्रंथालयास सहकार्य करावे. परिस्थितीनुरूप ग्रंथालयाचे नियम बदलण्याचा ग्रंथालय समितीस अधिकार आहे. नवीन नियम पूर्वसूचनेने अमलात आणले जातील.

स्वाध्याय

१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

(१) ग्रंथालयांच्या उद्‌दिष्टपूर्तीसाठी ——— यांचे नियोजन व व्यवस्थापन म्हणजे ग्रंथालय व्यवस्थापन होय.

(अ) ग्रंथसंग्रह (ब) मनुष्यबळ (क) इंटरनेट (ड) ग्रंथसंग्रह, मनुष्यबळ, आर्थिक व साधन सामग्री

(२) आय.एस.बी.एन. चे पूर्ण रूप ——— आहे व तो ——— अंकी आहे.

(अ) इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर, ४

(ब) इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर, ९

(क) इंटरनॅशनल स्टुडंटस् बुक नेटवर्क, १५

(ड) इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर, १३

(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

	'अ' गट	'ब' गट
(१)	आयएसएसएन	१३ अंकी
(२)	आयएसबीएन	०८ अंकी
(३)	कॉपीराइट ॲक्ट	१९५७
(४)	दाखल नोंदवही	ग्रंथालयाचा अनावश्यक दस्तऐवज

(क) खालील विधाने व योग्य कारणे यांची सांगड घालून दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायांची निवड करा.

(१) विधान (अ): दाखल नोंदवही हा ग्रंथालयाचा महत्वाचा दस्तऐवज आहे.

कारण (ब): तो ग्रंथालयाचा अधिकृत दस्तऐवज आहे.

पर्याय : (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(२) विधान (अ) : ग्रंथपालाची व्यवस्थापक म्हणून नियोजन, संघटन, मनुष्यबळ व्यवस्थापन, निर्देशन, समन्वय व अंदाजपत्र तयार करणे ही कार्ये आहेत.
कारण (ब) : ग्रंथालये ही ग्रंथालय सेवांची निर्मिती करणाऱ्या संस्था आहेत.

पर्याय : (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(ड) नावे लिहा.

(१) ''व्यवस्थापन हे एक बहुउद्देशीय कार्य आहे की ज्याद्वारे व्यवसाय, व्यवस्थापक, कामकाज आणि कर्मचारी इत्यादींचे नियोजन केले जाते.'' ही व्याख्या सांगितली ....

(२) ''अनुमान काढणे, नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय साधणे आणि नियंत्रण करणे म्हणजे व्यवस्थापन होय.'' ही व्याख्या लिहिली ....

२. पुढील प्रश्नांची दोनशे शब्दांत उत्तरे लिहा.

(१) ग्रंथालय व्यवस्थापनाची कार्ये उदाहरणासह स्पष्ट करा.

(२) दाखल नोंदवही म्हणजे काय? दाखल नोंदवहीची ग्रंथालयातील गरज स्पष्ट करा. त्यातील रकान्यांचे महत्त्व वर्णन करा.

(३) ग्रंथालयातील विविध विभाग कोणते ते लिहा. कोणत्याही एका विभागाचे कार्य सविस्तरपणे स्पष्ट करा.

३. पुढील विधाने चूक की बरोबर सांगून ती सकारण स्पष्ट करा.

(१) ग्रंथालयाचे कार्य करताना व्यवस्थापनाच्या विविध कार्यांची गरज असते.

(२) ग्रंथपालातील नेतृत्व गुणांमुळे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

४. टीपा लिहा.

(१) उपार्जन विभागातील दस्तऐवज
(२) वितरक नोंदवहीचे महत्त्व
(३) आयएसबीएन व आयएसएसएन

५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

(१) ग्रंथपालाची कार्ये विशद करा.

(२) ग्रंथालयातील विविध विभाग कोणते ते सांगून कोणत्याही एका विभागातील कार्ये व त्यातील दस्तऐवज यांचे वर्णन करा.

उपक्रम

१. आपल्या परिसरातील किमान एका ग्रंथालयाला भेट देऊन तेथील व्यवस्थापन कार्ये जाणून घ्या.

२. ग्रंथालय नियमांविषयी वाचकांची मते जाणून घ्या. त्यावर आधारित आपल्या महाविद्यालयासाठी आदर्श नियमावली तयार करा.

⌘⌘⌘

घटक ३. ग्रंथालयातील वाचन साधनांवरील तांत्रिक प्रक्रिया

प्रास्ताविक

ग्रंथालयात विविध वाचन साहित्य हे अध्ययन आणि अध्यापनाच्या दृष्टीने खरेदी केले जाते. या वाचन साहित्याचा वाचकांना सहजासहजी उपयोग करता यावा याकरिता त्यांच्यावर काही पद्धतशीर प्रक्रिया कराव्या लागतात. यासाठी प्रत्येक ग्रंथालयात तांत्रिक प्रक्रिया विभाग असतो. या विभागाद्वारे वर्गीकरण, तालिकीकरण व वाचन साहित्याची तपासणी इत्यादी प्रक्रिया उपार्जित वाचन साहित्यावर केल्या जातात. या प्रक्रियांना तांत्रिक प्रक्रिया असे म्हणतात. तांत्रिक प्रक्रियांमध्ये प्रामुख्याने वर्गीकरण आणि तालिकीकरण या प्रक्रिया अत्यंत सूक्ष्मपणे व काळजीपूर्वक कराव्या लागतात.

ग्रंथांचे वर्गीकरण ग्रंथालयाच्या धोरणानुसार निश्चित केलेल्या वर्गीकरण पद्धतीनुसार केले जाते. ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धती, कोलन वर्गीकरण पद्धती, युनिव्हर्सल डेसिमल वर्गीकरण पद्धती इत्यादी वर्गीकरणाच्या पद्धती आहेत. तालिकीकरणाचे स्वरूप हे तालिका संहितेवर अवलंबून असते. काही संगणकीकृत ग्रंथालयांत संगणकाच्या साहाय्यानेही ग्रंथांवर तांत्रिक प्रक्रिया केल्या जातात.

प्रत्येक ग्रंथाचा वाचकांपर्यंतचा प्रवास या विभागापासून सुरू होतो. तांत्रिक विभाग हा उपार्जन (Acquisition) विभाग व देवघेव विभाग या दोहोंमधील सेतू आहे.

ग्रंथालयातील वाचन साहित्यावरील तांत्रिक प्रक्रियेची आवश्यकता : तांत्रिक प्रक्रियेची आवश्यकता पुढील बाबींच्या साहाय्याने विशद करता येईल.

ग्रंथांची रचना वाचकांना सोईची होईल अशा पद्धतीने करणे गरजेचे असते.

वाचन साहित्याचे वर्गीकरण व रचना अशा पद्धतीने करावी लागते की एका विषयावरील सर्व वाचन साहित्य एकत्र येईल.

वाचकांच्या माहितीविषयक गरजांचे समाधान होण्याच्या दृष्टीने वाचन साहित्याची पद्धतशीरपणे रचना (Arrangement) करावी लागते.

तांत्रिक प्रक्रियेसाठी विविध साधने उपयोगात आणावी लागतात.

(१) वर्गीकरण पद्धतीची शेड्युल/शेड्युल्स (Classification Schedules)

(२) तालिका संहिता (Catalogue Code)

(३) नियंत्रित संज्ञा कोश किंवा विषय शीर्षक यादी (Controlled Vocabulary (Thesaurus), Subject Heading List)

३.१ वर्गीकरण : एक सामान्य संकल्पना – मनुष्याच्या जीवनात वर्गीकरणाच्या प्रकियेचा अवलंब सर्वत्र होत असल्याचे आढळते. ज्या व्यक्तींना कोणतेही कार्य पद्धतशीरपणे करण्याची सवय असते त्या व्यक्ती वर्गीकरणाच्या क्रियेचा अथवा प्रक्रियेचा जास्तीत जास्त उपयोग करतात. वर्गीकरणाची प्रक्रिया व्यक्तींकडून जाणीवपूर्वक अथवा अजाणतेपणाने केली जात असते. आपण आपल्या दैनंदिन कार्यात नकळतपणे वर्गीकरण करत असतो.

सामान्य व्यवहारातही आपणांस वर्गीकरणाचा उपयोग केल्याचे दिसून येते. उदा., भाजीविक्रेत्याच्या स्टॉलवर विविध प्रकारच्या भाज्या स्वतंत्र टोपल्यांमध्ये (बास्केट) ठेवलेल्या असतात. व्यक्तींच्या समूहांचेही गरजेनुसार आपण विविध गट पाडतो. गट पाडण्याच्या या क्रियेलाच 'वर्गीकरण' असे म्हणतात. उदा., उंचीनुसार वेगवेगळ्या व्यक्तिसमूहांचे गट आपणांस पाडता येतात. साड्यांच्या दुकानातही साड्यांमध्ये उपयोग केलेल्या धाग्यांनुसार साड्यांचे विविध विभाग केलेले असतात. उदा., कॉटन साड्या, सिल्क साड्या, शिफॉन साड्या, चंदेरी वर्क केलेल्या साड्या इत्यादी, असे स्वतंत्र विभाग असतात.

प्राचीन रोममध्ये समाजातील व्यक्तींचे संपत्तीच्या आधारे गट केले जात असत. याठिकाणी एक बाब आवर्जून सांगावीशी वाटते की, असे समूह, गट अथवा विभाजन करताना काही विशिष्ट निकष ठरवले जात असत. त्या निकषांच्या आधारेच वर्गीकरणाची प्रक्रिया पार पाडली जाते. यापुढे आपण 'वर्गीकरण' ही संकल्पना

ग्रंथालयाच्या संदर्भात अभ्यासणार आहोत. वर्गीकरणाकरता उपयोगात आणलेल्या निकषांचा उपयोग म्हणजेच वर्गीकरणाच्या भाषेत (classificatory language) त्यांना 'गुणवैशिष्ट्ये' (characteristics) असे म्हणतात. गट अथवा समूह करताना एकसारखी गुणवैशिष्ट्ये असलेल्या वस्तू एकत्रित ठेवल्या जातात व विजोड अथवा विषम वस्तू बाजूला केल्या जातात.

सामान्य व्यवहारात 'वर्गीकरण' या क्रियेची व्याख्या पुढीलप्रमाणे –

"एकसारखी गुणवैशिष्ट्ये असलेल्या वस्तूंचा एक संच/गट केला जातो व वेगळी गुणवैशिष्ट्ये असलेल्या वस्तूंचा (unlike things) वेगळा गट केला जातो. या क्रियेस वर्गीकरण असे म्हणतात."

उदा., व्यक्तींचा समूह जर देशानुसार केला तर – भारतीय, अमेरिकन, श्रीलंकन, ब्रिटिश, रशियन इत्यादी. म्हणजे विशिष्ट भूभागात राहणाऱ्या लोकांचा एक समूह तयार होतो. येथे 'भूभाग' या गुणवैशिष्ट्यांचा उपयोग करून व्यक्तींचा समूह केल्याचे दिसून येते. म्हणजेच वर्गीकरण ही एक वैचारिक प्रक्रिया आहे. विचारशीलता हा मानवाचा गुण आहे. त्यामुळे तो वर्गीकरणाच्या प्रक्रियेचा अवलंब करतो.

३.१.१ ग्रंथ वर्गीकरण–संकल्पना व व्याख्या :

ग्रंथालयात ग्रंथांचे वर्गीकरण विविध कारणांमुळे करावे लागते. यांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित ग्रंथ ज्या विषयावरील आहे त्याला त्याच विषयाच्या रांगेत स्थान मिळायला हवे. तरच हवा असलेला ग्रंथ वाचकांना योग्य वेळी प्राप्त होऊ शकेल. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रंथालयातील एकाच विषयावरील ग्रंथसंग्रह एकत्र असल्यामुळे त्या विषयावरील सर्व ग्रंथ सहजासहजी हाताळणे (browsing) सोपे होते. प्रत्येक ग्रंथास विशिष्ट वर्गांक दिला असल्याने वाचकांनी उपयोग केल्यानंतर ग्रंथालयात परत केल्यावर तो योग्य स्थानी ठेवण्यास मदत होते व इतर वाचकांना तो पुन्हा उपलब्ध होण्यास सोईचे होते.

'ग्रंथ वर्गीकरण' व्याख्या

(१) "ग्रंथ वर्गीकरण म्हणजे ग्रंथालयात खरेदी केलेल्या वाचन साधनांचे वर्गीकरण होय. वर्गीकरणाच्या प्रक्रियेत ग्रंथातील ज्ञानविश्वाचे विभाजन ग्रंथालयाने निवडलेल्या वर्गीकरण पद्धतीनुसार केले जाते. ज्ञान विश्वाचे अथवा ग्रंथांमधील विविध विषयांचे गट पाडल्यानंतर एका विषयावरील ग्रंथ एकत्रित ठेवले जातात व त्यांची श्रेणीनुसार रचना केली जाते."

(२) बर्विक सेयर्स यांच्या मते, "ग्रंथ वर्गीकरण म्हणजे ग्रंथालयाच्या शेल्फवरील ग्रंथांची व्यवस्था अथवा त्यांचे वर्णन की जे वाचकांना उपयुक्त आहे."

(३) डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी केलेली व्याख्या, ''विविध विषय नामांचे नैसर्गिक भाषेतून क्रमवाचक अंकांच्या कृत्रिम भाषेत रूपांतर करणे म्हणजे ग्रंथ वर्गीकरण होय.''

वरील व्याख्येनुसार वर्गीकरण व श्रेणीनुसार रचना म्हणजे प्रत्येक विषयाचा स्वतंत्र गट व त्या गटांतर्गत उपविषयांनुसार ग्रंथांची रचना केली जाते.

थोडक्यात, ग्रंथ वर्गीकरण म्हणजे एकाच विषयावरील ग्रंथांचे विषय व उपविषयांच्या आधारे 'गट' किंवा 'समूह' निर्माण करणे होय. वर्गीकरण करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे वाचकांना त्यांचे वाचन साहित्य सुलभरित्या, कार्यक्षमपणे व सहजगत्या प्राप्त व्हायला हवे. ग्रंथांचे वर्गीकरण करताना ग्रंथाचा आकार, लेखक यांचा विचार केला जात नाही. केवळ ग्रंथांच्या विषयाचाच विचार केला जातो.

ग्रंथ वर्गीकरणाचा हेतू

वाचन साधनांचा उपयोग व्हावा या दृष्टीने वर्गीकरणाची प्रक्रिया केली जाते. वर्गीकरणाचे हेतू पुढीलप्रमाणे –

(अ) वर्गीकरण म्हणजे कपाटातील ग्रंथांचे स्थान निश्चित करणे.

(आ) ग्रंथालय कर्मचारी व वाचकांना वाचन साहित्याचा विषयानुसार सोईस्कररीत्या शोध घेता येणे.

(इ) वाचकांनी नेलेला ग्रंथ ग्रंथालयात परत केल्यावर पुन्हा त्याच जागेवर तो ठेवता यावा याकरिता वर्गीकरण अत्यावश्यक आहे.

(ई) ग्रंथालयातील अनावश्यक व निरुपयोगी वाचन साधने ग्रंथ संग्रहाबाहेर काढण्याकरिता व ग्रंथ रद्दबातल करण्यासाठी वर्गीकरणाचा उपयोग होतो.

(उ) नव्याने खरेदी केलेले ग्रंथ वर्गीकरणानंतर त्यांच्या विषयानुसार त्या विषयाच्या गटात योग्य त्या ठिकाणी ठेवण्यास मदत होते.

(ऊ) तालिकेत ग्रंथाविषयीची माहिती शोधल्यानंतर तालिकापत्रावरील ग्रंथाचा वर्गांक घेऊन त्या वर्गांकाच्या साहाय्याने संबंधित विभागात ठेवलेला तो ग्रंथ त्वरित शोधता येतो.

(ए) प्रत्येक ग्रंथास स्वतंत्र वर्गांक (व्यक्तिगत वर्गांक) दिला जातो. त्यामुळे त्या ग्रंथास व्यक्तिगत क्रमांक प्राप्त होतो. या वर्गांकामुळेच त्याची स्वतंत्र ओळख निर्माण होते.

(ऐ) एखाद्या विषयावरील ग्रंथांची सूची तयार करायची असल्यास वर्गांकाच्या साहाय्याने संबंधित विभागातील सर्व ग्रंथ एकत्रित प्राप्त होतात. त्यामुळे त्या सर्वांची सूची तयार करणे सोपे होते.

(ओ) ग्रंथ पडताळणीचे कार्य सहजपणे करता येते.

हे नेहमी लक्षात ठेवा.

ग्रंथशोधात विषय दृष्टिकोनाचे महत्त्व : ग्रंथ वर्गीकरण करताना ग्रंथाचा आकार, लेखक, रंग व पृष्ठे यांचा विचार न करता फक्त ग्रंथातील विषय दृष्टिकोनाचा विचार केला जातो.

३.१.२ ग्रंथवर्गीकरणाची विशेष वैशिष्ट्ये

३.१.२.१ संकीर्णवर्ग (Generalia Class) विशिष्ट विषयांवरील ग्रंथांशिवाय काही ग्रंथ असे असतात की, ज्यामध्ये असलेली माहिती ही अनेक विषयांशी संबंधित असते. त्यामुळे अशा ग्रंथांचे वर्गीकरण एका विषयांतर्गत करता येत नाही. म्हणून वर्गीकरण पद्धतीमध्ये अशा ग्रंथांकरिता एक विशेष वर्ग निर्माण केलेला असतो. अशा वर्गालाच 'संकीर्ण वर्ग' असे म्हणतात.

३.१.२.२ स्वरूप वर्ग (Form Class) : वाङ्मयीन क्षेत्राशी संबंधित जे वाचन साहित्य लिहिले जाते त्यात ते कोणत्या स्वरूपात लिहिलेले आहे यास महत्त्व असते. अशा साहित्यिक कलाकृतींचे वर्गीकरण हे त्यांच्या स्वरूपानुसार करावे लागते. यालाच 'स्वरूप वर्ग' असे म्हणतात. उदा., कविता, नाटक, कादंबरी, कथा, ललित निबंध, प्रवासवर्णन इत्यादी. असे स्वरूप वर्ग वाङ्मय या मुख्य विषयांतर्गत प्रत्येक वर्गीकरण पद्धतीत निर्माण केलेले असतात.

३.१.२.३ स्वरूप विभाग (Form Division): विविध विषयांतील माहिती ही ग्रंथांशिवाय इतरही स्वरूपात प्रकाशित केली जाते. उदा., नियतकालिक, ॲटलास, नकाशे, विवेचनात्मक निबंध, शब्दकोश, ज्ञानकोश इत्यादी. या विविध प्रकारच्या माहिती साधनांकरिता व मुख्य विषयास जोडण्याकरिता काही क्रमांक हे वर्गीकरण पद्धतीमध्ये वेगळ्या तक्त्यांमध्ये दिलेले असतात. यालाच 'स्वरूप विभाग' असे म्हणतात. यांचे क्रमांक हे सामाईक असतात. ते कोणत्याही विषयास जोडता येतात. ते लक्षात ठेवण्यासही सुलभ असतात.

३.१.२.४ चिन्हांकन (Notation) : ग्रंथ वर्गीकरण पद्धतीमध्ये विषयांचे प्रतिनिधित्व दर्शवण्यासाठी विशिष्ट चिन्हांचा उपयोग केला जातो. त्यास 'चिन्हांकन' असे म्हणतात. वर्गीकरणाच्या अनेक पद्धतींपैकी जी पद्धत ग्रंथालयात वापरली जाते त्या पद्धतीत वापरलेली चिन्हे ग्रंथ वर्गीकरणासाठी वापरावी लागतात. उदा., शून्य ते नऊ ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीचे चिन्हांकन आहे. एक प्रकारे चिन्हांकनाच्या साहाय्याने ग्रंथामधील नैसर्गिक विषय सांकेतिक चिन्हांच्या साहाय्याने दर्शवलेला असतो. या सांकेतिक अथवा कृत्रिम भाषेतील चिन्हांना 'चिन्हांकन' असे म्हणतात. चिन्हांकनांचा संच हा इंडो-अरेबिक नंबर्स अथवा इंग्रजी अल्फाबेटच्या स्वरूपातही असू शकतो. तसेच गणितीय चिन्हांचा वापरही चिन्हांकनात केला जाऊ शकतो. चिन्हांकन हे वर्गीकरण पद्धतीनुसार बदलत जाते.

चिन्हांकनाचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार सांगितलेले आहेत.

(अ) शुद्ध चिन्हांकन (Pure Notation): जेव्हा वर्गीकरण पद्धतीत एकाच प्रकारच्या चिन्हांचा उपयोग केला जातो तेव्हा अशा प्रकारचे चिन्हांकन हे 'शुद्ध चिन्हांकन' असते. उदा., ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीतील चिन्हांकन हे शुद्ध चिन्हांकन (१८ व्या

आवृत्तीपर्यंत) होते. या पद्धतीत केवळ शून्य ते नऊ या इंडो-अरेबिक क्रमांकांचा उपयोग चिन्हांकन म्हणून केलेला आहे.

(आ) मिश्र चिन्हांकन (Mixed Notation): जेव्हा एखाद्या वर्गीकरण पद्धतीतील चिन्हांकनात एकापेक्षा जास्त चिन्हांकनांचे संच वापरलेले असतात अशा चिन्हांकांना 'मिश्र चिन्हांकन' असे म्हणतात. मिश्र चिन्हांकनामुळे वर्गीकरण पद्धतीमध्ये सखोल वर्गीकरणाची सोय होते. कोलन वर्गीकरण पद्धतीचे चिन्हांकन हे मिश्र चिन्हांकन होय. या पद्धतीतील चिन्हांकनात इंग्रजी वर्ण : A–Z, a–z, (i,l,o सोडून) इंडो-अरेबिक क्रमांक शून्य ते नऊ, गणितीय चिन्हांकने : Δ आणि Σ, विरामचिन्हे – स्वल्पविराम (,), अर्धविराम (;), विसर्गचिन्ह (:), अवतरणचिन्ह ('), पूर्णविराम (.), गोल कंस-स्टार्टर (, ॲरेस्टर) इत्यादी.

३.१.२.५ निर्देश (Index) : प्रत्येक वर्गीकरण पद्धतीत निर्देश समाविष्ट करणे अत्यावश्यक असते. वर्गीकरण पद्धतीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व विषय संज्ञांची अनुवर्णक्रमानुसार रचना वर्गीकरण पद्धतीच्या शेवटी दिलेली असते. यालाच निर्देश असे म्हणतात. वर्गीकरण करणारी व्यक्ती ही सर्व विषयांशी व त्यातील उपविषयांशी पूर्णपणे परिचित असेलच असे नाही. विविध विषयांवरील ग्रंथांचे वर्गीकरण करताना वेळेचा अपव्यय टाळण्याकरिता निर्देशाचा उपयोग होतो. निर्देशामध्ये संबंधित ग्रंथात वर्णन केलेल्या विषयाच्या संज्ञेसमोर संबंधित वर्गांक दिलेला असतो. त्यामुळे वर्गीकरण करणाऱ्या व्यक्तीस त्वरित विषय माहिती होतो व तो त्या विषयाच्या सारणीकडे जाऊ शकतो.

३.१.३ ग्रंथ वर्गीकरणाच्या विविध पद्धती

सध्या जगात वापरल्या जाणाऱ्या काही ग्रंथ वर्गीकरण पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

(१) बिब्लियोग्राफिक क्लासिफिकेशन (BC)

(२) कोलन क्लासिफिकेशन (CC)

(३) ड्युई डेसिमल क्लासिफिकेशन (DDC)

(४) लायब्ररी ऑफ कॉंग्रेस क्लासिफिकेशन (LC)

(५) युनिव्हर्सल डेसिमल क्लासिफिकेशन (UDC)

वरील ग्रंथवर्गीकरण पद्धतींपैकी ड्युई डेसिमल क्लासिफिकेशन (DDC) व कोलन क्लासिफिकेशन (CC) या दोन पद्धती भारतीय ग्रंथालयांमध्ये प्रामुख्याने वापरल्या जातात.

३.१.३.१ ड्युई डेसिमल वर्गीकरण (Dewey Decimal Classification) पद्धती : ही वर्गीकरण पद्धती मेलविल ड्युई यांनी १८७६ मध्ये निर्माण करून ग्रंथालयीन वर्गीकरणात मोठा हातभार लावला आहे. ही वर्गीकरण पद्धती जगातील बहुतांश देशात लोकप्रिय झाली आहे. ही पद्धती जेव्हा अस्तित्वात आली तेव्हा तिची पहिली आवृत्ती ही केवळ चव्वेचाळीस पृष्ठांची बनलेली होती. कालांतराने ती अनेक खंडांत विस्तारित स्वरूपात प्रकाशित झाली. आजपर्यंत या वर्गीकरण पद्धतीच्या एकूण २३ आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. पहिल्या आवृत्तीपासून ते तेविसाव्या आवृत्तीपर्यंतचा इतिहास हा आपणांस सोबतच्या तक्त्यात दिसून येईल.



मेलविल ड्युई (१८५१-१९३१)

Edition	Year of Publication	Total Pages	Editors
1	1876	44	Melvil Dewey
2	1885	314	Melvil Dewey and W.S. Biscoe
3	1888	416	Melvil Dewey and W.S. Biscoe
4	1891	466	E. May Seymour
5	1894	467	E. May Seymour
6	1899	511	E. May Seymour
7	1911	792	E. May Seymour
8	1913	850	E. May Seymour
9	1915	856	E. May Seymour
10	1919	940	E. May Seymour
11	1922	988	J. Dorkas Fellows
12	1927	1243	J. Dorkas Fellows
13	1932	1647	J. Dorkas Fellows
14	1942	1927	J. Dorkas Fellows and M. W. Getchell
15	1951	716	Milton J. Furgusom
15 Revised	1952	927	Godfrey Dewey
16	1958	2439	Dengamin A Custer and D. Haykin
17	1965	2153	Dengamin A Custer and D. Haykin

18	1971	2718	Dengamin A Custer
19	1979	3385	Dengamin A Custer
20	1989	3388	Dengamin A Custer
21	1996	4115	J.P. Comaromi
22	2003	4076	J. Mitchell
23	2011	4174 (4 Vols)	J. Mitchell

छोट्या व मध्यम स्वरूपाच्या ग्रंथालयांकरिता या वर्गीकरण पद्धतीच्या संक्षिप्त आवृत्त्याही (Abridged versions) प्रकाशित करण्यात येतात. सध्या या वर्गीकरण पद्धतीच्या प्रकाशनाची जबाबदारी ओसीएलसी (Online Computer Library Centre, Chicago) या संस्थेकडे आहे. तसेच या वर्गीकरण पद्धतीची ऑनलाईन स्वरूपातही डिजिटल आवृत्ती (Web Dewey) उपलब्ध आहे (https://www.oclc.org>dewey>web).

ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीचा आराखडा

या वर्गीकरण पद्धतीमध्ये ज्ञान विश्वाचे एकूण दहा प्रमुख वर्गात (मुख्य विषय) विभागणी केलेली आहे. यामध्ये तत्वज्ञान, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतिहास या प्रमुख ज्ञान शाखा आहेत. प्रत्येक प्रमुख विषय हा पुढे दहा विभागांत (Divisions) विभागलेला आहे. प्रत्येक विभाग हा पुढील दहा घटकांत (Sections) विभागलेला आहे. हा वर्गीकरण आराखडा उतरंडीच्या (hierarchical) स्वरूपात असून चिन्हांकनातही उतरंडीचा उपयोग करण्यात आलेला आहे. म्हणजे जेव्हा विषय व्यापक असतो (मूळ विषय) तेव्हा चिन्हांकन छोटे असते व विषय जसजसा सूक्ष्म अथवा सखोल होत जातो तसतसे चिन्हांकनाची लांबी वाढत जाते. उदा.,

500	Natural Sciences
510	Mathematics
516	Geometry
516.3	Analytical Geometry
516.37	Metric Differential Geometry
516.375	Finsler Geometry

ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीतील मुख्य वर्ग (DDC) : या वर्गीकरण पद्धतीत विषय विश्वाचे तेविसाव्या आवृत्तीनुसार दहा प्रमुख वर्गांत (Main Classes) विभाजन केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे :

000	Computer science, information and general works
100	Philosophy and psychology
200	Religion
300	Social sciences
400	Language
500	Science
600	Technology
700	Arts and recreation
800	Literature
900	History and geography

वरील प्रमुख दहा वर्गांचे पुन्हा दहा उपविभागांत (Divisions) विभाजन केले आहे. उदा.,

500	Science
510	Mathematics
520	Astronomy
530	Physics
540	Chemistry
550	Earth sciences and geology
560	Fossils and prehistoric life
570	Life sciences; biology
580	Plants (Botany)
590	Animals (Zoology)

वरील प्रत्येक उपविभागांचे पुन्हा दहा घटकांत (Sections) विभाजन केले आहे. उदा.,

510	Mathematics
511	General principles of mathematics
512	Algebra
513	Arithmetic
514	Topology
515	Analysis
516	Geometry
517	Not assigned
518	Numerical analysis
519	Probabilities and applied mathematics

या वर्गीकरण पद्धतीत मूळ विषयांव्यतिरिक्त सात तक्त्यांचा (Tables) वर्गांक तयार करण्यासाठी उपयोग

केला जातो. त्यामुळे सुरुवातीस ही वर्गीकरण पद्धती परिगणनात्मक स्वरूपाची होती. परंतु सात तक्त्यांचा (Tables) उपयोग होऊ लागल्यानंतर ती काही अंशी (partially) विश्लेषण-संश्लेषणात्मक (Analytico-Synthetic) स्वरूपाची झाली आहे. नवीन आवृत्ती बहुसंश्लेषण (Multiple Synthesis) पद्धतीची झाली आहे. तेविसाव्या आवृत्तीत थोडासा बदल होऊन सात तक्त्यांऐवजी (Tables) सहाच तक्ते समाविष्ट आहेत. जसे की,

Table-1	-	Standard Subdivisions
Table-2	-	Geographic Areas, Historical Periods, Persons
Table-3	-	Subdivisions of individual literatures, specific literary forms and the Arts
Table-4	-	Subdivisions of individual languages
Table-5	-	National and ethnic groups
Table-6	-	Languages

या वर्गीकरण पद्धतीचा आराखडा

खंड १ : हा खंड डीडीसी ची प्रस्तावना स्पष्ट करतो. यामध्ये प्रत्येक विषयाच्या सारणीचे मॅन्युअल व सिद्धान्त तसेच तत्त्वे सोप्या पद्धतीने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे डीडीसीमध्ये वापरलेल्या विविध संज्ञांचा व संकल्पनांचा कोशही स्पष्टीकरणासह दिलेला आहे. इतर पृष्ठांमध्ये मॅन्युअल, सहा तक्ते (Six Tables) आणि तयार वर्गांक तसेच न वापरलेले वर्गांक यांची यादी (list) दिलेली आहे.

खंड २-३ : हे दोन्हीही खंड ज्ञान विश्वातील सर्व विषयांच्या सारण्यांकरिता आहेत. प्रत्येक विषयाच्या सारणीपूर्वी (Schedule) तीन प्रमुख सारांश तीन भागांत दिलेले आहेत. पहिला नंबर हा मुख्य वर्ग (Main Class) आहे. दुसरा नंबर हा पहिले विभाजन विभाग (Division) व तिसरा नंबर हा विभाजनानंतरचे उपविभाग (Section) आहे. या तीन सारांश सारण्यांमुळे (Summeries)एकाच दृष्टिक्षेपात प्रत्येक ज्ञानशाखेची रचना डीडीसीनुसार नजरेसमोर येते. खंड २ मध्ये मुख्य वर्ग 000 ते 599 तर खंड ३ मध्ये मुख्य वर्ग 600 ते 999 पर्यंतच्या विषयांच्या सारण्या आहेत.

खंड ४ : सापेक्ष निर्देश (Relative Index) या खंडात दिलेला आहे. विषय व त्याच्याशी संबंधित संज्ञा मुख्य संज्ञेअंतर्गत अनुवर्णक्रमानुसार दिलेल्या असतात. यामुळे मुख्य विषय व त्याच्याशी संबंधित इतर संज्ञा शोधण्यास मदत होते.

माहीत आहे का तुम्हांला?

ड्युई डेसिमल वर्गीकरण ही जगातील सर्वांत जास्त प्रमाणात वापरली जाणारी ग्रंथ वर्गीकरण पद्धती आहे. या वर्गीकरण पद्धतीच्या सुधारित आवृत्त्या



नियमितपणे प्रकाशित होत असल्याने ही अद्ययावत राहण्यास मदत होते. ही वर्गीकरण पद्धती वापरण्यास अतिशय सुलभ आहे.

ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीची वैशिष्ट्ये

(अ) या वर्गीकरण पद्धतीचे बदलते स्वरूप (Changing Nature of the Scheme) : ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीचा पाया सुरुवातीच्या काळात परिगणनात्मक स्वरूपाचा होता. परंतु १९ व्या आवृत्तीनंतर तिचे स्वरूप बहुसंश्लेषण (Multiple Synthesis) पद्धतीत झाले आहे. १८७६ च्या पहिल्या आवृत्तीपासून २०११ पर्यंत तेवीस आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. या वर्गीकरण पद्धतीची विविध भाषांमध्येही भाषांतरे झालेली आहेत. उदा., चायनीज, जापनीज, सिंहलीज, तुर्किश इत्यादी.

(आ) जागतिक स्वरूप (Universal Classification Scheme) : या वर्गीकरण पद्धतीला जागतिक वर्गीकरण पद्धती म्हणून मान्यता मिळाली आहे. कारण बहुतांश देशांमध्ये ती वापरली जाते.

(इ) सापेक्ष स्थान निश्चिती (Relative Location) : या वर्गीकरण पद्धतीमध्ये

निश्चित स्थान (Fixed Location) तत्त्वाऐवजी सापेक्ष स्थान (Relative Location) हे तत्त्व वापरलेले आहे. या पद्धतीत उपयोगात आणले गेलेले चिन्हांकन हे दशांश क्रमांक म्हणून उपयोगात आणलेले आहेत.

(ई) **दशांश चिन्हांकन (Decimal Notation) :** डीडीसी मधील सर्व चिन्हांकने ही दशांश अपूर्णांक (Decimal Fraction) म्हणून वापरलेली आहेत. त्यामुळे या चिन्हांकनात लवचीकता आलेली आहे. यामुळे नवीन विषयांना नवीन क्रमांक देण्यात व उपलब्ध वर्गांकामध्ये नवीन क्रमांक सामावून घेण्यास मदत होते. दशांश चिन्ह हे मुख्य वर्गाच्या सुरुवातीसच गृहीत धरलेले आहे. फक्त ते लिहिले जात नाही.

(उ) **सखोल वर्गीकरण करता येते (Minute Classification) :** बहुसंश्लेषणात्मकता व विविध तक्ते आणि चिन्हांकनाचे दशांश स्वरूप यामुळे सूक्ष्म विषयाचेही सखोल वर्गीकरण करता येते.


(ऊ) **स्मरण सुलभता (Mnemonics) :** स्मरण सुलभता हे या वर्गीकरण पद्धतीचे विशेष वैशिष्ट्य आहे. सामाईक विषयांवरील ग्रंथांचे वर्गीकरण सहजपणे करता येते. या पद्धतीत अनेक ठिकाणी स्मृती सुलभता प्राप्त झाली आहे. यामध्ये वर्गीकरणाच्या तक्त्यांमध्ये जी चिन्हे व क्रमांक दिलेले आहेत ते अनेक विषयांबरोबर वापरता येतात, उदा., सारणी स्मरण सुलभता (Scheduled Mnemonics), पद्धतशीर स्मरण सुलभता (Systematic Mnemonics), अनुवर्ण स्मरण सुलभता (Alphabetical Mnemonics). अशा स्मरण सुलभतेमुळे विषयाचे विश्लेषण करण्यास मदत होते. ही उपयुक्त साहाय्यकारी तंत्रे सर्व विषयांसाठीही उपयुक्त ठरतात. उदा., एक ते सहा तक्त्यांमध्ये (Tables) दिलेले क्रमांक हे कोणत्याही विषयास जोडता येता.f जसे, ०३ शब्दकोश, ०५ नियतकालिक इत्यादी.

(ए) **वर्गांकातील अथित्यशीलता (Hospitality of Numbers) :** या वर्गीकरण पद्धतीत मूळ विषयांच्या वर्गांकामध्ये बदल न करता नवीन ज्ञानशाखेतील विषयांना सामावून घेण्याचे कार्य सुलभरित्या करता येते.

(ऐ) **सहा तक्ते (Six Tables) :** तेविसाव्या आवृत्तीत ६ तक्ते असून ते विषयांचे विविध पैलू दर्शवतात. या ६ तक्त्यांमधील क्रमांक त्या त्या विषयातील दिलेल्या सूचनेनुसार कोणत्याही विषयाच्या वर्गांकास जोडता येतात.

३.१.३.२ कोलन वर्गीकरण (Colon Classification) पद्धती

पार्श्वभूमी (Background) : डॉ.एस.आर. रंगनाथन यांनी कोलन वर्गीकरण पद्धती विकसित केली. ही वर्गीकरण पद्धती प्रामुख्याने भारतीय ग्रंथालयांमध्ये वापरली जाते. या वर्गीकरण पद्धतीची प्रथम आवृत्ती १९३३ मध्ये प्रकाशित झाली. आजपर्यंत या वर्गीकरण पद्धतीच्या सात आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. सातव्या आवृत्तीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ती तीन विभागांत डॉ.एम.ए.गोपीनाथन यांनी सादर करून ही आवृत्ती प्रकाशित केली आहे. ही पैलूबद्ध वर्गीकरण (Faceted Classification) पद्धती होय. या वर्गीकरण पद्धतीत प्रत्येक विषयाचे पाच मूलभूत पैलू गृहीत धरलेले आहेत. म्हणजे, या पैलूंच्या आधारे प्रत्येक विषयाचे व उपविषयांचे विभाजन केलेले आहे. डॉ.रंगनाथन यांनी प्रत्येक विषयाचे किमान पाच पैलू गृहीत धरले आहेत. (Postulated Five Fundamental Facets/ Categories) ते पाच पैलू पुढीलप्रमाणे :



कोलन वर्गीकरण पद्धती

अ.क्र.	विविध पैलू		चिन्ह
(अ)	व्यक्तित्व पैलू	[P] (Personality)	, (कॉमा)
(आ)	साधन पैलू (वस्तू)	[M] (Matter)	; (सेमी कोलन)
(इ)	ऊर्जा पैलू (क्रिया)	[E] (Energy)	: (कोलन)
(ई)	स्थल पैलू	[S] (Space)	. (डॉट)
(उ)	कालदर्शक पैलू	[T] (Time)	' (सिंगल इनव्हर्टेड/ कोटेशन मार्क)

(अ) व्यक्तित्व पैलू (Personality): व्यक्तित्व पैलू हा प्रत्येक विषयाचा प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण उपविषय होय. हा मुख्य विषयातील प्रथम पैलू होय. तसेच मुख्य विषयाचा हा अविभाज्य घटक असतो. जो घटक मुख्य विषयातून वगळला असता तो स्वतंत्र विषय राहणार नाही असा घटक म्हणजे व्यक्तित्व. डॉ.रंगनाथन यांच्या मते व्यक्तित्व पैलू हे प्रत्येक विषयाचे साकार रूप होय. जसे, विविध प्रकारची ग्रंथालये ही ग्रंथालय शास्त्राची व्यक्तित्व पैलू होय. तसेच विविध रसायने ही रसायन शास्त्राची व्यक्तित्व पैलू आहेत. व्यक्तित्व पैलूशिवाय इतर उपविषयांचा विचार होऊ शकत नाही. म्हणून यास साकारपैलू समजले जाते.

(आ) साधन पैलू (Matter) : कोणतेही कार्य करण्यासाठी साहित्य, सामग्री, पदार्थ या वस्तू लागतात. अशा घटकांना 'साधन पैलू' असे म्हणतात. उदा., ग्रंथालयांमधील वाचन साहित्य, अर्थशास्त्रात चलन (विविध प्रकारचे).

(इ) ऊर्जा पैलू (Energy) : क्रिया, कृती किंवा प्रक्रिया दर्शवणाऱ्या संज्ञांचा समावेश 'ऊर्जा पैलू'त केला जातो. म्हणजेच या संज्ञा वस्तूंवर परिणाम घडवून आणत असतात. ह्यात क्रिया घडत असते. यासाठी ऊर्जेची गरज असते. म्हणून ह्यांना 'ऊर्जा पैलू' असे म्हणतात. उदा., ॲनालिसिस-केमिस्ट्रीमध्ये, ट्रीटमेंट-मेडीकल सायन्समध्ये व वर्गीकरण व तालिकीकरण-लायब्ररी सायन्समध्ये इत्यादी.

(ई) स्थल पैलू (Space) : कोणतेही कार्य किंवा क्रिया विशिष्ट स्थळी आकार घेत असते. अशा वेळेस त्या भौगोलिक स्थानाचा दृष्टिकोन विषयात दर्शवण्याकरिता स्थल पैलूचा उपयोग केला जातो. त्यालाच डॉ. रंगनाथन यांनी 'स्थल पैलू' असे संबोधले आहे. उदा., दिल्ली, पुणे, मुंबई इत्यादी.

(उ) कालदर्शक पैलू (Time): काही घटना या ठरावीक कालखंडात घडत असतात. अशा काळाशी निगडित कालखंडांची यादी कोलन वर्गीकरण पद्धतीत दिलेली आहे. अशा तक्त्यास 'कालदर्शक पैलू' असे म्हणतात. उदा., विसावे शतक, अठराशे पन्नासमधील भारताचा इतिहास.

कोलन वर्गीकरण पद्धतीची वैशिष्ट्ये

१. घटक विषयाचे पाच मूलभूत पैलू (Five fundamental categories).

२. विश्लेषण संश्लेषणात्मक वर्गीकरण पद्धती.

३. विविध उपायांचा (Devices) वापर, उदा., भौगोलिक तक्ते, काल तक्ते, सामान्य उपविभागांचे तक्ते इत्यादी.

४. स्मृती सुलभता (Mnemonics).

५. नवीन विषयांचे तसेच उपविषयांचे समावेशन सहजरीत्या करता येते.

६. निःपक्षपाती स्वरूप.

७. सखोल वर्गीकरण करता येते.

आराखडा : या वर्गीकरण पद्धतीतील विषयांची वर्गवारी व आराखडा खालीलप्रमाणे आहे.

१. मुख्य विषय (Main Class) : ज्या विषयांचा व त्यातील उपविषयांचा सर्वांगीण विकास झाला आहे, अशा विषयांना 'मुख्य विषय' म्हणून समजले जाते. उदा., गणित, रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, इतिहास, भूगोल इत्यादी. ज्या विषयांचा समावेश वर्गीकरण पद्धतीत करून त्यांना स्वतंत्र चिन्हांकन दिले जाते, अशा विषयांना 'मुख्य विषय' असे म्हणतात. अशा विषयांचे पुन्हा पाच पैलूंच्या आधारे विभाजन करून त्या विषयांतील उपविषयांची सारणी विकसित केली जाते.

२. उपविषय (Isolate Idea) : मुख्य विषयात अनेक उपविषय असतात. उपविषयांचे पाच प्रमुख पैलू डॉ.रंगनाथन यांनी कल्पिलेले (Postulated five fundamental categories) आहेत (पृष्ठ क्र.४५ वरील पैलूंचा तक्ता). याशिवाय, सामान्य उपविभाग

(Common Isolates) हे उपविषय म्हणून ग्राह्य धरलेले आहेत.

३. बहुपैलू असलेले विषय (Multi Faceted Subjects) : यामध्ये दोनपेक्षा अनेक पैलू एकत्र येतात अशा विषयांना बहुपैलू विषय असे म्हणतात.

> कोलन वर्गीकरण पद्धती ही विश्लेषण-संश्लेषणात्मक वर्गीकरण पद्धती (Analytico-Synthetic Classification System) होय.

विश्लेषणाच्या प्रक्रियेत ग्रंथातील नेमका विषय (Specific Subject), मुख्य विषय आणि त्याचे सर्व घटक विषय - व्यक्तित्व, साधन, क्रिया, स्थल आणि काल हे शोधून काढले जातात. नंतर त्यांची मांडणी व रचना प्रथम मुख्य विषय व नंतर उपविषय (PMEST) या क्रमाने केली जाते व संयोगचिन्हाच्या साहाय्याने एकत्रित जोडले जातात.

संश्लेषण प्रक्रियेत (Synthesis) मुख्य वर्ग व उपवर्ग यांची क्रमाने रचना केल्यानंतर प्रत्येक वर्ग व उप-वर्गाला चिन्ह दिले जाते व नियमानुसार संयोगचिन्हे वापरून मुख्य विषयाच्या व उपविषयांच्या चिन्हांची जोडणी केली जाते. अशा प्रकारे प्रत्येक विषयाचा वर्गांक निश्चित केला जातो. म्हणून या पद्धतीस विश्लेषण-संश्लेषणात्मक वर्गीकरण पद्धती असे संबोधले जाते. या पद्धतीत सर्व मुख्य विषय आणि उपविषयांसाठी सारण्या (Schedules) दिलेल्या असतात. या प्रकारच्या वर्गीकरण पद्धतीत तयार वर्गांक नसतात.

४. कोलन वर्गीकरण पद्धतीच्या चिन्हांकनाचा आराखडा : या वर्गीकरण पद्धतीचे चिन्हांकन हे मिश्र चिन्हांकन प्रकारचे आहे. यामध्ये पुढील चिन्हांकनांचा उपयोग केला आहे.

> **२३ कॅपिटल व स्मॉल वर्ण** - A-Z, a-z (i, l, o सोडून)
> **१० रोमन इंडो-अराबिक नंबर्स** - 0 ते 9
> **शुद्धलेखन चिन्हे** - , ; : . ‘
> **कंस (स्टार्टर व अरेस्टर)** - ( )
> **इंडिकेटर डीजिटस** - (हायफन) आणि * (ॲस्टेरिक)
> **लॅटीन चिन्हे** - Δ (डेल्टा) आणि ∑ (सिग्मा)

कोलन वर्गीकरण पद्धतीतील मुख्य वर्ग व त्यांची चिन्हे पुढीलप्रमाणे आहेत.

z	Generalia	M	Useful arts
1	Universe of Knowledge	Δ	Spiritual experience and mysticism
2	Library Science	N	Fine arts
3	Book science	O	Literature
4	Journalism	P	Linguistics
A	Natural science	Q	Religion
B	Mathematics	R	Philosophy
C	Physics	S	Psychology
D	Engineering	∑	Social Science
E	Chemistry	T	Education
F	Technology	U	Geography
G	Biology	V	History
H	Geology	W	Political science
I	Botany	X	Economics
J	Agriculture	Y	Sociology
K	Zoology	Z	Law
L	Medicine		

३.२ तालिकीकरण

तालिका (Catalogue) हा शब्द ‘Katalogos’ या ग्रीक संज्ञेपासून आला आहे. याचा अर्थ नावनोंदणी, नोंदणी पुस्तक, व यादी असा आहे. तालिका म्हणजे केलेल्या विविध नोंदींची नियोजनानुसार केलेली रचना होय. निरनिराळ्या प्रकारच्या तालिका उपलब्ध आहेत. जसे ग्रंथ विक्रेत्यांची, वितरकाची तालिका, ग्रंथालय तालिका, प्रकाशकाची तालिका इत्यादी. याठिकाणी आपण ग्रंथालय तालिकेबाबत माहिती घेऊया.

ग्रंथालय तालिका म्हणजे काय?

ग्रंथालय तालिका म्हणजे ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याची यादी होय.

३.२.१ ग्रंथालय तालिकीकरण : संकल्पना, स्वरूप, गरज, व्याख्या, महत्त्व व कार्ये

ग्रंथालयांचे पहिले मूलभूत कार्य म्हणजे वाचकांना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा शोध घेण्यास मदत करणे. हे कार्य पार पाडण्याचे मुख्य साधन म्हणजे ग्रंथालय तालिका होय. ग्रंथालयातील वाचन साहित्य व त्यातील माहिती प्रतिप्राप्त करण्यासाठी ग्रंथपाल अथवा तालिकाकार कसोशीने प्रयत्न करत

असतो. पारंपरिक वाचन साहित्याबरोबरच आधुनिक स्वरूपातील दृक्-श्राव्य वाचन साहित्य, डिजिटल वाचन साहित्य व डेटाबेसेस ग्रंथालयात उपलब्ध असतात. या सर्व वाचन साहित्याची माहिती वाचकांना तालिकेतील विविध नोंदींच्या साहाय्याने मिळवता येते.

ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक ग्रंथाची नोंद दाखल नोंदवहीमध्ये झाल्यानंतर प्रत्येक ग्रंथाचे तालिकीकरण केले जाते. तालिकीकरण अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी तालिकीकरणाच्या काही व्याख्या आपण पाहू या :

- जेम्स डफ ब्राऊन यांच्या मते, "ग्रंथालय तालिका म्हणजे ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या वर्णनात्मक नोंदी करून त्यांची विशिष्ट पद्धतीने तर्कसंगत मांडणी करणे होय."
- सी.ए. कटर यांच्या मते, "ग्रंथालय तालिका म्हणजे विशिष्ट पद्धतीने मांडणी केलेल्या ग्रंथांची यादी होय."
- डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्यामते, ''ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथांच्या व त्यांच्या ग्रंथसूचीय स्रोतांबद्दलच्या माहितीच्या पद्धतशीरपणे केलेल्या नोंदी म्हणजे तालिका होय."
- एच. ए. शार्प यांच्या मतानुसार, "तालिका म्हणजे हस्तलिखिते, पुस्तके, पत्रके, संगीत रचना, प्रिंट, नकाशे, स्लाईड्स यांसंबंधीच्या माहितीची नोंद होय."

थोडक्यात, तालिका म्हणजे ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्याचा आरसा होय. ज्यामुळे वाचकास ग्रंथालयात उपलब्ध असलेले विचारधन शोधण्यास मदत होते.

ग्रंथालय तालिकेचे हेतू

१८७६ मध्ये सी.ए. कटर यांनी ग्रंथालय तालिकेचे हेतू खालीलप्रमाणे विशद केलेले आहेत.

(१) वाचकास त्याला हव्या असलेल्या ग्रंथाचा :

(अ) लेखकांनुसार

(आ) शीर्षकानुसार

(इ) विषय शीर्षकाद्वारे शोध घेता येणे.

(२) ग्रंथालयातील वाचन साहित्याचा आढावा ग्रंथालयात विशिष्ट :

(ई) लेखकांनुसार

(उ) विषयानुसार

(ऊ) वाङ्मय प्रकारानुसार कोणते वाचन साहित्य उपलब्ध आहे हे दर्शवणे.

(३) आवडीचे ग्रंथ शोधण्यास साहाय्य करणे.

(ए) ग्रंथाच्या आवृत्तीनुसार (किंवा सूचीय तपशीलानुसार)

(ऐ) वाङ्मय प्रकारानुसार व विषयानुसार ग्रंथ शोधण्यास मदत करणे.

ग्रंथालय तालिकेची कार्ये (Functions of Library Catalogue) :

(अ) जे. एच. शेरा व इगन यांनी ग्रंथालय तालिकेची दोन प्रमुख कार्ये सांगितलेली आहेत.

(१) एखाद्या विशिष्ट लेखकाचा किंवा एखाद्या विशिष्ट विषयावर आधारित ग्रंथ ग्रंथसंग्रहात आहे किंवा नाही हे निश्चित करण्यास त्वरित व अचूकपणे मदत करते.

(२) एखाद्या विशिष्ट विषयावर ग्रंथालयात ग्रंथ आहेत किंवा नाहीत, असल्यास कोणत्या विभागात आहेत याविषयी माहिती देते.

(आ) याव्यतिरिक्त तालिकेची खालील कार्ये मागरिट मान यांनी सांगितलेली आहेत.

(१) लेखक, भाषांतरकार, संपादक, चित्रकार, समीक्षक किंवा कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा वाचक ज्या आधारे वाचन साहित्याचा शोध घेऊ शकतील अशा नोंदी करणे.

(२) ग्रंथकार नोंदीची रचना अशा प्रकारे करणे की ज्यामुळे एकाच लेखकाच्या सर्व ग्रंथांच्या नोंदी एकत्रितपणे मिळतील.

(३) विशिष्ट विषयावरील वाचन साहित्याच्या नोंदी एकत्रितपणे मिळतील अशा प्रकारे नोंदींची रचना करणे.

(४) विशिष्ट विषयावरील व त्याच्याशी संबंधित

विषयाच्या नोंदी एकत्रित बघायला मिळतील.

(५) उलट संदर्भ नोंदी करून वाचकांना एका नोंदीकडून इतर नोंदींकडे निर्देशित करता येते.

(६) प्रत्येक ग्रंथासंबंधी प्रकाशक, प्रकाशन स्थळ व प्रकाशन वर्ष तसेच पृष्ठे, खंड, चित्रे, नकाशे, तक्ते, माला इत्यादी विषयी माहिती मिळेल असे वर्णन नोंदींमध्ये देणे.

(७) प्रसंगी तालिकेत विषयासंबंधी टीपाही दिल्या जातात.

(८) ग्रंथालय तालिकेतील नोंदींमध्ये बोधांक दिलेला असतो. या बोधांकामुळे ग्रंथ संग्रहातील संबंधित वाचन साहित्याचे स्थान शोधण्यास मदत करते.

३.२.२ ग्रंथालय तालिकेचे स्वरूप (Forms of Library Catalogue)

ग्रंथालयातील तालिका हे एक महत्त्वपूर्ण व उपयोगी संदर्भसाधन आहे. वाचक सर्वांत प्रथम ग्रंथ शोध घेताना तालिकेचा वापर करतो. यामुळे ग्रंथपालाला तालिकेचे स्वरूप निश्चित करावे लागते. तालिकेचे स्वरूप ही संज्ञा तालिकेचे दृश्यरूप (physical forms) दर्शविते.

सर्वसाधारणपणे तालिका सुटी पाने (loose leaf) किंवा ग्रंथरूप (bound book form) या स्वरूपात तसेच पत्ररूप तालिकेच्या स्वरूपात (card catalogue), शिवाय संगणकीय, मुद्रित, मायक्रोफिल्म्स किंवा मायक्रोफिश माध्यमातून तयार करता येते. यावरून तालिकेचे दोन प्रकार सांगता येतील. तालिकेचे बाह्य स्वरूप व अंतर्गत स्वरूप.

३.२.२.१ तालिकेचे बाह्य स्वरूप (Physical Forms of Catalogue)

बाह्य स्वरूपानुसार तालिकेचे खालील उपप्रकार अस्तित्वात आहेत.

(१) ग्रंथरूप तालिका (Book Form of Catalogue) : या स्वरूपाच्या तालिकेमध्ये ग्रंथांच्या नोंदी एका पृष्ठावर करून एका बांधीव किंवा अनेक बांधीव खंडात तालिकेची निर्मिती केली जाते. अशा स्वरूपाच्या तालिकेस ग्रंथरूप तालिका असे संबोधले जाते. ही तालिका हाताळण्यास सुलभ आहे. परंतु, आता हे स्वरूप कालबाह्य झाले असून तालिका पत्ररूप तालिकेच्या स्वरूपात उपलब्ध केल्या जात आहेत.

फायदे

(अ) तालिका एक किंवा अनेक प्रतींमध्ये उपलब्ध करता येते.

(आ) ग्रंथालयातील कुठल्याही विभागात किंवा ग्रंथालयायाबाहेर हाताळण्यास सुलभ असते.

(इ) पत्ररूप तालिकेपेक्षा या स्वरूपाच्या तालिकेस कमी जागा लागते.

(ई) विविध विषयांच्या घटकांमध्ये ही तालिका विभागून प्रकाशित करता येते. यामुळे विषयवार नोंदी शोधणे सुलभ होते.

तोटे

(अ) ही तालिका छपाईसाठी खर्चिक होते.


(आ) तालिका लवकरच कालबाह्य होते.

(इ) या तालिकेत ग्रंथालयात आलेल्या नवीन ग्रंथांच्या नोंदींचा समावेश करता येत नाही. तसेच, नोंदींमध्ये दुरुस्ती करणे व नोंदी काढून टाकणे शक्य होत नाही.

(ई) ही तालिका ग्रंथालयातून गहाळ होण्याची शक्यता असते.

(२) चिठ्ठीरूप तालिका (Sheaf Form of Catalogue) : या प्रकारची तालिका ही छापील ग्रंथ तालिकेप्रमाणे असते. परंतु या तालिकेत सुट्या चिठ्ठ्यांवर (loose leaf) ग्रंथांची नोंद तयार करून या चिठ्ठ्या अनुवर्णक्रमानुसार लावल्या जातात. चिमट्याच्या अथवा दोरीच्या साहाय्याने एकत्रित केल्या जातात. परंतु या चिठ्ठ्यांची बांधणी करत नाहीत. अशा तालिका १८७१ च्या सुमारास युरोपियन देशांमध्ये वापरण्यास सुरुवात झाली. यामध्ये प्रत्येक चिठ्ठीवर डाव्या बाजूस खाच (notched) करून त्या दोन पुठ्ठ्यांमध्ये (card board/loose sheaf binder)

दोरीच्या साहाय्याने बांधून ठेवल्या जातात. चिठ्ठीचा (sheaf) आकार ७ × ३ सें.मी./६"× ४" असतो. प्रत्येक गठ्ठ्यामध्ये ५०० ते ६०० चिठ्ठ्यांचा समावेश केला जातो.



चिठ्ठीरूप तालिका

फायदे

(अ) नोंदींचा समावेश करणे किंवा नोंदी काढून टाकणे हे सुलभतेने करता येते.

(आ) ही तालिका हाताळण्यास, वापरण्यास व बघण्यास सोईची आहे. ग्रंथालयात कोठेही तालिका वापरता येते.

(इ) जागा कमी लागते.

(ई) कमी खर्चात तयार करता येते.

(उ) छायाप्रत (photocopy) करून नवीन प्रत तयार करता येते.

(ऊ) छोट्या ग्रंथालयास अशी तालिका उपयुक्त असते.

तोटे

(अ) बऱ्याचदा नवीन नोंदी करून त्या समाविष्ट करणे व जुन्या नोंदी रद्द करून काढून टाकण्याचे काम जिकिरीचे आहे.

(आ) वारंवार हाताळल्याने त्या कालांतराने जीर्ण होऊन फाटू शकतात.

(इ) नोंदी केलेल्या चिठ्ठ्या गहाळ होण्याची शक्यता असते.

(३) पत्ररूप तालिका (Card Form of Catalogue) : तालिकेचा हा प्रकार जगातील सर्व ग्रंथालयांमध्ये मोठ्या प्रमाणात वापरला जातो. चिठ्ठीरूप तालिकेचा हा सुधारित प्रकार आहे. छापील पत्रांचा प्रथम उपयोग १९०१ मध्ये लायब्ररी ऑफ काँग्रेसने सुरू केला व येथूनच पत्ररूप तालिकेचा वापर अमेरिका, युरोप आणि इतरत्र होऊ लागला. या तालिकेत वापरल्या जाणाऱ्या पत्रांचा आकार ७ × १२.५ से.मी. अथवा ५"× ३" असा असतो. ही पत्रे तालिका कॅबिनेटच्या ड्रॉवर्समध्ये अनुवर्णक्रमानुसार (alphabetically) लावली जातात. ड्रॉवर मधून पत्रे काढता येऊ नये यासाठी पत्राच्या खालील बाजूस अर्ध्या सेंटिमीटर अंतरावर एक छिद्र असते. पत्रांच्या छिद्रांमधून रॉड आरपार टाकून ती पत्रे ड्रॉवरमध्ये एकत्रित ठेवतात. रॉड काढून नवीन तालिका पत्रे समाविष्ट करता येतात. त्याचप्रमाणे रद्द केलेली तालिकापत्रे काढून टाकता येतात. एका ड्रॉवरमध्ये अंदाजे एक हजार पत्रांचा समावेश होऊ शकतो.



पत्ररूप तालिका

फायदे

(अ) लवचीकता :

- ग्रंथालयास सुयोग्य अशी पत्रांची रचना केली जाऊ शकते, उदा., अनुवर्णक्रमानुसार, बोधांकानुसार, लेखकांनुसार, ग्रंथ शीर्षकानुसार, विषय शीर्षकानुसार इत्यादी.
- नवीन ग्रंथांची नोंदपत्रे सहजासहजी समाविष्ट करता येतात व जुन्या रद्द केलेल्या नोंदी काढून टाकता येतात.

(ब) वापरण्यास सुलभ

- मार्गदर्शक पत्रांमुळे विविध संदर्भ, लेखक नाम, विषय शीर्षके याविषयी माहिती शोध घेण्यात कार्यक्षमता निर्माण होते.
- छापील तालिकापत्रे सहजासहजी छापता येतात व त्यांची किंमतही परवडण्यासारखी असते.
- देखभाल करण्याचा खर्च कमी आहे.
- इतर स्वरूपातील तालिकांपेक्षा या स्वरूपाच्या तालिकेची देखभाल, निर्मिती सोपी व स्वस्त असते.
- संगणकाच्या साहाय्याने छापलेली तालिका पत्रे ही कमी खर्चिक असतात. पत्ररूप तालिकेची पुनर्छपाई सहजासहजी करता येते.

तोटे :

(अ) ही तालिका ग्रंथालयात ज्या जागेवर ठेवलेली आहे तेथेच ती वापरता येते.

(आ) एकावेळेस एकच वाचक तालिका सविस्तरपणे पाहू शकतो.

(इ) दिवसेंदिवस तालिकेत वाढ झाल्याने जागेची समस्या निर्माण होते.

(ई) वाचकांकडून बरेचदा पत्रांची नासधूस केली जाऊ शकते.

(४) मशीन रिडेबल / ऑनलाइन अथवा संगणकाधारित तालिका (MARC)

पार्श्वभूमी : मार्क (MARC – Machine Readable Catalogue) मशीन रिडेबल कॅटलॉगची वाढ आणि विकास यापासून ऑनलाइन अथवा संगणकाधारित तालिकेची सुरुवात समजता येईल. लायब्ररी ऑफ काँग्रेसने विकसित केलेल्या मार्क-१ व २ या आवृत्त्यांनी तालिकेच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर क्रांती केली. साधारणतः १९७० पासून ऑनलाइन तालिकेच्या प्रणालीस सुरुवात झाल्याचे दिसून येते. जेव्हा ग्रंथालयांचे मोठ्या प्रमाणावर संगणकीकरण करण्यास सुरुवात झाली तेव्हा एएसीआर-२ (AACR2) व इफ्लाच्या (IFLA) युनिमार्क (UNIMARC) व लायब्ररी ऑफ काँग्रेसच्या मार्क (MARC) आराखड्याचा (Format) मानक म्हणून उपयोग करण्यात येऊ लागला. संगणकाच्या साहाय्याने ग्रंथालयाच्या क्षेत्रातील विविध संस्थांनी तालिकेचे मान्य केलेले मानक (Standards) उपयोगात आणणेही सोईचे झाले. यामुळे अनेक सूचीय मानके प्रस्थापित झाली. संगणकाच्या साहाय्याने सूचीय मानकांच्या आधारे वाचन साहित्याचा डेटाबेस तयार करता येऊ लागला. त्यामुळे सूचीय माहितीचे आदान-प्रदान करणेही सोईचे झाले. तालिकेकरिता जागतिक पातळीवर सर्वत्र एकच संहिता वापरणे शक्य झाले.

लायब्ररी ऑफ काँग्रेसने ऑनलाइन तालिकेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. “ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाविषयीची माहिती प्राप्त करण्याचे साधन व मार्गदर्शिका, ज्यामध्ये एकमेकांशी संबंधित सूचीय माहितीचे घटक हे संगणकाच्या साहाय्याने वाचकांना त्यांच्या संगणकावर शोधता येतात. ग्रंथसंग्रहाच्या अशा डिजिटल सूचीय डेटाबेसला ‘ऑनलाइन तालिका’ (Online Catalogue) असे म्हणतात.

ओपॅक (Online Public Access Catalogue) : ओपॅक म्हणजे एका ग्रंथालयातील (अथवा अनेक ग्रंथालयांतील) वाचन साहित्याच्या सूचीय नोंदींचा ऑनलाईन डेटाबेस होय. दुसऱ्या शब्दात ग्रंथालयाच्या वाचन साहित्याचा तो ‘गेटवे’ आहे. ओपॅक हा केवळ एका स्वतंत्र संगणकावर वापरता येतो असे नव्हे तर तो इन्ट्रानेट व इंटरनेटवरही उपलब्ध करून देता येतो. यामुळे केवळ ग्रंथालयाच्याच सदस्यांना ग्रंथालय ओपॅक सेवा उपलब्ध होते. असे नव्हे तर इतरांनाही ग्रंथालयाबाहेर तो बघता येतो. ओपॅक हा ग्रंथालयात व संस्थेच्या परिसरात इंट्रानेटद्वारे वापरता येतो. ओपॅक अथवा संगणकाधारित तालिका ही अतिशय बहुउद्देशीय व बहुआयामी आहे. म्हणजेच अशी तालिका अतिशय लवचीक, सुलभ व देखभाल करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या परवडणारी, वाचन साहित्याची माहिती शोधण्याच्या वाचकांच्या प्रत्येक दृष्टिकोनाचे समाधान करणारी असते. ओपॅक मधून वाचन साहित्याची माहिती घेण्याचा वेग प्रचंड व अचूक आहे.

वेब-ओपॅक (Web-OPAC) : वेब-ओपॅकला ओपॅकची सुधारित आवृत्ती म्हणता येईल. वेब-ओपॅक ही इंटरनेटवर उपलब्ध असलेली तालिका होय. वाचक अशा तालिका कोणत्याही ठिकाणाहून ग्रंथालयाच्या



ओपॅक

पोर्टलवर पाहू शकतात. या तालिकेद्वारेही ग्रंथालयामध्ये विशिष्ट ग्रंथाची उपलब्धता, ते कपाटात आहेत की वाचकास दिले आहेत याविषयी कल्पना येते. वेब-ओपॅक अथवा ओपॅक मधून संगणकाच्या साहाय्याने विविध दृष्टिकोनांच्या आधारे वाचन साहित्याचा शोध घेता येतो. उदा., लेखकानुसार, विषय शीर्षकानुसार, ग्रंथ शीर्षकानुसार व प्रलेखांच्या प्रकाशन वर्षानुसार इत्यादी. आधुनिक काळात मार्क आराखड्याने सुरुवात झालेल्या ऑनलाइन तालिकेलाच 'ओपॅक' असे संबोधले जाते. ही ऑनलाइन स्वरूपातील तालिका इंटरनेटवर पोर्टलद्वारे दुवा (Link) प्रस्थापित करून उपलब्ध करून दिल्यास तिलाच वेब-ओपॅक असे म्हटले जाते.

ओपॅकचे/वेब ओपॅकचे फायदे

(अ) ओपॅक हा सूचीय नोंदींचा डिजिटल संग्रह असून ग्रंथालय व्यवस्थापन पद्धतीत याचा उपयोग विविध दृष्टिकोनांद्वारे वाचन साहित्याच्या सूचीय नोंदींचा शोध घेण्यासाठी होतो.

(आ) ओपॅकमधील सूचीय माहितीचा उपयोग केवळ तालिका प्रणालीमध्येच होतो असे नसून इतर कार्यांतही या माहितीचा उपयोग होतो. जसे, उपार्जन विभाग, देवघेव विभाग, ग्रंथ परिगणन (stock verification) व संदर्भ विभाग इत्यादी.

(इ) अनेक ग्रंथालयांच्या ओपॅकचा उपयोग करून ऑनलाइन संघ तालिका निर्मितीसाठी पण केला जाऊ शकतो.

(ई) गरज पडल्यास विषयानुसार छापील ग्रंथ स्वरूपातील तालिका या सूचीय माहितीद्वारे तयार करता येते.

(उ) या प्रकारच्या तालिकेमुळे कोणत्याही पैलूद्वारे व विषयाशी निगडित किंवा विषयावर आधारित सूचीय नोंदी प्रतिप्राप्त करता येतात.

(ऊ) मानवी श्रम, तालिकेची देखभाल, पारंपरिक तालिकेत वापरली जाणारी साधने यांचा वापर होत असल्याने ही पद्धती आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे.

(ए) ऑनलाइन तालिकेच्या साहाय्याने पत्ररूप तालिकाही छापून तयार करता येते. ही पत्रे कॅटलॉग कॅबिनेटमध्ये लावता येतात. कारण काही वाचक पत्ररूप तालिका पाहणे पसंत करतात.

ओपॅकचे इतर प्रकार पुढीलप्रमाणे निर्माण करता येतात : संगणकाधारित मायक्रोफिल्म तालिका (CoM), सी-डी रॉम तालिका, ऑनलाइन तालिका व ऑनलाइन संघतालिका इत्यादी.

३.२.२.२ ग्रंथालय तालिकेचे अंतर्गत स्वरूप (Inner Form of Library Catalogue)

ग्रंथसंग्रहाची एखाद्या विशिष्ट पद्धतीने नोंदी करून त्यांची रचना विशिष्ट पद्धतीने केली जाते. या रचनेस तालिकेचे अंतर्गत स्वरूप असे संबोधले जाते. जेम्स आर्मरॉड यांनी आपल्या "Style in Card Cataloguing", आवृत्ती २ री (१९३४), या ग्रंथात असे म्हटले आहे की, तालिका ही व्याकरणातील वाक्यांप्रमाणे आहे व त्याचे तीन प्रकार आहेत.

- साधे वाक्य (Simple Sentence)
- सामाईक वाक्य (Compound Sentence)
- संमिश्र वाक्य (Complex Sentence)

यावर आधारित तालिकेचेही तीन अंतर्गत स्वरूप सांगता येतील.

- साधी तालिका (Simple Catalogue) : यामध्ये ग्रंथकार, ग्रंथ शीर्षक, आणि अनुवर्ण-

वर्गीकृत-विषय (Alphabetico-classed Subject) या प्रकारच्या नोंदी आढळतात.

- सामाइक तालिका (Compound Catalogue) : यामध्ये लेखक-शीर्षक, ग्रंथ शीर्षक-विषय अशा नोंदींचा समावेश होतो.
- संमिश्र तालिका (Complex Catalogue) : यामध्ये कोशरूपी तालिका, वर्गीकृत तालिका, अनुवर्ण-विषय शीर्षक तालिका या नोंदी आढळतात.

थोडक्यात स्पष्टीकरण द्यायचे झाल्यास तालिकेच्या अंतर्गत स्वरूपाचे खालील प्रकार सांगता येतील.

(१) **ग्रंथकार तालिका** (Author Catalogue) : या तालिकेत ग्रंथकाराच्या नावाने नोंदीची सुरुवात होते. या प्रकारच्या तालिका नोंदींमध्ये ग्रंथकार म्हणून संपादक, भाषांतरकार किंवा अनुवादक तसेच समष्टी संस्था, शासकीय विभाग यांचाही समावेश होतो. थोडक्यात ग्रंथातील मजकुरासाठी जबाबदार असलेली व्यक्ती अथवा संस्था यांच्या नावे जेव्हा नोंद केली जाते, त्या नोंदींना ग्रंथकार तालिका असे म्हणतात.

(२) **ग्रंथनाम तालिका** (Title Catalogue) : या प्रकारच्या तालिकेतील नोंदींत ग्रंथ शीर्षक नोंदींच्या सुरुवातीच्या भागात प्रथम नोंदवले जाते. या नोंदीची रचना ही अनुवर्ण क्रमाने केली जाते. ग्रंथांमधील शीर्षक पृष्ठावर (Title page) दिलेले शीर्षकच ग्राह्य धरले जाते व त्यानुसारच नोंद केली जाते.

(३) **ग्रंथकार शीर्षक तालिका** (Author Name Catalogue) : जेव्हा एखादा लेखक हा अभ्यासाचा विषय होतो तेव्हा त्याने लिहिलेले मूळ ग्रंथ व त्यांच्या नोंदी तसेच इतरांनी त्या लेखकाच्या लिखाणावर लिहिलेले भाष्य अथवा समीक्षा यांच्या नोंदी केल्या जातात. समीक्षणात्मक लिखाणामध्ये संबंधित लेखक हा अभ्यास विषय होतो. त्यामुळे त्या लेखकाचे नाव हे विषय नोंदीत शीर्षक म्हणून येते. मूळ ग्रंथ व त्यावरील भाष्य केलेल्या ग्रंथांच्या नोंदी अनुवर्णक्रमाने लावल्या जातात. यालाच ग्रंथकार शीर्षक तालिका असे म्हणतात. त्याच प्रमाणे समष्टी संस्थांचा (Corporate body) इतिहास, व्यक्तींची चरित्रे व आत्मचरित्रे हा त्या संस्था व व्यक्ती या अभ्यास विषय होतात.


(४) **अनुवर्ण विषय तालिका** (Alphabetico Classed Catalogue) : एका विषयाचे सर्व ग्रंथ एकत्रित आणण्याकरिता विषयाचे नाव नोंदीच्या सुरुवातीच्या भागात लिहिले जाते. या सर्व विषय नोंदींची अनुवर्णक्रमाने रचना केली जाते यालाच अनुवर्ण विषय तालिका असे म्हणतात.

अनुवर्ण विषय तालिकेतील सर्व विषय नोंदी विषयाच्या नावाने अनुवर्णक्रमानुसार लावल्या जातात.

(५) **कोश तालिका** (Dictionary Catalogue) : या प्रकारच्या तालिकेतील सर्व प्रकारच्या नोंदींची (लेखक, संपादक, भाषांतरकार, समीक्षक, माला, विषय शीर्षक इत्यादी) अनुवर्णक्रमानुसार शब्दकोशाप्रमाणे रचना केली जाते. म्हणून या तालिकेस कोश तालिका असे म्हणतात. ही तालिका वापरण्यास सोपी असते.

(६) **वर्गीकृत तालिका** (Classified Catalogue) : या प्रकारच्या तालिकेतील नोंदींमध्ये मुख्य नोंद ही बोधांक शीर्षक म्हणून नोंदीच्या सुरुवातीला येते. बोधांक हा ग्रंथालयात वापरल्या जाणाऱ्या वर्गीकरण पद्धतीप्रमाणे तयार केला जातो. या तालिका ग्रंथपालास जास्त





तालिका प्रणाली

उपयुक्त असतात. या तालिकेतील मुख्य नोंदींची रचना तालिका कॅबिनेटच्या ड्रॉवरमध्ये ज्याप्रमाणे वर्गांकानुसार केलेली असते, त्याच प्रमाणे ग्रंथसंग्रहातील ग्रंथांची रचना केलेली असते. या तालिकेमुळे एका विषयावरील ग्रंथांची एकत्रित माहिती प्राप्त होते. तसेच इतर साहाय्यकारी नोंदींची (added entries) रचना अनुवर्णक्रमानुसार केली जाते. असे दोन विभाग या तालिकेत असतात. अनुवर्ण विभागातही लेखक, संपादक, भाषांतरकार यांचा एक विभाग करता येतो व विषय शीर्षकांचा स्वतंत्र विभाग करता येतो.


३.२.३ नोंदी व नोंदींचे प्रकार

ग्रंथालय तालिका ही ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाच्या नोंदी असलेले साधन होय. वाचकांच्या माहितीविषयक (वाचन साहित्यविषयक) गरजांची परिपूर्ती करण्यासाठी या ग्रंथ तालिकेचा उपयोग होतो. ज्यामध्ये विविध स्वरूपाच्या नोंदी केल्या जातात. अशा प्रकारच्या नोंदींना युनिट नोंद (Unit record) असे म्हणतात. वाचकाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन प्रत्येक नोंद केली जाते (उदा., लेखक, ग्रंथ शीर्षक, संपादक, माला, विषय इत्यादी). या प्रकारच्या नोंदी विशिष्ट तालिका संहितेवर आधारित असतात. जसे, AACR-2, CCC (Classified Catalogue Code) इत्यादी.

तालिका नोंद अथवा नोंदी म्हणजे काय व त्याचे स्वरूप काय हे सोप्या शब्दांत पुढीलप्रमाणे सांगता येईल.

विशिष्ट तालिका संहितेनुसार वाचकांचा ग्रंथशोध दृष्टिकोन लक्षात घेऊन वेगवेगळ्या प्रकारच्या नोंदींमध्ये तालिका पत्राच्या पहिल्या आडव्या रेषेवर नोंदीचे शीर्षक लिहिले जाते. ग्रंथाचा इतर तपशील तालिका पत्राच्या पुढील भागात नोंदवला जातो. त्यास तालिका नोंद असे म्हणतात.

पारंपरिक तालिकेतील सर्व नोंदी पत्र स्वरूपात व आधुनिक काळात संगणकाधारित पद्धतीने निर्माण केल्या जातात. पारंपरिक पत्ररूप तालिकेमध्ये वापरले जाणारे कार्ड हे १२.५ × ७.५ सें.मी. अथवा ५"×३" या आकाराचे असते.



तालिका पत्राचा नमुना


नोंदींचे प्रकार

अभ्यासक्रमात केवळ AACR-21 या तालिकेनुसार प्रात्यक्षिके व त्यांचा अभ्यास करायचा असल्याने नोंदींचे प्रकार स्पष्ट करताना AACR-21 विचार केलेला आहे. त्यानुसारच नोंदींचे प्रकार वर्णन केलेले आहेत. यामध्ये मुख्य नोंद, सहायक नोंदी व याव्यतिरिक्त उलट संदर्भ नोंदी (cross reference entries) व विश्लेषणात्मक नोंदी (analytical entries) यांचा समावेश होतो.

(अ) मुख्य नोंद (Main Entry) : ग्रंथालय तालिकेतील ग्रंथाची मुख्य नोंद ही तालिका संहितेनुसार केली जाते. AACR (Anglo-American Cataloguing Rules) नुसार ग्रंथातील मजकुरास जबाबदार असलेली व्यक्ती, समष्टी संस्था, भाषांतरकार अथवा ग्रंथनाम (जेथे ग्रंथ तीनपेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेला असेल अथवा शीर्षक पृष्ठावर ग्रंथकाराचा उल्लेख नसल्यास) हे घटक नोंदीच्या पहिल्या रेषेवर नोंदवले जातात व दुसऱ्या भागात खालच्या बाजूस ग्रंथाविषयीचा सविस्तर सूचीय तपशील नियमानुसार दिला जातो.

तसेच वर्गीकृत तालिकेत बोधांक हा पत्राच्या शीर्ष भागात (पहिल्या शीर्षक रेषेवर) नोंदवला जातो व इतर सूचीय तपशील खालच्या ओळींवर दिला जातो.

अशा पद्धतीने मुख्य नोंद ही त्या त्या तालिका संहितेच्या नियमानुसार केली जाते. AACR या तालिका संहितेनुसार प्रथम लेखक नोंद ही मुख्य नोंद (Main Entry) म्हणून समजली जाते. कारण, मुख्य नोंदीच्या पत्रावरील खालच्या बाजूस इतर करायच्या सहायक नोंदींची शीर्षके दिलेली असतात. तसेच मुख्य नोंदींवरील नक्कलीच्या (ट्रेसिंग) साहाय्याने साहाय्यकारी नोंदी केल्या जातात. या नोंदीत ग्रंथाचा सर्व तपशील व इतर सहायक नोंदींची शीर्षके सविस्तरपणे दिलेली असतात. या नोंदीस युनिट नोंद म्हणूनही संबोधले जाते. एएसीआर नुसार मुख्य नोंदीचा नमुना आराखडा पुढीलप्रमाणे असतो.



उदा., खालील ग्रंथाच्या तपशीलानुसार मुख्य नोंद

शीर्षक : कंबोडायान

लेखक : रवी रमाकांत वाळेकर

प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन


प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : २०१८

पृष्ठे: प्राथमिक – xv,

मूळ पृष्ठे – २५५

किंमत : ३०० रुपये





माहीत आहे का तुम्हांला ?

पुस्तकाचा बोधांक (Call Number) म्हणजे काय ?

वर्गांक + ग्रंथांक + दाखल अंक.

Class No. + Book No. + Acc. No.

(आ) सहायक नोंदी (Added Entries) : AACR-21 तालिका संहितेनुसार सहायक नोंद म्हणजे मुख्य नोंदीशिवाय केलेल्या इतर नोंदी होय. या सहायक नोंदी मुख्य नोंदीस पूरक असतात व त्या वाचकांच्या इतर शोध घटकांच्या दृष्टिकोनातून केल्या जातात. काही वेळेस सहायक नोंदींना दुय्यम नोंदी (Secondary Entries) संबोधले जाते. प्रत्येक नोंदीचे महत्त्व व वैशिष्ट्य नोंदींच्या प्रकारावर अवलंबून असते. अशा नोंदींचे स्वरूप सहलेखक, संपादक, भाषांतरकार, चित्रकार, माला, विषय शीर्षके इत्यादी नुसार असते. सहायक नोंदीची सुरुवात दुसऱ्या उभ्या रेषेपासून होते. सहायक नोंदीचे काही आराखडे पुढे दर्शवले आहेत.

उदा.,

ग्रंथ नाम : संदर्भ सेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक

लेखक : राजेंद्र रमाकांत साखरे

प्रकाशक : युनिव्हर्सल प्रकाशन

प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : २००४

किंमत : २०० रुपये

प्राथमिक पृष्ठे : xviii, मुख्य पृष्ठे : ३०५,

आकार : २२ सें.मी.


मुख्य नोंद

	साखरे, राजेंद्र रमाकांत
	संदर्भ सेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक / राजेंद्र रमाकांत साखरे.
	– पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, २००४
025.52	xviii, ३०५ पृष्ठे, २२ सें.मी.
SAK	सूची व परिभाषाकोश समाविष्ट
	ISBN
	१. ग्रंथालय व माहितीशास्त्र २. संदर्भ सेवा
122205	I. शीर्षक


सहायक नोंद : १. ग्रंथशीर्षक (ग्रंथनाम) नोंद

	संदर्भ सेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक
	साखरे, राजेंद्र रमाकांत
	संदर्भ सेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक / राजेंद्र रमाकांत साखरे.
025.52	– पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, २००४.
SAK	xviii, ३०५ पृष्ठे, २२ सें.मी.
	सूची व परिभाषाकोश समाविष्ट
	ISBN
१२५२०५	

सहायक नोंद : २. मुख्य विषयशीर्षक नोंद


ग्रंथालय आणि माहितीशास्त्र
साखरे, राजेंद्र रमाकांत
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र / राजेंद्र रमाकांत साखरे. – पुणे :
025.52 युनिव्हर्सल प्रकाशन, २००४.
SAK xviii, ३०५ पृष्ठे, २२ सें.मी.
सूची व परिभाषाकोश समाविष्ट
ISBN
१२५२०५

सहायक नोंद : ३. उप-विषयशीर्षक नोंद


संदर्भ सेवा
साखरे, राजेंद्र रमाकांत
संदर्भ सेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक / राजेंद्र रमाकांत साखरे.
025.52 – पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, २००४.
SAK xviii, ३०५ पृष्ठे, २२ सें.मी.
सूची व परिभाषाकोश समाविष्ट
ISBN
१२५२०५

ग्रंथालयात वाचकांसाठी विषयवार व गरजेवर आधारित ग्रंथ उपार्जन केले जाते. या ग्रंथांवर प्रक्रिया करून त्यांची मांडणी शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्यास वाचकाला ग्रंथालयात असलेले वाचन साहित्य अचूकपणे शोधण्यास मदत होते. या विभागातील मुख्य कार्ये ग्रंथ नोंदणी, ग्रंथ वर्गीकरण, ग्रंथ तालिकीकरण इत्यादी आहेत. ग्रंथालय वर्गीकरणामुळे ग्रंथाची कपाटातील जागा निश्चित होते. तर तालिकीकरणामुळे ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथ संग्रहातून वाचकास हवा असलेल्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

स्वाध्याय

१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

(१) ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीमध्ये वर्गांक हा किमान ——— अंकांचा असावा असे तत्त्व गृहीत धरले आहे.

(अ) दोन (ब) चार
(क) तीन (ड) पाच

(२) ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या ग्रंथांच्या यादीला ——— असे म्हणतात.

(अ) सूची (ब) यादी

(क) तालिका (ड) कोश

(३) ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीत (२३वी आवृत्ती मध्ये) एकूण ———— कोष्टके (tables) आहेत.

(अ) चार (ब) सात

(क) सहा (ड) पाच

(४) कोलन वर्गीकरण पद्धतीचे जनक ———— हे आहेत.

(अ) मेलविल ड्युई (ब) सी.ए.कटर

(क) डॉ.एस.आर. रंगनाथन

(ड) डॉ. एस.जी.महाजन

(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

'अ' गट	'ब' गट
(१) ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धती	डॉ.एस.आर.रंगनाथन
(२) कोलन वर्गीकरण पद्धती	मेलविल ड्युई
(३) बिब्लियोग्राफिक क्लासिफिकेशन	एच.इ.ब्लिस
(४) लायब्ररी ऑफ कॉंग्रेस	डब्ल्यू.सी.बर्विक सेयर्स

(क) खालील विधाने व योग्य कारणे यांची सांगड घालून दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायांची निवड करा.

(१) विधान (अ) : संकीर्ण वर्ग, स्वरूप विभाग, स्वरूप वर्ग, निर्देश व चिन्हांकन हे ग्रंथ वर्गीकरणाची वैशिष्ट्ये आहेत.

कारण (ब) : वर्गीकरण पद्धतीमध्ये ही वैशिष्ट्ये अनिवार्य नाहीत.

पर्याय : (i) (अ) चूक (ब) बरोबर

(ii) (अ) बरोबर (ब) चूक

(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक

(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(२) विधान (अ) : तालिकेमध्ये विषय शीर्षक नोंदींची गरज असते.

कारण (ब) : विषय दृष्टिकोनातून ग्रंथाचा शोध घेणे हे वाचकास जास्त उपयुक्त व सोईचे वाटते.

पर्याय : (i) (अ) बरोबर (ब) चूक

(ii) (अ) चूक (ब) बरोबर

(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक

(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(ड) नावे लिहा.

(१) मार्क (MARC=Machine Readable Catalogue) ची सर्वप्रथम निर्मिती केलेली संस्था - ......

(२) कोलन वर्गीकरण पद्धतीचे (CCC) जनक - ....

२. पुढील प्रश्नांची दोनशे शब्दांत उत्तरे लिहा.

(१) ग्रंथ वर्गीकरण पद्धती म्हणजे काय? ग्रंथ वर्गीकरण पद्धतीची वैशिष्ट्ये लिहा.

(२) तालिका म्हणजे काय? तालिकेचे प्रमुख दृश्य प्रकार कोणते ते सविस्तर वर्णन करा.

(३) तालिका नोंद म्हणजे काय ? नोंदींचे विविध प्रकार स्पष्ट करा.

३. पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून सकारण स्पष्ट करा.

(१) ग्रंथालयात ग्रंथालय तालिकेची आवश्यकता नाही.

(२) तालिकेतील विषय शीर्षक नोंदीस मुख्य नोंद म्हणतात.

(३) पत्ररूप तालिका ही हाताळण्यास अतिशय क्लिष्ट आहे.

४. टीपा लिहा.

(१) विषय शीर्षके देण्याच्या पद्धती

(२) कोलन वर्गीकरण पद्धतीतील मुख्य विषयाचे पाच पैलू

(३) ड्युई डेसिमल वर्गीकरण पद्धतीचा आराखडा

(४) चिन्हांकन - प्रकार व उदाहरणे

५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

(१) अँग्लो-अमेरिकन तालिका संहितेनुसार (AACR) मुख्य नोंदीचा आराखडा लिहून उदाहरण द्या.

(२) तालिका नोंद म्हणजे काय? नोंदींचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(३) ग्रंथालय वर्गीकरणाची ग्रंथालयातील आवश्यकता विशद करा.

उपक्रम

तुमच्या ग्रंथालयाची तालिका पहा व आपली निरीक्षणे नोंदवा.

⌘⌘⌘

घटक ४. संदर्भ सेवा

प्रास्ताविक

संदर्भ सेवेचा इतिहास हा साधारणतः १८७१ पासून गृहीत धरता येऊ शकतो. यावर्षी बोस्टन येथे दी अमेरिकन सोशल सायन्स असोसिएशन या संस्थेने 'फ्री पब्लिक सर्व्हिसेस सजेशन्स ऑन देअर फाऊंडेशन अँड ॲडमिनिस्ट्रेशन' (फ्री पब्लिक सर्व्हिसेस : जनतेस मोफत सेवा) या शीर्षकाचे एक पत्रक प्रकाशित केले. जस्टीन विन्सर या ग्रंथपालाने यातील मजकूर लिहिलेला होता. या लिखाणात 'रेफरन्स' हा शब्द फक्त एके ठिकाणी कोश व विश्वकोशाच्या यादीच्या सुरुवातीस आलेला होता. परंतु असे निदर्शनास येते की, यापूर्वी व्यक्तिगत मदत अथवा साहाय्य हा शब्द कुठेही वापरात आल्याचे दिसत नाही किंवा ग्रंथालयाच्या कार्यातही व्यक्तिगत साहाय्य हा शब्द कुठेही वापरल्याचे आढळून आलेले नाही.

१८७६ मध्ये अमेरिकन प्रशासनाद्वारे ग्रंथालयावर एक उत्कृष्ट व व्यापक अहवाल प्रकाशित केला गेला. परंतु या अहवालातही कुठेही 'रेफरन्स वर्क' (संदर्भ कार्य) हा शब्द आढळून आला नाही. तसे पाहता, १८७६ च्या या अहवालाचा मुख्य उद्देश ग्रंथालयाच्या वाचनकक्षात जास्तीत जास्त ग्रंथ उपलब्ध करून देण्यासंबंधी सूचना देणारा होता. ज्यामुळे ग्रंथपाल व वाचक या दोघांचाही वेळ वाचेल हा दृष्टिकोन त्यामागे होता. त्या काळात संदर्भ सेवेसंबंधीची कल्पना 'वाचकाला ग्रंथ द्या व त्यापासून दूर व्हा, त्याला हवी असलेली माहिती त्यालाच शोधू द्या' असा होता.

१८९३ मध्ये अमेरिकन शासनाने ग्रंथालयातील कार्याविषयी एक ग्रंथ प्रकाशित केला होता. त्या ग्रंथातील एका प्रकरणात 'असिस्टन्स् टू रीडर्स' (वाचकांना साहाय्य) असा उल्लेख आला होता.

१८९७ नंतर 'जनरल इंडेक्स टू द लायब्ररी जर्नल' या नियतकालिकाच्या १ ते २२ खंडांमध्ये संदर्भ कार्यावर काही लेख प्रकाशित झाल्याचे दिसून येते. 'लायब्ररी जर्नल' या नियतकालिकाच्या १९०५ ते १९११ या दरम्यान प्रकाशित झालेल्या लेखांमध्ये सर्वसाधारणपणे संदर्भाविषयी उल्लेखलेल्या संज्ञा 'रेफरन्स रूम' (संदर्भ खोली), 'रेफरन्स लायब्ररियन' (संदर्भ ग्रंथपाल), 'रेफरन्स डिपार्टमेंट' (संदर्भ विभाग) या होत्या. संदर्भ सेवेसंबंधीच्या इतिहासात ग्रंथालयाचे नेमके स्वरूप, त्याचे कार्य हे अभ्यासणे आवश्यक आहे. ग्रंथालयाच्या स्वरूपात झालेला आमूलाग्र बदल व 'माहितीच्या विस्फोटाच्या' संदर्भात 'संदर्भ सेवा' या संज्ञेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

एकोणिसाव्या शतकापासून युरोप तसेच इतर देशांत संदर्भ विभाग अस्तित्वात होता व याद्वारे संदर्भ सेवा दिली जात असे. परंतु, 'संदर्भ सेवा' असा स्वतंत्र विषय शिकवला जात नव्हता. संदर्भ सेवेचे महत्त्व संशोधन कार्याच्या दृष्टीने, ज्ञानविषयक जिज्ञासापूर्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. आय.ए. रिचर्डसनने 'रिसर्च कन्सल्टंट' ही संज्ञा वापरली आणि संदर्भ सेवेविषयी व्याख्याने दिली.

भारतातील सुरुवात : डॉ.एस.आर.रंगनाथन यांनी इंग्लंडमध्ये ग्रंथालय शास्त्राचे प्रशिक्षण घेताना विविध ग्रंथालयांना भेटी दिल्या. या भेटींदरम्यान त्यांना प्रत्येक ग्रंथालयात 'संदर्भ विभाग' दिसून आला. डॉ.एस.आर. रंगनाथन इंग्लंडहून परत आल्यावर त्यांनी मद्रास (चेन्नई) विद्यापीठाच्या ग्रंथालयात संदर्भ सेवा विभागाची स्थापना करून संदर्भ सेवा देण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत ही सेवा लोकप्रिय झाली. त्यानंतर ग्रंथालय शास्त्राच्या पदवी अभ्यासक्रमातही 'संदर्भ सेवा' हा विषय समाविष्ट केला गेला. ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमातही संदर्भ सेवेचा एक स्वतंत्र विषय म्हणून समाविष्ट झाला.

४.१ संदर्भ सेवेची गरज आणि व्याख्या

ग्रंथांचा तसेच वाचन साहित्याचा वापर जास्तीत जास्तीत जास्त होण्यास संदर्भ सेवेची आवश्यकता आहे ज्यामुळे वाचकास वाचन साहित्याचा उपयोग गरजेनुसार कसा करावा याचे मार्गदर्शन केले जाते. संदर्भ सेवेची गरज ही खालील महत्त्वाच्या घटकांमुळे आवश्यक झाली आहे.

आधुनिक काळातील ग्रंथालयांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांना पारंपरिक संदर्भ सेवेऐवजी तंत्रज्ञानाधारित संदर्भ सेवा देण्याचे कार्य महत्त्वाचे ठरत आहे. जसे, व्हर्च्युअल रेफरन्स डेस्क (आभासी संदर्भ टेबल), व्हर्च्युअल संदर्भ सेवा, व्हर्च्युअल ग्रंथालये, व्हर्च्युअल ग्रंथालयीन संदर्भ सेवा इत्यादींचा वापर करून संशोधकास त्वरित माहिती सेवा देण्याचे कार्य 'आधुनिक संदर्भ सेवा' करत आहे.

(१) माहितीचा विस्फोट व वाचन साहित्यातील विविधता : संशोधन व ज्ञान क्षेत्रातील विविध कार्ये यांमुळे मोठ्या प्रमाणावर माहिती प्रकाशित होत असते. प्रकाशित होणारी माहिती विविध स्वरूपाच्या प्रलेखांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. माहितीच्या विस्फोटामुळे वाचकांना माहिती शोधण्यात अडथळे येतात. याकरिता त्याला संदर्भ ग्रंथपालासारख्या मध्यस्थाची आवश्यकता असते. कारण संदर्भ ग्रंथपालास माहिती शोधाची कौशल्ये व तंत्रे अवगत असतात.

(२) वाचकांच्या माहितीविषयक गरजांची विविधता : वाचकांच्या माहितीविषयक गरजांचा अभ्यास करून वाचन साहित्य व वाचक यांतील दुवा म्हणून संदर्भ ग्रंथपालाने कार्य करणे व त्यांच्यात हितसंबंध प्रस्थापित करण्याचे कार्य केल्यास वाचन साहित्याचा उपयोग जास्त प्रमाणात होण्यात मदत होईल.

(३) शिक्षणक्षेत्रात झालेली वाढ व विकास : औपचारिक व अनौपचारिक शिक्षणात वाढ आणि विकास झाल्यामुळे ग्रंथालयांचे महत्त्व वाढलेले आहे. तसेच संदर्भ सेवेचे महत्त्व पण वाढले आहे.

(४) ग्रंथालयांमध्ये झालेली वाढ : ग्रंथालये ही शिक्षण क्षेत्राचा कणा समजली जातात. शिक्षण आणि ग्रंथालय हे दोन्ही एकमेकांस पूरक असल्याने शिक्षण क्षेत्राप्रमाणेच ग्रंथालयांचीही वाढ झालेली दिसून येते. सार्वजनिक ग्रंथालये, शैक्षणिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालये या मुख्य प्रकाराव्यतिरिक्त औद्योगिक ग्रंथालये, वृत्तपत्र ग्रंथालये, माध्यम ग्रंथालये, तुरुंग ग्रंथालये, रुग्णालयांची ग्रंथालये इत्यादींची नवीन दालने ग्रंथालय क्षेत्रात निर्माण झाली आहेत. सशोधकांना व अभ्यासकांना ग्रंथालयाद्वारे त्वरित माहिती मिळावी यासाठी संदर्भ सेवा देण्याची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे 'संदर्भ सेवा' ही ग्रंथालयामध्ये मध्यवर्ती संकल्पना म्हणून उदयास आली आहे.

(५) माहितीचे जलद प्रसारण होण्याकरिता संदर्भ सेवेची गरज : ज्ञानाच्या क्षेत्रात प्रकाशित होणाऱ्या वाचन साहित्याची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. मुख्य विषयातील सूक्ष्म घटकातही प्रकाशित होणाऱ्या प्रलेखांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. यामुळे वाचकास त्वरित माहिती मिळणे अवघड झाले आहे. यामुळे वाचकास एखाद्या विषयावरील अथवा उपविषयावरील एकत्रित माहितीचे संकलन करणे गरजेचे असते. हे कार्य संदर्भ सेवा विभाग योग्यरीतीने पार पाडतो.

(६) संशोधनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता : संशोधनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता संदर्भ सेवा महत्त्वाची भूमिका पार पाडते. संदर्भ सेवेद्वारे कोणत्याही विषयावरील अद्ययावत माहिती विनाविलंब दिल्यामुळे संशोधकास संशोधनासाठी नवीन विषय निवड करण्यास मदत होते. पूर्व संशोधनासंदर्भात माहिती मिळाल्याने संशोधनाची पुनरावृत्ती टळते.

(७) ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर संदर्भ सेवेसाठी करणे : आधुनिक काळात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच ग्रंथालयातील संदर्भ सेवेवर या तंत्रज्ञानाचा प्रभाव दिसून येतो.

संदर्भ सेवेची व्याख्या

विविध संदर्भ ग्रंथपालांच्या मते संदर्भ सेवेच्या व्याख्या संदर्भ सेवेविषयक कार्य व स्वरूप यांचे विश्लेषण करतात. संदर्भ सेवेच्या व्याख्या खालीलप्रमाणे :

(१) जेम्स आय. वायर यांच्या मते, ''अभ्यास व संशोधनाकरिता ग्रंथालयातील वाचन साहित्याचे स्पष्टीकरण करण्याच्या दृष्टीने दिलेले सहानुभूतिपूर्वक व माहितीपूर्ण वैयक्तिक साहाय्य म्हणजे संदर्भ सेवा होय.''

(२) हॅरॉड्स लायब्ररीयन्स ग्लॉसरी ॲण्ड रेफरन्स बुक या कोशातील व्याख्येप्रमाणे, ''ग्रंथालयातील असे कार्य ज्यामध्ये अभ्यास व संशोधनासाठी ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग होण्याकरिता व हवी ती माहिती मिळण्याकरिता, वाचकाला साहाय्य केले जाते

त्यास संदर्भ सेवा म्हणतात.''

(३) मार्गारेट हचिन्स यांच्या मते, ''कोणत्याही हेतूने ग्रंथालयात माहिती शोधण्यासाठी आलेल्या वाचकाला दिलेले प्रत्यक्ष व्यक्तिगत साहाय्य म्हणजे संदर्भ सेवा होय. ग्रंथालयातील माहिती मिळवून देण्यासाठी जे कार्य केले जाते त्या सर्व कार्यांचे संकलन म्हणजे संदर्भ सेवा होय.''

(४) डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या मते ''योग्य वाचक व त्याला हवा असलेला ग्रंथ यांची व्यक्तिगतरीत्या योग्य वेळी सांगड घालून देणे म्हणजे संदर्भ सेवा होय. संदर्भ सेवा म्हणजे वाचक व वाचनसाहित्य यांच्यात दुवा निर्माण करणे होय.''

या सर्व व्याख्यांचा एकत्रित विचार केल्यास संदर्भ सेवेमध्ये व्यक्तिगत साहाय्य ही संकल्पना महत्त्वाची आहे. संदर्भ सेवा ही कोणत्याही हेतूसाठी दिली जाऊ शकते. संदर्भ सेवा देण्याकरिता ग्रंथालयाद्‌वारे जी कार्ये केली जातात किंवा त्याची पूर्वतयारी केली जाते अशा सर्व कार्यास संदर्भ सेवेचा भाग मानला जातो. संदर्भ सेवा ही वाचकाने मागणी केल्यावरच दिली जाते असे नसून तिची मागणी न करताही काही संदर्भ सेवा दिल्या जाऊ शकतात.

संदर्भ सेवेची कार्ये

ज्ञानाचा परिस्फोट, शिक्षण क्षेत्रात स्वीकारली गेलेली नवीन तंत्रे, ग्रंथालयात वापरले जात असलेले नवीन तंत्रज्ञान, संगणकीय नेटवर्कस्‌ची निर्मिती, अंकीय साधनांची निर्मिती व वाढ, तसेच विद्याशाखांमध्ये वाढत असलेले परस्परसंबंध, संशोधनात झालेली वाढ आणि वाचकांच्या बदललेल्या माहितीविषयक गरजा या व इतर अनेक कारणांमुळे संदर्भ सेवेची व्याप्ती वाढलेली आहे. ग्रंथालयातील वाचन साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग होण्याच्या दृष्टीने संदर्भ ग्रंथपालाला संदर्भ सेवा देण्यासाठी अनेक कार्ये व पूर्वतयारी करावी लागते. अशा परिस्थितीत वाचकांना मोठ्या प्रमाणावर व अचूक ग्रंथालय सेवा देण्यातच संदर्भ सेवेचे कार्य अवलंबून असते. कोणत्याही ग्रंथालयाचे महत्त्व व मूल्यमापन हे संदर्भ सेवेवर अवलंबून आहे. संदर्भ सेवेची व्याप्ती ही प्रत्येक ग्रंथालयानुसार वेगवेगळी असते. संदर्भ सेवेची व्याप्ती सर्वसाधारणपणे पुढील घटकांवर अवलंबून असते –

(अ) स्थानिक परिस्थिती
(आ) स्थानिक परंपरा
(इ) वाचकांचे प्रकार व त्यांच्या माहितीविषयक गरजा
(ई) ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहाचे स्वरूप व आकारमान
(उ) प्रमुख ग्रंथपालाची व ग्रंथालय सेवकांची कौशल्ये व अनुभव.



माहीत आहे का तुम्हांला ?

रेफरल सेवा (Referral Service) : कित्येकदा आपल्या ग्रंथालयात जी माहिती उपलब्ध नाही पण ती मिळवणे वाचकास गरजेचे आहे. अशा माहितीचे स्रोत इतरत्र कोणत्या ग्रंथालयात निश्चित उपलब्ध आहेत, याविषयी माहिती वाचकांना देणे यालाच रेफरल सेवा म्हणतात.

(१) सामान्य माहितीविषयक प्रश्नांची उत्तरे वाचकांस देणे : काही प्रश्नांना उत्तरे देताना संदर्भ ग्रंथांचा आधार घेण्याची गरज पडत नाही. परंतु, प्रश्नांचे अचूक उत्तर द्यावे लागते. उदा., ग्रंथालयाच्या वेळा काय आहेत? ग्रंथालयाच्या सभासदत्वाचे नियम काय आहेत? क्रमिक ग्रंथांचा संग्रह कोठे आहे? इत्यादी.

(२) विशिष्ट माहितीविषयक प्रश्नांची उत्तरे देणे : काही प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता उपलब्ध असलेल्या संदर्भ साधनांमधून माहिती शोधून उत्तरे द्यावी लागतात. उदा., कृष्णविवर (black hole) म्हणजे काय?, उडती तबकडी (flying dish) म्हणजे काय? इत्यादी.

(३) कोणत्याही माध्यमाद्‌वारे विचारलेल्या संदर्भ प्रश्नाचे उत्तर देणे : कोणत्याही माध्यमातून (टेलिफोन, पत्रव्यवहार, फॅक्स, ई-मेल द्‌वारे) विचारलेल्या संदर्भ प्रश्नाचे उत्तर त्वरित देणे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथांचे साहाय्य घेतले जाते.

(४) ग्रंथालयाची साधने वापरण्यासंबंधी वाचकांना साहाय्य करणे : बहुतांश वाचकांना ग्रंथालयातील वाचन साधनांविषयी पुरेशी कल्पना नसते. अशा वाचकांसाठी

संदर्भ ग्रंथपालाने साहाय्य करणे, वाचन साहित्य शोधण्यासाठी मदत करणे, ग्रंथालय तालिका वापरण्याविषयी व तिच्या उपयोगाविषयी मार्गदर्शन करणे, ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग वाढवणे इत्यादी कार्ये संदर्भ ग्रंथपालाच्या कक्षेत येतात.

(५) ग्रंथालयाच्या वापरासंबंधी वाचकांना प्रशिक्षण देणे : नवीन वाचक ग्रंथालय प्रणालीच्या वापराबाबत अनभिज्ञ असतात. अशा वाचकांना ग्रंथालयाची तोंडओळख करून देणे व त्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य संदर्भ ग्रंथपालास करणे आवश्यक असते.

(६) प्रदर्शन भरवणे : विविध प्रसंग, उत्सव, कार्यक्रम, सण इत्यादी प्रसंगी संबंधित ग्रंथांचे प्रदर्शन ग्रंथालयात भरवण्याचे कार्य संदर्भ ग्रंथपाल करतात.

(७) सूची सेवा व इतर सेवा देणे : सूची तयार करणे, सारसेवा व निर्देशन सेवा देणे, कात्रणांची फाईल तयार करणे, मातृ संस्थेविषयक माहिती जमवणे, भाषांतर सेवा पुरवणे, रेफरल सेवा देणे ही कार्येही संदर्भ ग्रंथपालाने करणे अपेक्षित आहे.

४.२ संदर्भ सेवांचे प्रकार पुढीलप्रमाणे :

(१) शीघ्र संदर्भ सेवा (Short Range Reference Service) **:** कमी वेळेत अथवा क्षणार्धात दिलेली संदर्भ सेवा म्हणजे शीघ्र संदर्भ सेवा होय. ही सेवा देताना लागणारा 'वेळ' हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो. उदा., एव्हरेस्टची उंची किती आहे?, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंचे नाव व पत्ता काय आहे? इत्यादी.

शीघ्र संदर्भ सेवा ही वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नांची (Fact Finding) उत्तरे देण्यासाठी असते. अशा प्रकारच्या सेवेत कमीत कमी वेळ लागतो. यासाठी विविध संदर्भ साधनांची मदत घेतली जाते. उदा., शब्दकोश, विश्वकोश, भौगोलिक साधने, वार्षिके, चरित्रात्मक संदर्भ ग्रंथ इत्यादींचा वापर केला जातो. या व्यतिरिक्त वर्तमानपत्रांची कात्रणे, पत्रके (Pamphlets), व्यापारी वाङ्मय (Trade Literature), अहवाल (Reports) यांचा उपयोग केला जातो.

(२) विलंबित संदर्भ सेवा (Long Range Reference Service) **:** विलंबित संदर्भ सेवेचे मूळ आधुनिक ग्रंथालयांतून दिलेल्या सेवेत दिसून येते. विलंबित संदर्भ सेवा ही विसाव्या शतकातील निर्मिती किंवा विकसित झालेली सेवा आहे. विलंबित सेवा ही त्वरित दिली जाऊ शकत नाही. अशा प्रकारच्या सेवा देण्यासाठी लागणारा 'वेळ', उपयोगात आणलेली विविध संदर्भ साधने आणि शोधलेली माहिती या आधारे ती ओळखता येऊ शकते. अशा प्रकारच्या सेवेस अर्ध्या तासापासून एक महिना किंवा काही महिने लागू शकतात. अशा संदर्भ सेवेस विलंबित संदर्भ सेवा संबोधले जाते.

विलंबित संदर्भ सेवा देताना विविध ग्रंथ, सूची, नियतकालिके, वर्तमानपत्रे, व्यापार वाङ्मय, माहिती पत्रके, सारस्वरुप व निर्देशन नियतकालिके इत्यादी वाचन साहित्याचा आधार घेतला जातो.

४.३ सामान्य ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यातील फरक :

सामान्य ग्रंथ हे विशिष्ट विषयास अनुसरून क्रमिक ग्रंथांमध्ये समाविष्ट होतात. उदा., टेक्स्टबुक ऑफ बॉटनी, इंट्रॉडक्शन टू फिलॉसॉफी, इंट्रॉडक्शन टू लॉजिक इत्यादी. क्रमिक पुस्तके ही मुळातच एखाद्या संस्थेने किंवा शासनाने एखाद्या विषयासाठी नेमलेली असतात (Prescribed). तसेच विविध विषयांवर जास्तीची माहिती देणारे इतर ग्रंथही सामान्य ग्रंथ या प्रकारात येतात. हे ग्रंथ विषयावरील नेमलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असतात.

एखाद्या विषयावर अनेक सामान्य ग्रंथ उपलब्ध असू शकतात परंतु संदर्भ ग्रंथ सर्व विषयांवरील अथवा विशिष्ट विषयांवरील विविध संज्ञा, सिद्धान्त यांवरील माहिती देतात. यातील माहितीची अनुवर्ण पद्धतीने रचना केलेली असते. उदा., एनसायक्लोपीडिया ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, डिक्शनरी ऑफ मॅथेमॅटिक्स, द न्यू एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका, मराठी विश्वकोश, आदर्श मराठी विश्वकोश, वीरकर डिक्शनरी, नवनीत शब्दकोश इत्यादी.

संदर्भ साधने ही वाचकास एखाद्या संज्ञेवर/संकल्पनेवर किंवा सिद्धान्तावर संकल्पनात्मक माहितीचे वर्णन करतात.

सामान्य ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यांच्यातील फरक पुढे दिलेल्या तक्त्याच्या साहाय्याने लक्षात येईल.

	सामान्य ग्रंथ	संदर्भ ग्रंथ
१.	सामान्य ग्रंथ हे पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचले जातात. उदा., कादंबरी, नाटक, चरित्रे, इतिहास, क्रमिक पुस्तके इत्यादी.	संदर्भ ग्रंथ हे पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचले जात नाहीत. हवा तेवढाच संदर्भ किंवा हवी तेवढीच माहिती वाचली जाते. उदा., शब्दकोश हा केवळ शब्दाचा अर्थ शोधण्यासाठी अथवा त्या संदर्भातील इतर माहिती शोधण्यासाठी उपयोगात आणला जातो. उदा., शब्दकोश, ज्ञानकोश, सूची, वार्षिके इत्यादी. संदर्भ साधने केवळ माहिती शोधण्याकरिता अथवा संदर्भ मिळवण्याकरिता वापरली जातात.
२.	एखाद्या विशिष्ट विषयावर सखोल माहिती दिलेली असते.	संदर्भ ग्रंथांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते व मजकुराची रचना संदर्भ ग्रंथाच्या गरजेनुसार केलेली असते. उदा., ज्ञानकोशाची रचना वर्णानुक्रमानुसार (alphabetical) केलेली असते व माहितीच्या घटकांचा एकमेकांशी संबंध असतोच असे नाही.
३.	सामान्य ग्रंथ हे ग्रंथालयाबाहेर वाचण्याकरिता दिले जाऊ शकतात.	संदर्भ ग्रंथ ग्रंथालयाबाहेर नेण्यास परवानगी नसते.
४.	असे ग्रंथ वाचकाकडून एकदाच हाताळले जातात.	संदर्भ ग्रंथांमध्ये समाविष्ट केलेल्या माहितीची अनेक वाचकांकडून मागणी केली जाऊ शकते.
५.	सामान्य ग्रंथ हे साधारणतः एक किंवा दोन-तीन लेखकांकडून लिहिले जातात.	संदर्भ ग्रंथातील मजकूर अनेक व्यक्तींनी लिहिलेला असतो. संपादकीय मंडळ, विषय तज्ज्ञ किंवा जाणकार व्यक्ती यांच्यामार्फत संदर्भ ग्रंथांची निर्मिती होते. संदर्भ ग्रंथांच्या निर्मितीकरता खूप कालावधी लागतो.
६.	सामान्य ग्रंथांची किंमत सामान्यपणे कमी असते.	संदर्भ ग्रंथ किमतीने महाग असतात.
७.	सामान्य ग्रंथातील मजकूर विविध प्रकरणांच्या स्वरूपात मांडलेला असतो व पहिल्या प्रकरणापासून शेवटच्या प्रकरणापर्यंत एकमेकांशी संबंधित असतो.	संदर्भ ग्रंथ हे अनेक खंडांत विविध माहितीवर प्रकाशित होतात. माहितीच्या विविध नोंदींमध्ये परस्पर संबंध असतोच असे नाही.


संदर्भ साहित्य

४.४ संदर्भ प्रश्न : संकल्पना आणि स्वरूप

वाचकांकडून एखाद्या विशिष्ट विषयावर माहितीची मागणी येते. यालाच संदर्भ प्रश्न असे संबोधले जाते. संदर्भ प्रश्न हे विविध स्वरूपाचे असू शकतात. संदर्भ प्रश्नाचे योग्य निरीक्षण करणे व त्या अनुषंगाने उत्तर देणे हे संदर्भ सेवेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. वाचकाने विचारलेल्या संदर्भ प्रश्नाचे उत्तर कोणत्या संदर्भ ग्रंथातून शोधायचे हे ग्रंथालयात उपलब्ध असणारे संदर्भ ग्रंथ, संदर्भ प्रश्नांचे स्वरूप, संदर्भ ग्रंथपालाचा अनुभव, कौशल्य व क्षमता या घटकांवर अवलंबून असते.

मागरिट हचिन्स यांच्या मते, ''छापील स्वरूपातील वाचन साहित्यात आढळणारी किंवा विशिष्ट वाचन साहित्यात आढळणारी किंवा काही वेळा ग्रंथालयात सहजासहजी न आढळणाऱ्या वाचन साहित्यातील विशिष्ट स्वरूपातील माहितीची मागणी वाचकांकडून केली जाते, त्यास 'संदर्भ प्रश्न' असे म्हणतात.''

थोडक्यात, वाचकाने संदर्भ विभागात केलेली माहितीची मागणी म्हणजे संदर्भ प्रश्न होय.

संदर्भ प्रश्नांचे प्रकार : वाचकास कोणत्या स्वरूपाची माहिती हवी आहे यावरून संदर्भ प्रश्नांचे विविध प्रकार पडतात.

(१) वस्तुस्थितिविषयक प्रश्न (Fact-finding Question) **:** अशा आशयांच्या प्रश्नांना अल्पावधीत संदर्भ सेवा दिली जाते. सर्वसाधारणपणे सामान्य, दैनंदिन व्यवहारातील प्रश्न किंवा वस्तुस्थितिदर्शक माहितीची मागणी करणारे प्रश्न म्हणजे वस्तुस्थितिविषयक प्रश्न. अशा प्रश्नांची त्वरित उत्तरे दिली जातात. या प्रश्नांची माहिती शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रात्मक साधने, सूची, भौगोलिक साधने (गॅझेटियर्स), वार्षिके यांच्या आधारे दिली जाते. उदा., फ्रान्सची राजधानी, भारतरत्न सचिन तेंडुलकरांचा जन्म दिनांक, पुण्याची लोकसंख्या, पुणे जिल्ह्यातील तालुके इत्यादी.

(२) सविस्तर माहितीची मागणी करणारे प्रश्न (Information bureau type questions) **:** अशा प्रकारचे प्रश्न हे साधारणतः व्यक्तिगत स्वरूपाचे असतात. अशा प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता नेहमीच्या संदर्भ ग्रंथांचा उपयोग होतोच असे नाही. कदाचित त्यात हवी ती माहिती मिळणारही नाही. अशा प्रश्नांची उत्तरे संदर्भ ग्रंथपाल सद्सद्विवेकबुद्धी व त्याची कौशल्ये वापरून तसेच अनुभवाच्या आधारेच देऊ शकतो. अशा वेळी, संदर्भ ग्रंथपाल वाचकांशी चर्चा करून त्यास हव्या असलेल्या नेमक्या माहितीविषयी स्पष्टता करून घेतो. त्यानुसार एक किंवा अनेक संदर्भ साधने हाताळून त्या प्रश्नास समर्पक उत्तरे देतो. अशा स्वरूपाच्या प्रश्नांना 'सविस्तर माहितीची मागणी करणारे प्रश्न' असे म्हणतात.

(३) अनेक संदर्भ ग्रंथ व वाचन साहित्याचा उपयोग करावे लागणारे प्रश्न (Material finding type questions) **:** काही प्रश्नांच्या संदर्भात माहिती देण्याकरिता संदर्भ ग्रंथपालास मोठ्या प्रमाणावर वाचन साहित्याचा शोध घ्यावा लागतो. यासाठी अनेक प्रकारचे संदर्भ ग्रंथ वापरून व त्यातून माहितीचा शोध घेऊन माहितीचे संकलन (compilation) करावे लागते. उदा., इंजिनियरींग अभ्यासक्रमास २०२० साली किती विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असतील? या प्रश्नाचे उत्तर हे मागील प्रवेशांच्या संख्येच्या दरवर्षी वाढत जाणाऱ्या किंवा घटत जाणाऱ्या प्रवाहावरून निष्कर्ष काढून दिले जाईल. याकरिता अनेक प्रकारच्या वाचन साहित्याचा उपयोग करावा लागेल. उदा., लोकसंख्याविषयक अहवाल, उच्चशिक्षणातील प्रवाह दर्शवणारा अहवाल, उपलब्ध विद्यापीठे व महाविद्यालये, त्यातील प्रवेशाच्या उपलब्ध जागा यांचे वार्षिक अहवाल इत्यादी.

(४) वाचकांना वाचनविषयक मार्गदर्शन करणारे प्रश्न (Readers' advisory type questions) **:** बऱ्याच वाचकांना एखाद्या विषयावर कोणते ग्रंथ वाचावेत याविषयी संभ्रम असतो. अशा वेळेस, हे वाचक संदर्भ ग्रंथपालाची मदत घेतात. अशा स्वरूपातील प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता संदर्भ ग्रंथपालाला ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या सर्व ग्रंथसंग्रहाचे किंवा संदर्भ ग्रंथांचे ज्ञान असावे लागते. वाचकांच्या प्रश्नांचा विषय लक्षात घेऊन संदर्भ ग्रंथपाल ग्रंथसूची तयार करतो व वाचकांना सादर करतो. अशा प्रश्नांना 'वाचकांना मार्गदर्शन करणारे प्रश्न' असे संबोधले जाते. असे प्रश्न हे अतिशय व्यक्तिगत स्वरूपाचे असतात व बरेचदा वाचकांना नवीन ग्रंथांची ओळख या स्वरूपात होते.

(५) संशोधनविषयक प्रश्न (Research type questions) **:** संशोधन करणाऱ्या व्यक्तीस सर्वसाधारणपणे त्याच्या विषयातील अद्ययावत माहितीची गरज असते. परंतु, संदर्भ ग्रंथांची योग्य माहिती नसल्यामुळे अभ्यासक (संशोधक) हवी ती माहिती शोधू शकत नाही. यासाठी सूक्ष्म व अतिसूक्ष्म वाचन साधनांचा शोध घ्यावा लागतो. संदर्भ ग्रंथपाल अशा वाचकांचे संशोधनविषयक प्रश्न दीर्घकालीन संदर्भ सेवेनुसार प्रदान करतो. यामध्ये नियतकालिकांतील लेख, निर्देशन नियतकालिके, सारस्वरूप नियतकालिके, पेटंट्स, प्रमाणके, तांत्रिक अहवाल, ऑनलाईन माहिती संचातून शोध इत्यादीमधून संशोधन विषयाशी संबंधित माहिती संदर्भ ग्रंथपाल संशोधकाला मागणीनुसार देत असतो. संदर्भ ग्रंथपालास असलेले विषयज्ञान व सूची तयार करण्याचे कौशल्य, तसेच विविध माहितीची प्रतिप्राप्ती करण्याची कला अवगत असल्याने तो वाचकास अद्ययावत व पूर्वलक्ष्यी प्रभावाने (Retrospective) माहितीचा शोध घेऊन ती देतो.

४.५ संदर्भ ग्रंथ व त्यांचे प्रकार

संदर्भ ग्रंथ : संदर्भ ग्रंथ हे सर्वसाधारणपणे कोणत्याही प्रकारची माहिती शोधण्याकरिता अथवा संदर्भ मिळवण्यासाठी उपयोगात आणले जातात. ज्यातील मजकुराची रचना विशिष्ट प्रकारे केलेली असते. यांचा वापर फक्त ठरावीक संदर्भ अथवा माहिती शोधण्यास होतो. अशा साधनांना संदर्भ ग्रंथ असे म्हणतात.

संदर्भ ग्रंथांचे प्रकार : संदर्भ ग्रंथांचे प्रामुख्याने दोन प्रकार सांगता येतील : (अ) पारंपरिक संदर्भ ग्रंथ (आ) आधुनिक संदर्भ ग्रंथ (डिजिटल संदर्भ ग्रंथ, डेटाबेसेस).

अंकीय युगात अनेक स्थित्यंतरांमुळे आधुनिक संदर्भ साधनांचाही एक नवीन प्रवाह निर्माण झाला आहे. त्यांना आपण आधुनिक प्रकार म्हणून संबोधू शकतो.


(अ) पारंपरिक संदर्भ साधने : पारंपरिक संदर्भ साधने म्हणजे छापील स्वरूपातील एक अथवा अनेक विषयासंदर्भातील माहिती घटक अनेक तज्ज्ञांनी लिहिलेले असतात. अशा माहिती घटकांची विशिष्ट पद्धतीने रचना केलेली असते व ते एक अथवा अनेक खंडांतही प्रकाशित होतात. ठरावीक कालावधीनंतर अशा संदर्भ साधनांची सुधारित आवृत्ती प्रकाशित केली जाते.

संदर्भ ग्रंथांचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :

(१) शब्दकोश, (२) ज्ञानकोश, (३) चरित्रात्मक साधने, (४) वार्षिके, (५) भौगोलिक साधने (गॅझेटियर्स), (६) मार्गदर्शिका (Guide Books), (७) निर्देशिका (Directory) (८) हँडबुक (Handbook), (९) सूची (Bibliography) इत्यादी.

(१) शब्दकोश (Dictionary) :

'Dictionary' या शब्दाचा उगम 'diction' या लॅटीन शब्दापासून झाला आहे. शब्दकोश हे विविध भाषांमध्ये वापरले जाणारे शब्द, त्यांची वर्णरचना, संज्ञांचे अर्थ, व्याख्या, उच्चार, व्याकरणातील



शब्दकोश

स्थान, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द इत्यादींसाठी उपयुक्त संदर्भ साधन म्हणून प्रचलित आहे. याचा उपयोग नवीन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना तसेच इतर प्रशासकीय कार्ये करणाऱ्या व्यक्तींना होतो. शब्दकोशांचे विविध प्रकार पुढील प्रमाणे सांगता येतील.

- एकभाषिक शब्दकोश
- द्विभाषिक शब्दकोश
- बहुभाषीय शब्दकोश
- सामान्य शब्दकोश
- विशिष्ट विषयाचा शब्दकोश
- थिसॉरस
- तांत्रिक शब्दांचा शब्दकोश
- वाक्प्रचारांचा शब्दकोश
- व्युत्पत्ती कोश

व्याख्या : ''शब्दकोश म्हणजे असे साधन आहे ज्यात एखाद्या भाषेतील शब्दांची वर्णरचना (spelling), शुद्धलेखन, उच्चार, महत्त्व, उपयोग, समानार्थी शब्द, रूपांतरित शब्द, शब्दांचा इतिहास यांवर विशिष्ट माहिती संदर्भाकरिता दिलेली असते व शब्दांची रचना अनुवर्णक्रमानुसार केलेली असते''. (Oxford English Dictionary)

उपयोग

(अ) शब्दांची योग्य वर्णरचना (spelling) तपासण्याकरिता

(आ) शब्दांचा योग्य उच्चार माहीत करून घेण्याकरिता

(इ) शब्दाचे व्याकरणातील स्थान माहीत करून घेण्याकरिता

(ई) शब्दांच्या विविध अर्थच्छटा बघण्याकरिता

(उ) भाषांतराच्या कार्याकरिता

(ऊ) समानार्थी व विरुद्धार्थी शब्द बघण्याकरिता


(ए) विविध विषयांतील संज्ञा व संकल्पनांच्या व्याख्यांकरता


थोडक्यात, शब्दार्थांपासून ते भाषा शिकण्यापर्यंत, विद्यार्थ्यांपासून ते तज्ज्ञांपर्यंत सर्वजण शब्दकोशांचा उपयोग करतात.

शब्दकोशाची उदाहरणे

- ऑक्सफर्ड ॲडव्हान्स्ड लर्नर्स डिक्शनरी ऑफ करंट इंग्लिश,
  मूळ लेखक : हॉर्नबी, ए.एस.
  (आठवी आवृत्ती उपलब्ध)
  प्रकाशक : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
- द रँडम हाऊस डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज,
  संपादक : स्टीन जेस
  प्रकाशक : रँडम हाऊस इनकॉरपोरेशन
  प्रकाशन स्थळ : न्यूयॉर्क
- रॉज्येज इंटरनॅशनल थिसॉरस
  मूळ लेखक : रॉज्ये, पिटर मार्क, पाचवी आवृत्ती
  संपादक : चॅपमन, रॉबर्ट एल
  प्रकाशक : हार्पर पेरेनियल, न्यूयॉर्क
- स्टुडंट्स मॉडर्न डिक्शनरी : इंग्लिश-इंग्लिश-मराठी
  लेखक : केशव भिकाजी ढवळे
  प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे
  प्रकाशन स्थळ : मुंबई

(२) ज्ञानकोश (Encyclopedia) : 'एनसायक्लोपीडिया' ही संज्ञा ग्रीक भाषेतील 'एनक्लाइ' (Encloi) म्हणजे ग्रुप या अर्थाने आणि पीडिया (Pedia) म्हणजे शिकणाऱ्यांचा या शब्दांपासून तयार झाली आहे. यामध्ये विविध ज्ञानशाखांची माहिती समाविष्ट केलेली असते. मजकुराची रचना अनुवर्णक्रमानुसार वर्गीकृत स्वरुपात अथवा विषयानुसार केलेली असते. ज्ञानकोशाची निर्मिती अनेक विषयतज्ज्ञ व्यक्ती व संपादकांकडून केली जाते. ज्ञानकोशास ज्ञानाचे भांडार असेही म्हणतात. विश्वातील उपलब्ध ज्ञानाविषयी माहितीचे संकलन ज्ञानकोशात केले जाते. वाचकांच्या विविध माहितीविषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने ज्ञानकोशाची निर्मिती केली जाते.


मराठी विश्वकोश



ज्ञानकोश

व्याख्या : हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक यामध्ये ज्ञानकोशाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे :

"सर्व विषयांच्या अथवा विशिष्ट विषयांच्या माहितीचा समावेश असलेला व ज्यातील माहितीची पद्धतशीरपणे अनुवर्णक्रमानुसार रचना केलेली असते असा ग्रंथ म्हणजे ज्ञानकोश. ज्ञानकोश हा एक अथवा अनेक खंडांत असू शकतो व त्यात विस्तृतपणे माहिती दिलेली असते. ही माहिती विषय तज्ज्ञांकडून लिहिली जाते".

ज्ञानकोशाचे प्रकार

- सामान्य ज्ञानकोश (General Encyclopedia), उदा., द न्यू एनसाक्लोपीडिया ब्रिटानिका, एनसायक्लोपीडिया अमेरिकाना, मराठी विश्वकोश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, संपादक : श्रीधर व्यंकटेश बापूजी केतकर
- विशिष्ट विषयांचे ज्ञानकोश (Encyclopedia of Subject), उदा., एनसायक्लोपिडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फॉरमेशन सायन्स, ॲलन केंट
- विशिष्ट ज्ञानशाखेचा ज्ञानकोश (Encyclopedia of specific branch of knowledge), उदा., इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस, मॅकग्रॉ-हिल एनसायक्लोपीडीया ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, भारतीय संस्कृती कोश, संपादक : पं.महादेवशास्त्री जोशी

ज्ञानकोशांचा उपयोग

(अ) कोणत्याही विषयाची पार्श्वभूमी माहीत होण्याकरिता ज्ञानकोशाचा उपयोग होतो.

(आ) विशिष्ट संकल्पना अथवा संज्ञांची व्याख्या मिळते.

(इ) पायाभूत माहितीचा अभ्यास साधन म्हणून उपयोगात आणला जातो.


(ई) एखादी वस्तू, भौगोलिक स्थान, सिद्धान्त अथवा संशोधनासंबंधीची माहिती, सचित्र अथवा नकाशे व आकृत्यांच्या साहाय्याने दिलेली असते.

(उ) जगातील नामवंत संस्थांची माहिती व व्यक्तींविषयक माहिती यात समाविष्ट असते.

(३) वार्षिके व पंचांग (Yearbooks and Almanac)

वार्षिके

व्याख्या : हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक या ग्रंथातील व्याख्येनुसार ''विविध स्वरूपाची अद्ययावत माहिती थोडक्यात किंवा विस्तृतपणे वर्णन केलेली अथवा सांख्यक स्वरूपात उपलब्ध करून देते व असा ग्रंथ प्रत्येकवर्षी सुधारित स्वरूपात प्रकाशित केला जातो. अशा ग्रंथास वार्षिक असे म्हणतात.''



वार्षिके

उदा., द स्टेटमन्स् इयर बुक, मनोरमा इयर बुक, युरोपा इयर बुक, इंडिया : ए रेफरन्स ॲन्युअल, व्हिटॅकर्स अल्मनॅक इत्यादी.

वार्षिकांमध्ये सर्वसाधारणतः खालील प्रकारच्या माहिती घटकांचा समावेश असतो.

(अ) एका वर्षातील महत्त्वाच्या घटनांची काल क्रमाने माहिती

(आ) एका वर्षातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचा सारांश

(इ) एका वर्षाच्या कालावधीतील विज्ञान आणि तंत्रज्ञानासह विविध क्षेत्रांतील नवीन घडामोडी

(ई) विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या मृत अथवा जिवंत व्यक्तींची चरित्रे

(उ) विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटनांची माहिती


(उ) सांख्यिकीय माहिती, खेळातील बक्षिसे, पारितोषिके, लोकसंख्या इत्यादींचा समावेश वार्षिकांमध्ये केला जातो.

पंचांग (Almanac): प्राचीन काळापासून युरोपमध्ये व भारतात पंचांगे प्रकाशित केली जातात. खगोल व गणितशास्त्राच्या आधारे सर्व प्रकारची माहिती पंचांगांमध्ये समाविष्ट केलेली असते.

उदा., दाते पंचांग, टिळक पंचांग, कालनिर्णय इत्यादी.

(४) चरित्रकोश (Biographical Dictionaries)

(४) चरित्रकोश (Biographical Dictionaries) : ग्रीक आणि लॅटीन भाषेत महत्त्वाच्या व्यक्तींची चरित्रे लिहिली गेल्याची उदाहरणे आढळतात. परंतु, १७ व्या शतकाच्या मध्यात इंग्लंडमध्ये चरित्रग्रंथांना साहित्यिक कलाकृती म्हणून मान्यता मिळाली. विविध क्षेत्रांतील व्यक्तींची थोडक्यात लिहिलेली चरित्रे विसाव्या शतकात एकत्रितपणे प्रकाशित होऊ लागली. अशा ग्रंथांना चरित्रकोश असे म्हणतात.



चरित्रकोश

व्याख्या : लुईस शोर्स यांनी चरित्रकोशाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

''प्रथितयश व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश असलेली निर्देशिका, ज्यात आडनावांच्या अनुवर्णक्रमानुसार रचना केलेली असते. असा ग्रंथ म्हणजे चरित्रकोश होय. यात छोट्या घटनांपासून ते विस्तृत माहितीपर्यंत व्यक्तींची चरित्रात्मक माहिती दिलेली असते.'' उदा.,

- भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश – ३ खंड, लेखक : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
- मराठी विश्वचरित्रकोश – ५ खंड,
- वेबस्टर्स बायोग्राफिकल डिक्शनरी

- डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफी. संपादक : एस.पी.सेन, कोलकाता
- हूज हू ऑफ इंडियन रायटर्स
- इंडिया : हूज हू
- मराठी सारस्वत : २ खंड व १ पुरवणी खंड संपादक : अनंत जोशी

उपयोग


(अ) समाजातील विविध क्षेत्रांतील महत्वाच्या व्यक्तींची माहिती मिळते.

(आ) विविध प्रसंगी व्यक्तींची माहिती हवी असते. उदा., जन्मशताब्दी, पुण्यस्मरणदिन, पारितोषिक, कार्यक्षेत्र, शिक्षणविषयक माहिती इत्यादी.

(इ) इतरत्र कोणत्याही साधनांमध्ये उपलब्ध नसणारी व्यक्तींविषयक माहिती अशा संदर्भ ग्रंथांमध्ये मिळते.

(५) भौगोलिक संदर्भ ग्रंथ : एखाद्या भौगोलिक स्थानाचे अक्षांश व रेखांशानुसार स्थान, लोकसंख्या, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, महत्वाचे उद्योगधंदे, शेती इत्यादींविषयी माहिती यात असते. व्यावसायिकांना व उद्योजकांना अशा प्रकारची माहिती हवी असते. त्याचप्रमाणे, आधुनिक काळात पर्यटनाकडे एक नवीन व्यवसाय म्हणून बघितले जाते. पर्यटनाच्या दृष्टीनेही अशा प्रकारचे संदर्भ ग्रंथ उपयुक्त असतात. पर्यटनाचे स्थळ, त्याची ऐतिहासिक व नैसर्गिक माहिती अशा संदर्भ ग्रंथांमधून प्राप्त होते.


भौगोलिक संदर्भ ग्रंथांचे प्रकार



स्थलवर्णन कोश


(अ) स्थलवर्णन कोश (Gazetteer) : अनुवर्णक्रमानुसार स्थळांची रचना केलेला कोश म्हणजे स्थलवर्णन कोश होय. यामध्ये गावे, शहरे, महासागर, नद्या, तळी इत्यादी भौगोलिक स्थळांची माहिती थोडक्यात दिलेली असते. उदा., मेरिअम वेबस्टर्स जिओग्राफिकल डिक्शनरी, द गॅझेटियर ऑफ इंडिया, चेंबर्स वर्ल्ड गॅझेटियर, कोलंबिया लिपिनकॉट गॅझेटियर ऑफ द वर्ल्ड, गॅझेटियर ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट इत्यादी.

(आ) प्रवास मार्गदर्शिका (Travel Guide): अशा प्रकारचे संदर्भ ग्रंथ हे प्रवाशांना उपयुक्त असतात. यामध्ये विशिष्ट शहरे, उद्याने, देश, वस्तुसंग्रहालये, ऐतिहासिक स्थळे, भौगोलिकदृष्ट्या महत्वाची स्थळे, आध्यात्मिकदृष्ट्या महत्वाची स्थळे इत्यादी विषयीच्या माहितीचा समावेश असतो. उदा., फॉडर्स इंडिया, टूरिस्ट गाइड टू इंडिया, पुणे ए टू झेड.



प्रवास मार्गदर्शिका

(इ) ॲटलास, नकाशे आणि पृथ्वीगोल (Atlas, Maps and Globe) :



ॲटलास

ॲटलास (Atlas) : ॲटलास म्हणजे नकाशांचा एकत्रित संग्रह असलेला ग्रंथ होय. यांचे सामान्यपणे तीन विभाग केले जातात : (१) अद्ययावत ॲटलासेस, (२) ऐतिहासिक ॲटलासेस, (३) विषय ॲटलासेस.

ॲटलास हे भौगोलिक स्थानांचे अक्षांश व रेखांश दर्शवतात. उदा., ऑक्सफर्ड ॲटलास, द टाइम्स ॲटलास ऑफ द वर्ल्ड, आवृत्ती १० वी.

नकाशे (Maps) : भूभागावरील/पृथ्वीवरील जमीन किंवा समुद्राच्या क्षेत्राची भौतिक वैशिष्ट्ये, तेथील शहरे, रस्ते, त्यांच्या भौगोलिक सीमारेषा दर्शवणारे आरेखनात्मक साधन म्हणजे नकाशे. हे नकाशे एखाद्या


पृथ्वीगोल


शहराचे, खेड्याचे, राज्याचे, देशाचे, खंडाचे व जगाचे असतात.

पृथ्वीगोल (Globe) : पृथ्वीगोल हा पृथ्वीचा भूभाग दर्शवतो.

(६) वाचन साहित्य सूची (Bibliography) : सूचीच्या अनेक व्याख्या आहेत. परंतु, कित्येक लेखकांच्या मते,

(अ) ''सूची म्हणजे छापील ग्रंथांचा समीक्षात्मक व ऐतिहासिक अभ्यास होय.'' या संज्ञेचा उगम १८ व्या शतकाच्या अखेरीस फ्रान्समध्ये ग्रंथालय शास्त्रामधून झाला.

(आ) इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिया ऑफ इन्फॉरमेशन अँड लायब्ररी सायन्स, या ज्ञानकोशात दिलेली सूचीची व्याख्या पुढीलप्रमाणे : ''ग्रंथ, हस्तलिखिते आणि इतर प्रलेखांची पद्धतशीर माहिती आणि विश्लेषणात्मक अभ्यास म्हणजे सूची होय.''



सूची

थोडक्यात, सूची म्हणजे ग्रंथांची यादी. या यादीमध्ये प्रकाशित ग्रंथांची माहिती दिलेली असते. जसे की, लेखकाचे नाव, ग्रंथनाम, आवृत्ती क्रमांक, प्रकाशकाचे नाव, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष, पृष्ठसंख्या इत्यादी.

सूचींचे मुख्य प्रकार खालीलप्रमाणे –

(१) वर्णनात्मक सूची (Descriptive Bibliography) : या सूचीत लेखक कोण, ग्रंथ कोणी प्रकाशित केला, ग्रंथ कोठे व केव्हा प्रकाशित केला, खरेदी करायचा असल्यास किंमत किती व त्याची ग्रंथालय प्रत (Delux Copy) उपलब्ध आहे का? सूची ही केवळ ग्रंथांचीच असते असे नव्हे तर आधुनिक काळातील वेबसाईट्स, छायाचित्रांचा संग्रह, फिल्म्स, डेटाबेसेस इत्यादींचा समावेश सूचीत केला जातो.

(२) पद्धतशीर अथवा शास्त्रीय सूची (Systematic Bibliography) : पद्धतशीर सूचीत ग्रंथांविषयी परिपूर्ण माहिती दिलेली असते. संबंधित विषयांवर पूर्वलक्ष्यी प्रभावाने सर्व उपलब्ध ग्रंथांची माहिती दिलेली असते. तसेच भविष्यातही प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची माहिती समाविष्ट केली जाते. व्यापक सूचीमध्ये प्रकाशित झालेल्या सर्व तऱ्हेच्या वाचन साहित्याचे अहवालांपासून ते ग्रंथ व इतर स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक डेटाबेसेस यांचा समावेश होतो.''

उपयोग

(अ) संदर्भ विभागामध्ये संदर्भ ग्रंथपालाकडून सूचींचा उपयोग केला जातो.

(आ) ग्रंथनिवडीकरता व ग्रंथांचा आदेश देण्याकरिता त्यांचा तपशील सूचींमधून प्राप्त केला जातो.

(इ) संशोधकांनी संशोधन कार्यास सुरुवात केल्यानंतर त्यांच्या संशोधन विषयाशी संबंधित वाङ्‌मयशोध हा सूचींच्या साहाय्याने केला जातो.

(ई) विद्यार्थी व जिज्ञासू अभ्यासकांना त्यांच्या विषयाशी संबंधित ग्रंथ व इतर वाचन साहित्याची माहिती मिळवण्यासाठी सूचीचा उपयोग होतो.

सूचींचे साधारणतः मान्य केलेले विविध प्रकार पुढीलप्रमाणे :

(अ) वैश्विक ग्रंथ सूची (Universal Bibliography) : या सूचीमध्ये जगभरातील सर्व प्रकारच्या व सर्व काळात प्रकाशित झालेल्या वाचन साहित्याची यादी दिलेली असते. उदा., बिब्लिओथेका युनिव्हरसॅलिस

(आ) राष्ट्रीय ग्रंथ सूची (National Bibliography) : विशिष्ट देशात प्रकाशित झालेल्या सर्व ग्रंथांची यादी म्हणजे राष्ट्रीय ग्रंथ सूची होय. उदा., इंडियन नॅशनल बिब्लिओग्राफी, ब्रिटिश नॅशनल बिब्लिओग्राफी

(इ) व्यापारी ग्रंथ सूची (Trade Bibliography) : प्रकाशक, ग्रंथ वितरक व ग्रंथ विक्रेते यांच्या मार्फत उपलब्ध होणाऱ्या ग्रंथांची यादी म्हणजे व्यापारी ग्रंथ सूची होय. उदा., बुक्स इन प्रिंट, क्युम्युलेटिव्ह बुक इंडेक्स इत्यादी.


(ई) भाषा ग्रंथ सूची (Language

Bibliography) : विशिष्ट भाषेमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची यादी म्हणजे भाषा सूची होय. उदा., मराठी ग्रंथसूची, संपादक : शं.ग.दाते

(उ) विषय ग्रंथ सूची (Subject Bibliography): विशिष्ट विषयाशी संबंधित ग्रंथांची यादी म्हणजे विषय ग्रंथ सूची होय. उदा., बायोलॉजिकल इंडेक्स, केमिकल इंडेक्स, ॲनालिटिकल बिब्लिओग्राफी ऑफ इंडियन इकॉनॉमी, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

(७) निर्देशिका (Directory)

व्याख्या : इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिया ऑफ इन्फॉरमेशन अँड लायब्ररी सायन्स यामध्ये दिलेली निर्देशिकेची व्याख्या, ''निर्देशिका म्हणजे पारंपरिक ग्रंथ स्वरूपातील डेटाबेस, ज्यामध्ये विशिष्ट भूभागातील अथवा समान हितसंबंध असलेल्या एकाच व्यवसायातील संस्था किंवा व्यावसायिकांची नावे, पत्ते व काही वेळेस इतर स्वरूपातील माहिती समाविष्ट केलेली असते.''



निर्देशिका

निर्देशिकेमधील माहितीचे स्वरूप : निर्देशिकेमध्ये उच्चशिक्षणाशी संबंधित संस्था, विद्यापीठे, विज्ञानक्षेत्रातील संशोधन संस्था, व्यावसायिक संस्था, सामाजिक, आर्थिक संस्था इत्यादी संस्थांविषयी माहिती दिलेली असते.

काही निर्देशिका या व्यक्तींविषयक आणि व्यवसायाच्या संबंधित व्यक्तींची माहिती देतात. यामध्ये असलेल्या माहिती घटकात संस्थांची नावे, पत्ता, अधिकाऱ्यांची नावे व त्यांची पदनामे याविषयीची माहिती, संस्थेची उद्दिष्टे व कार्ये, प्रकाशने अशीही माहिती समाविष्ट केली जाते.

उदा., टेलिफोन डिरेक्टरी, द वर्ल्ड ऑफ लर्निंग, डिरेक्टरी ऑफ सायंटिफिक अँड रिसर्च इन्स्टिट्युट्स इन इंडिया, युनिवर्सिटीज हँडबुक इत्यादी.

(आ) आधुनिक संदर्भ साधने

(१) डिजिटल संदर्भ साधने : ग्रंथालयांमधून दिल्या जाणाऱ्या संदर्भ सेवांकरिता पारंपरिक संदर्भ ग्रंथांबरोबच डिजिटल (इलेक्ट्रॉनिक) स्वरूपातील वाचन साहित्य वापरले जाते. डिजिटल स्वरूपातील संदर्भ साधने ही पुढील स्वरूपात उपलब्ध असतात – इंटरनेटवर विविध संकेतस्थळांवर उपलब्ध असणारी प्रकाशने, सीडी–रॉम, डीव्हीडी इत्यादी.

(२) डेटाबेसेस (Databases) : डेटाबेसच्या स्वरूपात साठवलेल्या माहिती साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होत आहे. डेटाबेसचे स्वरूप त्यात असणारे माहिती घटक व त्याची उपयुक्तता लक्षात घेतल्यास त्यास एक स्वतंत्र 'संदर्भ ग्रंथ' म्हणून संबोधले जाते.

व्याख्या

(अ) इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिया ऑफ इन्फॉरमेशन अँड लायब्ररी सायन्स, संपादक जॉन फीदर व पॉल स्टर्जेस या ज्ञानकोशात 'डेटाबेस' या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

''कोणत्याही स्वरूपात सुव्यवस्थितरीत्या संचयित केलेली माहिती, जी मुद्रित स्वरूपातही असू शकेल. तथापि, संगणकातील फाईलमध्ये सीडी–रॉममध्ये संचयित केलेली माहिती म्हणजे डेटाबेस.''

व्यापारी तत्त्वावर उपलब्ध असलेले डेटाबेसेस हे संगणकीय जाळ्यांमधून प्राप्त केले जाऊ शकतात.

थोडक्यात, परस्पर संबंधित माहितीचा अंकीय संचय म्हणजे डेटाबेस, जो वापरकर्त्यांना सहज प्राप्त होऊ शकतो.

(आ) जॉन कॉन्व्हे यांनी डेटाबेसची केलेली व्याख्या :

''यांत्रिक पद्धतीने वाचता येऊ शकेल किंवा माहिती प्राप्त करता येऊ शकेल अशी संचयित केलेली माहिती, दूरवर उपलब्ध असलेल्या संगणकाच्या साहाय्याने उपलब्ध होऊ शकते.''

डेटाबेसचे प्रकार पुढीलप्रमाणे

(१) संदर्भ डेटाबेस (Reference Database): संदर्भ डेटाबेसच्या माध्यमातून मूळ प्रलेखाचा शोध घेता येऊ शकतो. संदर्भ डेटाबेसचे पुढील प्रकार आहेत -

- सूचीय डेटाबेस
- तालिका डेटाबेस
- रेफरल डेटाबेस

(२) साधन डेटाबेस (Source Database) : साधन डेटाबेसमध्ये मूळ साधनातील माहिती संगणकाच्या साहाय्याने मिळवता व वाचता येते. या डेटाबेसचे प्रकार :

- सांख्यिकीय डेटाबेस (Numeric Database)
- पूर्णसंहिता डेटाबेस (Full-text Database)
- बहुमाध्यमांचे डेटाबेस (Multimedia Database)

उदा., ॲग्रिकोला, मेडलाईन, एरिक, लिसा (LISA) इत्यादी.

साधारणतः विशिष्ट विषयांची माहिती, संबंधित विषयांसंबंधी विचारले जाणारे प्रश्न व ती माहिती देण्याकरिता उपयोगात आणली जाणारी संदर्भ साधने पुढील तक्त्याच्या साहाय्याने विशद करता येतील.

विषय	निगडित प्रश्न (संभाव्य प्रश्न)	उपयोगात आणली जाणारी संदर्भ साधने
भाषा	शब्द, संज्ञांचे अर्थ, व्याख्या, वर्णरचना (spelling), उच्चार, लघुरूपे, उपयोग, व्याकरणातील स्थान, परकीय शब्द, समानार्थी व विरुद्धाथी शब्द , अनेक अर्थी शब्द, शब्दांची व्युत्पत्ती इत्यादी.	शब्दकोश, थिसॉरस, व्युत्पत्तीकोश इत्यादी.
विषयाची/घटकाची मूलभूत संकल्पना	सामान्य माहिती, विषयांवरील माहिती, संज्ञा, भौगोलिक स्थाने, आंतरराष्ट्रीय ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, संस्था व संघटना इत्यादी.	ज्ञानकोश
व्यक्ती	महत्वाच्या व्यक्ती, विषयतज्ज्ञ, व्यावसायिक, राजकीय व्यक्ती, नामवंत लेखक, खेळाडू इत्यादी.	चरित्रात्मक संदर्भ साधने
भौगोलिक माहिती	स्थान, स्थलवर्णन, अंतर (distance), स्थळविषयक माहिती – अक्षांश-रेखांशानुसार स्थान, हवामान, भौगोलिक वैशिष्ट्ये, पर्यटन स्थळे, सामाजिक व आर्थिक माहिती इत्यादी.	भौगोलिक साधने – गॅझेटियर, ज्ञानकोश, ॲटलास, नकाशे इत्यादी.
संघटना व संस्था	पत्ते, उद्देश, सदस्यत्व, प्रकाशने, इतिहास, स्वरूप, प्रमुख अधिकारी यांचे पत्ते इत्यादी.	वार्षिके, निर्देशिका
घटना, विविध कार्यक्रमांची माहिती	घटना, सांख्यक माहिती, सूत्रे, परंपरांविषयींची माहिती, चालीरिती, वाङ्मयीन कलाकृतींची कथानके, पात्रे (Characters), विधाने (quotations), कार्यक्रमाच्या नोंदी इत्यादी.	विविध वार्षिके, सांस्कृतिक कोश, समाजविज्ञान शास्त्रांचे कोश, ज्ञानकोश, गॅझेटियर इत्यादी.
वाचन साधनांविषयीची माहिती	उत्कृष्ट ग्रंथ, अभिजात ग्रंथ (classics), विशिष्ट विषयांवरील ग्रंथ, विशिष्ट देशात अथवा भूभागात प्रकाशित झालेले ग्रंथ, वाचन साहित्याचे उपलब्ध असलेले स्थान, विशिष्ट ग्रंथांचा सूचीय तपशील	विविध प्रकारच्या सूची, डेटाबेसेस, संघतालिका इत्यादी.

४.६ संदर्भ ग्रंथांच्या मूल्यमापनाचे निकष

कोणतेही संदर्भ ग्रंथ उपार्जित करण्यापूर्वी त्याचे विविध निकषांच्या आधारे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. मूल्यमापनामुळे संदर्भ ग्रंथांची गुणवत्ता निश्चित केली जाते. मूल्यमापनाचे काही निकष खाली विशद केलेले आहेत. ग्रंथपालन व्यावसायिकांच्या दृष्टीने संदर्भ ग्रंथांच्या मूल्यमापनाचे हे निकष ग्रंथालयात त्यांच्या निवडीसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे म्हणून उपयोगी आहेत.

(१) व्याप्ती : व्याप्ती या निकषाद्वारे संदर्भ ग्रंथांचे हेतू, समाविष्ट विषयाची व्याप्ती (Coverage), अद्ययावतता हे निकष तपासून पाहिले जातात. 'हेतू' हा निकष संदर्भ ग्रंथाची उपयुक्तता दर्शवतो.

संदर्भ ग्रंथातील समाविष्ट विषयांबाबत सखोल व अद्ययावत माहिती दिलेली आहे किंवा नाही व ही माहिती कोणत्या वर्षापर्यंत समाविष्ट केली आहे इत्यादींचा विचार करावा.

(२) समर्पकता : संदर्भ ग्रंथ हे कोणत्या विषयाशी निगडित आहेत? या विषयाची माहिती त्यास अनुसरून दिलेली आहे किंवा नाही? हे तपासणे अत्यावश्यक आहे.

(३) संदर्भ ग्रंथांचे बाह्य स्वरूप : ग्रंथांची बांधणी टिकाऊ आहे काय? आकर्षक आहे काय? सहजासहजी ग्रंथ हाताळता येतो काय? छपाई स्पष्ट व चांगल्या दर्जाची आहे काय? या गोष्टी तपासणे महत्त्वाचे आहे.

(४) अधिकृतता व विश्वसनीयता : संदर्भ ग्रंथांत दिलेली माहिती व ज्ञान हे विश्वसनीय आहे काय?, ज्यांनी ती माहिती लिहिलेली आहे ते त्या विषयातील तज्ज्ञ आहेत काय? प्रकाशक नावलौकिक असलेला आहे काय? या बाबींची तपासणी करून घेणे आवश्यक असते.

(५) सादरीकरण

लेखकाने विषय ज्या पद्धतीने हाताळलेला आहे त्यासंदर्भात पुढील प्रश्नांचा विचार व्हावा.

(अ) दिलेली माहिती बरोबर आहे काय?

(आ) सांख्यिकीय माहिती आहे काय?

(इ) लेखकाने वापरलेल्या साधनांचा उल्लेख सूचीत दिलेला आहे काय?

(ई) वस्तुनिष्ठ माहिती दिलेली आहे काय?

(उ) माहिती पूर्वग्रहदूषितपणे (baised) दिलेली आहे काय?

(ऊ) कोणत्या प्रकारच्या वाचकांकरिता साधन लिहिलेले आहे? वाचकांचा (विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ व्यक्ती, अभ्यासक, सामान्य नागरिक, स्त्रिया इत्यादी) दर्जा काय?

(६) एका विषयाशी संबंधित इतर संदर्भ साधनांशी साधर्म्य (Relation to similar works) : हा संदर्भ ग्रंथ एकमेवाद्वितीय आहे काय? याच्या सुधारित आवृत्त्या प्रकाशित केल्या जाऊन त्यातील माहिती घटकांविषयी अद्ययावत माहिती दिली जाते काय? यांची माहिती मिळवणे.

(७) रचना (Arrangement) : संदर्भ साधनातील माहिती घटकांची रचना ही तार्किक पद्धतीने केलेली असावी व त्यांचा क्रम प्रमाणित पद्धतीने लावलेला असावा. संदर्भ साधनांचा सखोल निर्देश दिलेला असावा.

(८) उपयोग करण्यातील सहजता (Ease of use) : उपयोजकांच्या दृष्टीने संदर्भ साधन सहजपणे उपयोग करता येईल असे असावे. त्यामध्ये हवी ती माहिती शोधण्यात समस्या येऊ नये. डिजिटल प्रलेख निवडताना माहिती शोध व यासाठी लागणारा वेळ यांचे मूल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

(९) किंमत (Price) : संदर्भ ग्रंथांची किंमत योग्य व परवडणारी असावी. विशेषतः डिजिटल संदर्भ ग्रंथांच्या बाबतीत परवाना (Licence) व अटी इत्यादी बाबी या पडताळून घेणे आवश्यक आहे.

ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ घेताना वरील निकषांच्या आधारे मूल्यमापन करणे गरजेचे आहे.

४.७ माहितीची साधने

कोणत्याही स्वरूपातील प्रलेख हे माहितीची साधने असतात. आजपर्यंत केवळ छापील स्वरूपातील प्रलेखांनाच उपयुक्त आणि विश्वसनीय माहितीची साधने समजली जात होती. परंतु, आधुनिक काळात, विशेषतः १९५० नंतर प्रलेखांच्या स्वरूपात मोठी क्रांती झालेली आहे. यंत्राच्या साहाय्याने माहिती साधनांची निर्मिती,

साठवण व प्रतिप्राप्ती करण्याच्या पद्धती विकसित झाल्या आहेत. पंच्डकार्ड्सपासून ते संगणकीय डेटाबेसपर्यंतचा हा प्रवास जादुई उत्क्रांती वाटावी असा आहे. या काळात पुढील स्वरूपाचे वाचन साहित्य विकसित केले गेले - पंच्डकार्ड्स, मायक्रोफिल्मस्, मायक्रोफिश, मॅग्नेटिक टेप्स, फ्लॉपी, सीडी-रॉम, डीव्हीडी, डेटाबेसेस, ऑनलाईन माहिती जाळ्यांवरील (नेटवर्कवरील) वेबसाईट्स, विविध विषयांतील माहिती पद्धती (ऑनलाईन) इत्यादी.

प्रलेखांचे प्रकार (Types of Documents) : आधुनिक ग्रंथालये व माहिती केंद्रे म्हणून वर नमूद केलेल्या सर्व प्रकारच्या प्रलेखांची दखल ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना व वाचकांना (संशोधकांना) घ्यावी लागते. त्यांच्यामध्ये समाविष्ट असलेल्या माहितीच्या वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे विविध प्रकारे वर्गीकरण केले जाते.

डॉ.रंगनाथन, सी. डब्ल्यू. हॅन्सन आणि डेनिस ग्रोगन या तीनही तज्ज्ञांनी प्रलेखांचे प्रकार सांगितलेले आहेत. प्रलेखांमधील माहितीचे स्वरूप व ज्या पद्धतीने ती माहिती सादर केलेली आहे त्यानुसार प्रलेखांचे वर्गीकरण केले जाते.

डॉ.रंगनाथन यांच्या मते, प्रलेखांचे प्रकार पुढीलप्रमाणे :-

(१) पारंपरिक (conventional) : ग्रंथ, नियतकालिके (संशोधनपर), नकाशे, ॲटलास इत्यादी

(२) नवपारंपरिक (Neo-conventional) : प्रमाणके, तपशीलवार माहितीचे वर्णन करणारी साधने, पेटंट्स, डेटा (डेटाबेस)

(३) अपारंपरिक (Non-conventional) : सूक्ष्म स्वरूपाचे प्रलेख, श्रवण प्रलेख, दृश्य प्रलेख, दृक्-श्राव्य माहितीची साधने

(४) यांत्रिक प्रलेख (Meta Document) : मनुष्याच्या मध्यस्थीशिवाय नोंदवलेले प्रलेख

परंतु, सी. डब्ल्यू. हॅन्सन यांनी प्रलेखांचे केवळ दोनच प्रकार सांगितलेले आहेत. ते प्रकार पुढीलप्रमाणे :

(१) प्राथमिक (Primary) : मूळ स्वरूपातील (original) व प्रथमतःच संशोधन करून सादर केलेली माहिती ज्या प्रकारच्या माहिती साधनांत सादर केलेली असते अशा साधनांना प्राथमिक माहिती साधने असे संबोधले जाते.

उदा., नियतकालिके, अहवाल, पेटंट्स, प्रबंध, व्यापारी वाङ्मय, प्रमाणके इत्यादी.

हॅन्सन यांच्या मते, प्राथमिक प्रलेख म्हणजे असे प्रलेख की ज्यांच्यात समाविष्ट असलेली माहिती ही मूळ स्वरूपातील (original) असते. ती प्रथमतःच प्रकाशित झालेली असते. या अगोदर अशी माहिती कुठेही प्रकाशित झालेली नसते. याकरिता त्यांनी ज्ञानकोशातील लेखाचे उदाहरण दिलेले आहे. त्यांच्या मते, या स्वरूपातील लेखांनाही 'प्राथमिक प्रलेख' म्हटले पाहिजे. कारण, अशा स्वरूपाची माहिती (संबंधित विषयावरील) जरी इतरत्र उपलब्ध असली तरी संबंधित लेखकाने लिहिलेली त्या लेखातील माहिती प्रथमच अशा स्वरूपात संशोधन करून लिहिलेली असते.

(२) द्वितीयक (Secondary) : सार व निर्देशन नियतकालिके, उल्लेख निर्देश (सायटेशन इंडेक्सेस), विषय सूची, आढावा आणि पाहणी (घेणारे आणि करणारे क्रमशः) प्रलेख.

त्याचप्रमाणे, माहितीचे स्वरूप व ती सादर करणाऱ्या माहिती साधनांचे प्रकार यावरून द्वितीयक साधनांचे प्रकार हॅन्सन यांनी सांगितले आहेत. प्राथमिक साधनांविषयीची माहिती ज्या साधनांमध्ये वेगळ्या स्वरूपात सादर केलेली असते अशा माहिती साधनांना द्वितीयक माहिती साधने असे म्हणतात. उदा., सार व निर्देशन नियतकालिके, उल्लेख निर्देश, विषय सूची, आढावा घेणारे व पाहण्या (surveys) करणारी माहिती साधने.

परंतु, काही तज्ज्ञांच्या मते, केवळ प्राथमिक व द्वितीयक असे माहिती साधनांचे दोन प्रकारचे विभाजन उपयुक्त नाही. या विधानाचे खंदे समर्थक आहेत डेनिस ग्रोगन. त्यांच्या मते, विविध विषयांचा विस्तार व प्रगती लक्षात घेतल्यास माहितीचे व ज्ञानाचे पुनर्संघटन व उपयोजकांच्या दृष्टीने त्यातील माहितीचे पुनर्संघटन (Repackaging) करण्याची प्रक्रिया सतत चालत असते. या दृष्टिकोनानुसार, प्रलेखांचे वर्गीकरण (Division) हे त्यांचे पुनर्संघटन (Reorganisation)

ज्या पातळीवर केले जाते त्याच आधारे करावयास हवी. ग्रोगन यांच्या मते, प्राथमिक प्रलेखांमध्ये प्रकाशित होणारे ज्ञान/माहिती प्रथमच प्रकाशित होत असते. ही माहिती संशोधन करून नवीन स्वरूपात सादर केलेली असते. ही संशोधकाची मूळ (original) निर्मिती असते – उदा., प्रबंध, संशोधनपर नियतकालिके, संशोधनपर अहवाल, परिषदांची कार्यवृत्ते, पेटंट्स, प्रमाणके, व्यापारी वाङ्मय इत्यादी.

वर उल्लेखलेल्या प्राथमिक प्रलेखांतील माहिती जेव्हा इतर दुसऱ्या प्रकारच्या प्रलेखांमध्ये पुनर्संघटित (Repackaging) केली जाते तेव्हा अशा प्रलेखांना 'द्वितीयक प्रलेख' असे म्हणतात. द्वितीयक प्रलेख प्राथमिक प्रलेखांमध्ये असलेली माहिती वेगळ्या स्वरूपात देतात. उदा., सारस्वरूप व निर्देशन नियतकालिके, संशोधन प्रगतीचा आढावा घेणारे अहवाल, संदर्भ साधने (ज्ञानकोश, शब्दकोश, हस्तपुस्तिका, तक्ते, विवेचनात्मक निबंध, क्रमिक ग्रंथ इत्यादी).

(३) तृतीयक साधने : तसेच माहितीच्या पुनर्संघटनेची व पुनर्गठणाची ही प्रक्रिया पुढेही चालू राहते. प्राथमिक व द्वितीयक प्रलेखांची संख्या सततच्या संशोधन कार्यामुळे वाढत असते. यालाच माहितीचा परिस्फोट (Information explosion) असे म्हणतात. त्यामुळे प्रकाशित झालेल्या माहितीवर व प्रलेखांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तृतीयक प्रलेखांची निर्मिती करणे अत्यावश्यक झाले. म्हणून, द्वितीयक प्रलेखांविषयी माहिती देणारे नवीन प्रकारचे प्रलेख प्रकाशित केले जाऊ लागले. द्वितीयक साधनांमध्ये प्रकाशित होणाऱ्या माहिती घटकांचे पुनर्संघटन व पुनर्बांधणी करण्यात येऊ लागली. यातूनच जे नवीन प्रलेख अथवा माहिती साधने प्रकाशित होऊ लागली त्यांना 'तृतीयक प्रलेख' असे संबोधले जाऊ लागले. उदा., वार्षिके, निर्देशिका, सूचींची सूची, संशोधन प्रगतीचा अहवाल देणाऱ्या साधनांची यादी इत्यादी.

अशा प्रकारे, माहितीचे स्वरूप व ती सादर करण्याची पद्धती यांच्या साहाय्याने प्रलेखांचे तीन प्रकार तज्ज्ञांनी मान्य केले. अर्थातच, ही तीन प्रकारची माहिती साधनांची विभागणी करण्याचे श्रेय डेनिस ग्रोगन यांच्याकडे जाते.

डेनिस ग्रोगन यांनी सांगितलेले प्रलेखांचे तीन प्रकार पुढीलप्रमाणे :

(१) प्राथमिक (Primary) : नियतकालिके, संशोधनपर अहवाल, परिषदांची कार्यवृत्ते, पेटंट, प्रमाणके, व्यापारी वाङ्मय, प्रबंध.

(i) संशोधनपर नियतकालिक (Research Journal) : प्राथमिक स्वरूपाच्या प्रलेखांमध्ये संशोधनपर नियतकालिकांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. संशोधकांनी केलेल्या/केलेले संशोधनाचे स्वरूप (अथवा संशोधन) हे प्रथम संशोधनपर लेखाच्या रूपात अशा नियतकालिकांमध्ये प्रकाशित केले जातात. संशोधन व अभ्यासाकरिता संशोधकांमध्ये अशा नवीन संशोधनाची माहिती संप्रेषण करण्यासाठी या प्रलेखांचा मोठा हातभार लागतो. अशी प्रकाशने अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आधुनिक काळात अंकीय नियतकालिकेही (e-journals) प्रकाशित केली जातात. ती वाचकांना संगणकाच्या साहाय्याने बघता येतात व वाचताही येतात.

(ii) पेटंट (Patent) : इतर सर्व प्राथमिक प्रलेखांपेक्षा (साधने) हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण प्रलेख आहेत. या प्रलेखांमध्ये असलेली माहिती इतर कोणत्याही प्रलेखांतून प्राप्त होत नाही. यामध्ये नवीन उत्पादनांविषयीची माहिती दिलेली असते. अशा उत्पादनाची प्रक्रिया, किंवा अस्तित्वात असलेल्या उत्पादन प्रक्रियेमध्ये केलेली नवीन सुधारणा, नवीन उत्पादन, एखाद्या नवीन उत्पादनाची कसोटी घेण्याचे/तपासणी करण्याचे (Testing) व गुणवत्ता नियंत्रण (Quality control) यासंबंधीची माहिती यामध्ये असते. ज्या व्यक्तीने संशोधन करून असे नवीन उत्पादन व त्याची प्रक्रिया शोधून काढलेली असते त्या व्यक्तीकडे त्याची बौद्धिक मालकी असते. ती कायद्याने त्याला दिलेली असते. यालाच 'बौद्धिक संपदा हक्क' (Intellectual Porpoerty Rights) असे म्हणतात. त्या व्यक्तीच्या परवानगीशिवाय कुणीही त्या उत्पादनाच्या प्रक्रियेचा उपयोग करू शकत नाही. असे नवीन उत्पादनाचे पेटंट त्या व्यक्तीच्या नावे पेटंट कार्यालयात नोंदवलेले असते.

(iii) संशोधन अहवाल / संशोधनाशी संबंधित अहवाल / संशोधन प्रतिवृत्ते (Research Reports): संशोधनपर नियतकालिकांनंतर हा एक महत्त्वाचा प्रलेख/संशोधनपर वाचन साहित्य समजले जाते. हा प्रलेख माहिती साधन प्रकार फार अलीकडे प्रचलित झाला आहे. याचा उदय दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झालेला दिसून येतो (Guha).

अशा प्रलेखांचा उदय होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संशोधकांनी केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष नियतकालिकांमध्ये प्रकाशित होण्यास खूप वेळ जातो. प्रकाशन संस्थेकडे संशोधनपर लेख पाठवल्यानंतर त्यावर तज्ज्ञांकडून अभिप्राय मागवले जातात. त्यांच्याकडून काही दुरुस्त्याही सुचवल्या जातात. यामध्ये बराच अवधी/वेळ जातो. पर्यायाने केलेल्या संशोधनाचे संप्रेषण होण्यास वेळ लागतो. यावर पर्याय म्हणून अशा प्रकारची संशोधन प्रतिवृत्ते (संशोधन अहवाल/संशोधनाशी संबंधित अहवाल) प्रकाशित करण्याची प्रथा रूढ झाली. परंतु, तज्ज्ञांमध्ये या प्रलेखांमध्ये समाविष्ट असलेल्या माहितीचे स्वरूप व तिची वैशिष्ट्ये यांवर मतभेद आहेत. तरीही अशा स्वरूपाच्या प्रलेखांमध्ये संशोधनाशी संबंधित अतिशय महत्त्वपूर्ण व सखोल माहिती दिलेली असते. अशी माहिती इतरत्र कोणत्याही प्रकारच्या प्रलेखांतून प्राप्त होत नाही.

माहिती तंत्रज्ञानाच्या व माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या उदयानंतर हल्ली डिजिटल स्वरूपातील संशोधन प्रतिवृत्ते संशोधकांकडून प्रकाशित केली जात आहेत. त्यांनाच 'प्रि-प्रिंट्स' असे म्हणतात.

(iv) परिषदांमध्ये वाचले गेलेले संशोधनपर लेख (परिषदांचे कार्यवृत्त : Conference Proceedings) : संशोधन केलेल्या संशोधनाशी संबंधित अथवा संशोधन करत असलेल्या एखाद्या विषयाच्या संशोधनाचे फलित संशोधन परिषदा अथवा चर्चासत्रे यांमध्ये वाचले जाते. यावर चर्चा होऊन त्या विषयावर काही नवीन मुद्दे अथवा दृष्टिकोन संशोधनाच्या पुढील पायरीवर प्राप्त करण्याचा हा प्रयत्न असतो. साधारणतः संशोधनाच्या मध्यम पातळीवर (Middle Stage संशोधन चालू असताना) अथवा संशोधनाच्या शेवटच्या टप्प्यावर असे संशोधनपर लेख परिषदा व चर्चासत्रांमध्ये वाचले जातात. परंतु, अशा परिषदांमध्ये सर्वांनाच उपस्थित राहता येत नाही. त्यामुळे इतर संशोधकांना संशोधनाविषयीची माहिती संप्रेषित करण्याकरिता या प्रलेखांचा उपयोग होतो.

(v) मानके (Standards) : मानके म्हणजे ज्यात एखाद्या उत्पादनाच्या प्रक्रियेसंदर्भात (त्यांची उत्पादनाची पद्धती, मोजमाप (measurements), तंत्रज्ञान इत्यादी) तपशील दिलेला असतो. याबरोबरच एखाद्या वस्तूचे आकारमान (Dimensions, measurements, nature) याविषयीही विवरण दिलेले असते. उदा., तालिका पत्राचा आकार, ग्रंथालयातील कपाटांचे आकारमान (उंची, रुंदी, खोली इत्यादी) याविषयीच्या तपशील ज्या प्रकारच्या प्रलेखांत/माहिती साधनांत दिलेला असतो त्यांना 'मानके' असे म्हणतात. एखादी प्रक्रिया/उत्पादन पार पाडण्या संदर्भातील तो एक प्रमाणित प्रलेख होय. जागतिक गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी या प्रलेखांचा उपयोग होतो. हा एक तांत्रिक प्रलेख आहे. अशा प्रकारची 'मानके' ही मानक मान्य करण्यासाठी निर्माण केलेल्या संस्थांकडून मान्य करून घ्यावी लागतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे इंटरनॅशनल स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन. भारतात हे कार्य करणारी संस्था – ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (जुने नाव : इंडियन स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूट). त्याचप्रमाणे संज्ञांच्या प्रमाणित व्याख्याही मानकांच्या स्वरूपात मान्य केल्या जातात.

(vi) व्यवसायाशी संबंधित वाङ्मय/वाचन साहित्य (Trade Literature) : अशा प्रकारचे माहितीपर प्रलेखही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण समजले जातात. या प्रलेखांमध्ये समाविष्ट असलेली माहिती इतर प्रलेखांमध्ये मिळेलच असे नव्हे. हे प्रलेख औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील संस्थांकडून उत्पादनांची माहिती देण्याकरिता प्रकाशित केले जातात. अशा प्रलेखांचा उद्देश उत्पादनांविषयीची माहिती देण्याचा असतो. एक प्रकारे ती उत्पादनांची जाहिरात असते. परंतु, हल्ली अशा प्रलेखांमधून उत्पादनांविषयीची अतिशय उच्च दर्जाची तांत्रिक माहिती दिली जाते. उत्पादनाचे वर्णन, त्यात वापरलेले तंत्रज्ञान, त्याची वैशिष्ट्ये अशी माहिती यात दिलेली असते. अशी माहिती इतर कोणत्याही

प्रलेखात प्राप्त होत नाही. ही प्रलेख पत्रके (pamplets), हँडबुक्स (handbooks), मार्गदर्शिका (guide), औद्योगिक संस्थेचे नियतकालिक या स्वरूपात प्रकाशित केले जातात.

